रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग | आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | वर्ष ८९ | अंक ५४ | पृष्ठे ८ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
www.krushival.in

## माथेरान घाटात कारला अपघात

**माथेरान :** मद्यपान करून वाहन चालवणं एका पर्यटकाला चांगलंच महागात पडलं आहे. माथेरान घाटात घडलेल्या अपघातात त्याच्या नव्या कोऱ्या कारचे मोठे नुकसान झाले असून, त्याचा सहप्रवासी किरकोळ जखमी झाला आहे. प्राथमिक माहितीनुसार, संबंधित पर्यटकाने मद्यपान केल्यानंतर माथेरान घाटातील 'एस टन' म्हणून प्रचलित असणाऱ्या जुमापट्टी येथील वळणदार रस्त्यावर नियंत्रण गमावले. त्यामुळे वाहन थेट रस्त्याच्या खोलगट बाजूला उलटले. मात्र सुदैवाने मोठी दुर्घटना टळली.

# कृषीवल

रायगड, बुधवार, दि. ३० जुलै २०२५

किंमत ४ ₹

**HIRING ALERT**
Looking For South Indian Cook
(Preffered Male Candidate)
Hotel : Outpost
Job Location : Alibaug
Salary As Per Industry Standards,
Age :- Below 40,
Relevant Experience : 4 to 6 years.
Interested candidates may connect immediately on 8010169688 / 7798467555 & email your latest resume on Sujit.patil@outpostalibaug.com and Pradeep.bhardwaj@Outpostalibaug.com and update your expected salary.

### वेधक

## अखेर दया नायक यांना बढती

**मुंबई :** एन्काऊंटर स्पेशालिस्ट म्हणून प्रसिद्ध असलेले वरिष्ठ पोलीस अधिकारी दया नायक यांना अखेर सहाय्यक पोलीस आयुक्त पदावर बढती मिळाली आहे. विशेष बाब म्हणजे ही बढती त्यांना निवृत्तीच्या अवघ्या दोन दिवस आधी मिळाली आहे. सध्या दया नायक हे मुंबई गुन्हे शाखेच्या युनिट ९ चे प्रभारी पोलीस निरीक्षक म्हणून कार्यरत आहेत. त्यांनी आपल्या कारकिर्दीत अनेक धाडसी ऑपरेशन्स पार पाडले असून, मुंबईतील अंडरवर्ल्डचा दबदबा कमी करण्यात मोठे योगदान मानले जाते. दया नायक यांच्यावरील ही उशिरा का होईना मिळालेली बढती त्यांच्या सेवा कार्याची मान्यता मानली जात आहे.

## महिलेचा विनयभंग

**पनवेल :** कळंबोली सर्कल समोरील, बिमा ब्रिजच्या सुरूवातीस पनवेल मुंब्रा रोड कळंबोली येथे दुचाकीवरून जाणाऱ्या महिलेचा व तिच्या मैत्रिणीचा एका दुचाकीस्वाराने विनयभंग करण्याची घटना घडली आहे. याप्रकरणी दुचाकीस्वाराविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. २५ जुलै रोजी सायंकाळच्या सुमारास यातील तक्रारदार महिला ही आपल्या मैत्रिणीसोबत दुचाकीवरून जात कळंबोली सर्कल समोरील, बिमा ब्रिजच्या सुरूवातीस पनवेल मुंब्रा रोड कळंबोली येथे आलेल्या एका दुचाकीस्वाराने दुचाकीवरील महिलेकडे पाहुन अश्लिल हातवारे व इशारे करण्यासह धक्का दिला. तसेच महिलेच्या मैत्रिणीला हाताने मारहाण करण्यासह शिवीगाळ करून पलायन करण्याचा प्रकार घडला.

## अश्लील वर्तनामुळे शिक्षिकेला अटक

**नवी मुंबई :** महिला शिक्षिकेने इन्स्टाग्रामच्या माध्यमातून अल्पवयीन विद्यार्थ्यासोबत अश्लील वर्तन केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणात कोपरखैरणे पोलिसांनी महिला शिक्षिकेला अटक केली आहे. महिला शिक्षिकेने दहावीतील विद्यार्थ्यासोबत इन्स्टाग्रामवर चॅटिंग केले होते. या शिक्षिकेने विद्यार्थ्याला स्वतःचे अर्धनग्न शरीर दाखवून अश्लील वर्तन केले होते. पीडित विद्यार्थ्याने हा व्हिडिओ रेकॉर्ड करुन मोबाईलमध्ये ठेवला होता; मुलाच्या आईने मोबाईल फोनची तपासणी केली असता, शिक्षिकेचा व्हिडिओ निदर्शनास आला. याबाबत चौकशी केल्यानंतर शिक्षिकेनेच संपर्क साधून हा व्हिडिओ पाठवल्याची माहिती समोर आली.

# स्मार्ट मीटर बंद करा

## ॲड. मानसी म्हात्रे यांचा इशारा

**| अलिबाग | प्रतिनिधी |**

स्मार्ट मीटर सक्तीचे नाही असे सरकारकडून सांगण्यात आले. मात्र छुप्या पध्दतीने गाव पातळीवर मीटर बसविण्याचे काम केले जात आहे. स्मार्ट मीटरची योजना अधोगती आहे. स्मार्ट मीटरच्या माध्यमातून महावितरण कंपनी खासगीकरणाकडे नेण्याचा प्रयत्न आहे. हे मीटर बंद पडल्यास नागरिकांना साडेबारा हजार रुपयांचा आर्थिक भूर्दंड बसणार आहे. त्यामुळे स्मार्ट मीटर बंद करा, ही भूमिका शेतकरी कामगार पक्षाची आहे. सक्तीच्या स्मार्ट मीटर विरोधात शेतकरी कामगार पक्ष आता वेगळ्या भूमिकेने लढा देणार आहे. याबाबत तीव्र आंदोलन करून स्मार्ट मीटर बंद करण्यास सरकारला भाग पाडणार आहे, असे प्रतिपादन शेकाप राज्य महिला आघाडी प्रमुख ॲड. मानसी म्हात्रे यांनी मंगळवारी(दि.२९) अलिबागमध्ये केले.



कार्यकर्ता मार्गदर्शन मेळावा आणि पदाधिकारी नियुक्ती पत्र वाटपाचा कार्यक्रम शेतकरी भवन येथील सभागृहात हा कार्यक्रम पार पडला. यावेळी मानसी म्हात्रे बोलत होत्या. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष तथा अलिबागचे माजी नगराध्यक्ष प्रशांत नाईक, शेकाप राज्य सोशल मीडिया प्रमुख तथा प्रवक्त्या चित्रलेखा पाटील, शैला पाटील, शेकाप कामगार आघाडी प्रमुख प्रदिप नाईक, शेकाप जिल्हा सहचिटणीस

पान २ वर




(छायाचित्र : समीर मालोदे)

### नियुक्तीनंतर जबाबदारी वाढली - चित्रलेखा पाटील

शेकापचे नेते जयंत पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली आघाड्यांच्या पदाधिकारी, सदस्यांची नियुक्ती केली आहे. तरुणांसह महिलांना स्थान दिले आहे. ज्येष्ठ कार्यकर्त्यांचाही यामध्ये सहभाग आहे. नवीन चेहऱ्यांना संधी देत असताना पक्षाबद्दल असलेली निष्ठा, समाजातील काम याची चाचपणी करूनच अनेकांना पदे दिली आहेत. पद नियुक्तीनंतर कार्यकर्त्यांची जबाबदारी आणखी वाढली आहे. पक्षवाढीसाठी तसेच आगामी येणाऱ्या निवडणुकांमध्ये चांगल्या पध्दतीने प्रत्येकाने काम केले पाहिजे. जनतेचे प्रश्न सोडविण्यासाठी प्रत्येकाने मेहनत घेतली पाहिजे. ग्रामीण भागासह शहरी भागात पक्षाची ध्येयधोरणे, विचार जनतेपर्यंत पोहोचवून पक्षाच्या झेंड्याखाली आणण्याचा

पान २ वर

अलिबागमध्ये रंगणार शेकाप पुरस्कृत

# दहीहंडी उत्सव

## दहीहंडी उत्सवात होणार लाखोंच्या बक्षिसांची लूट

**| अलिबाग | प्रतिनिधी |**

शेतकरी कामगार पक्ष पुरस्कृत दहीहंडी सोहळा मानाचा व प्रतिष्ठाचा मानला जातो. शनिवारी (दि.१६) ऑगस्टला अलिबाग शहरात हा उत्सव सोहळा रंगणार आहे. दहीहंडी उत्सवात लाखोंच्या बक्षिसांची लूट होणार आहे.

श्रीकृष्ण जन्माष्टमीनंतर दुसऱ्या दिवशी गोपाळकाळा सण साजरा केला जाणार आहे. शेतकरी कामगार पक्ष पुरोगामी युवक संघटना अलिबाग पुरस्कृत आणि प्रशांत नाईक मित्र मंडळ आयोजित याही वर्षी दहीहंडी स्पर्धेचा सोहळा अलिबागमधील शेतकरी भवन येथे रंगणार आहे. त्याची तयारी युद्धपातळीवर सुरू असून माजी नगराध्यक्ष प्रशांत नाईक यांच्या मार्गदर्शनानुसार नियोजन करण्यात येत आहे.

दहीहंडी फोडणाऱ्या पुरुषांच्या पथकाला प्रथम क्रमांकाचे रोख एक लाख ३१ हजार १११ रुपये व चषक देऊन गौरविण्यात येणार आहे. पुरुष पथकाच्या पाच थरांच्या सलामीला पाच हजार रुपये, सहा थराच्या सलामीला अकरा हजार रुपये देण्यात येणार आहे. महिला गोविंदा पथकाला प्रथम क्रमांकाच्या गोविंदा पथकाला ५१ हजार १११ रुपये व चषक देण्यात येणार आहे. तसेच चार थरांची सलामी देणाऱ्या महिला गोविंदा पथकाला पाच हजार रुपये व पाच थरांची सलामी देणाऱ्या पथकाला अकरा हजार रुपये देऊन सन्मानित केले जाणार आहे. विशेष म्हणजे अलिबागच्या माजी नगराध्यक्षा दिवंगत ॲड. नमिता नाईक यांच्या स्मृती निमित्त यंदा दही हंडी

पान २ वर

# ट्रॉमा केअर सेंटर उभारणीकडे शासनाची पाठ!

## नागरिकांत संताप, महामार्गावरील विविध अपघातांनंतर प्रश्न पुन्हा चव्हाट्यावर

**| माणगाव | प्रतिनिधी |**

माणगाव शहराच्या हद्दीत तीन वर्षापूर्वी मंजूर झालेले ट्रॉमा केअर सेंटर आजही फक्त कागदावर रंगवलेले स्वप्न ठरले आहे. या केंद्राच्या मंजुरीची बातमी आली तेव्हा संपूर्ण तालुक्यात उत्साहाचे वातावरण होते. मात्र, तीन वर्षाच्या कालावधीनंतरही प्रत्यक्ष कामाला सुरूवात झाली नाही. त्यामुळे 'ट्रॉमा केअर सेंटर' आता 'ड्रामा केअर सेंटर' बनले आहे. अशी उपहासात्मक टीका नागरिक करू लागले आहेत.

या ट्रॉमा केअर सेंटरसाठी माणगाव उपजिल्हा रुग्णालयालगत ३४ गुंठे जागा निश्चित झाली असून याठिकाणी असणाऱ्या पूर्वीच्या पंचायत समिती इमारतीत तालुका आरोग्य अधिकारी यांचे कार्यालयाचे कामकाज सुरु आहे. या कार्यालयाला माणगाव उपजिल्हा रुग्णालयाने स्थलांतरीत करण्यासाठी पत्र व्यवहार केला. मात्र अद्यापही हे कार्यालय त्याच ठिकाणी चालू आहे. त्यामुळे आश्चर्य व्यक्त होत आहे. तसेच या ट्रॉमा केअर सेंटर उभारणीकडे सरकार, लोकप्रतिनिधींनीच पाठ फिरवली आहे. त्यामुळे नागरिकातून तीव्र संताप व्यक्त होत आहे.




माणगाव ट्रॉमा केअर सेंटरला मंजुरी मिळाल्यामुळे रुग्णालयाच्या आधुनिकीकरणाच्या वाटचालीत आणखी एक भर पडणार असून माणगावची आरोग्य यंत्रणा ट्रॉमा केअर सेंटरमुळे अधिक बळकट होणार आहे. मात्र हे ट्रॉमा केअर सेंटर गेले तीन वर्षापासून कागदवरच राहिले असून हे सेंटर उभारणीसाठी शासन एक पाऊल पुढे कधी टाकणार असा प्रांजळ सवाल नागरिकांतून उपस्थित होत आहे.

मुंबई-गोवा महामार्ग तसेच माणगावसारख्या शहरात अपघातांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. नुकत्याच झालेल्या महामार्गावरील विविध अपघातांनंतर प्रश्न पुन्हा चव्हाट्यावर आला असून महामार्गावरील माणगाव उपजिल्हा रुग्णालयात ट्रॉमा केअर सेंटर नसल्याने अपघातग्रस्त रुग्णावर योग्य व तातडीचे उपचार मिळत नसल्याने अनेक निष्पाप रुग्णांना प्राण गमवावे लागत आहेत. ज्या लोकप्रतिनिधींनी या प्रकल्पासाठी पुढाकार घेतला, त्यांनी सुरुवातीला मोठ्या घोषणाबाजी केल्या. माणगावच्या ट्रॉमा

पान २ वर

# पर्यटन क्षेत्राचा होणार प्रचार व प्रसार

## महाराष्ट्र शासनाचा महत्त्वपूर्ण निर्णय

**| रायगड | प्रतिनिधी |**

राज्यातील पर्यटन उद्योगाच्या प्रचार व प्रसारासाठी शासनाने महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. शासन निर्णयानुसार, आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय आणि राज्यस्तरावरील खाजगी आयोजनकर्त्यांच्या माध्यमातून आयोजित होणाऱ्या पर्यटन विषयक कार्यक्रमांमध्ये महाराष्ट्राच्या पर्यटनाच्या प्रतिमानिर्मिती आणि ब्रँडिंगसाठी खास धोरणे अंमलात आणली जात आहेत.

या योजनेअंतर्गत स्थानिक, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय कार्यक्रमांमध्ये सहभागी होणाऱ्या संस्थांना अनुदान व सहकार्य दिले जाणार आहे. यात खाजगी संस्था, स्वयंसेवी संस्था, सहकारी संस्था व अन्य आयोजक समाविष्ट आहेत. पर्यटन व सांस्कृतिक वारसा, साहसी पर्यटन, खाद्य महोत्सव, क्राफ्ट व हँडीक्राफ्ट प्रदर्शन, इव्हेंट्स (मीटिंग, प्रेझेंटेशन, एक्झिबिशन), डिजिटल मोहिमा, मीडिया टूर, फॅम टूर, इत्यादी उपक्रमांना प्रोत्साहन दिले जाणार आहे.

पर्यटन विभागाच्या लोगोचा वापर पर्यटन विभागाच्या संमतीने करावा लागेल.

पान २ वर

### पर्यटन क्षेत्रातील ब्रँडिंग

महाराष्ट्र पर्यटन विभाग वार्षिक पर्यटन विपणन आणि ब्रँडिंग योजना तयार करणार असून, त्याअंतर्गत प्रचार उपक्रम राबवले जातील. प्लॅटफॉर्म, डिजिटल मीडिया, दूरचित्रवाणी, रेडिओ, फील्ड इव्हेंट्स व लोकशाहीरांच्या माध्यमातून महाराष्ट्र पर्यटनाचा प्रचार केला जाईल. एक लाख फॉलोअर्स असलेल्या प्रभावी इन्फ्लुएंसर्सकडून महाराष्ट्र पर्यटनाशी संबंधित साहित्य तयार करून त्याद्वारे प्रभावी जनजागृती केली जाणार आहे.

### प्रस्ताव सादर करण्यासाठी नियमावली

पात्र संस्था ही नोंदणीकृत संस्था असावी. प्रस्ताव सादर करण्यासाठी ऑनलाईन प्रणालीवर अर्ज करणे आवश्यक आहे. प्रस्तावात कार्यक्रमाचा तपशील, उद्दिष्ट, खर्चाचा तपशील, प्रचार माध्यमे, अपेक्षित लाभ इत्यादींचा समावेश असावा. मंजूर प्रस्तावासाठी निश्चित वेळेत 'Statement of Expenditure' सादर करणे बंधनकारक आहे.

# ३९० कोटींचे एमडी जप्त

## साकीनाका पोलिसांकडून कर्नाटकमध्ये कारवाई

**| मुंबई | प्रतिनिधी |**

साकीनाका पोलिसांनी कर्नाटकमधील म्हैसूर येथे अमली पदार्थ निर्मितीच्या कारखान्यावर छापा टाकून ३८१ कोटी रुपये किंमतीचे १८७ किलो एमडी (मॅफेड्रिन) जप्त केले. वसईतील गुन्ह्याचा तपास करताना पोलिसांनी ३ महिन्यात ३९० कोटी रुपये किंमतीचे एमडी जप्त केले आहे. या प्रकरणात चार आरोपींना अटक करण्यात आली आहे.

साकीनाका पोलिसांनी एप्रिल महिन्यात वसई (पूर्व) परिसरातील कामण येथे अमली पदार्थांची विक्री करणाऱ्या तिघांना अटक केली होती. त्यांच्याकडून

पान २ वर

### या पथकाने केली कारवाई

परिमंडळ १० चे पोलीस उपायुक्त दत्ता नलावडे, सहाय्यक पोलीस आयुक्त (मेघवाडी विभाग) संपत पाटील, सहाय्यक पोलीस आयुक्त (साकीनाका विभाग) प्रदीप मैराळे, साकीनाका पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रमोद तावडे, पोलीस निरीक्षक युवराज क्षीरसागर, सहाय्यक पोलीस निरीक्षक दयानंद वणवे, पोलीस उपनिरीक्षक पंकज परदेशी, पोलीस हवालदार शशिकांत पाटील, चंद्रकांत पवार, नितीन खैरमोडे, अनिल कारंडे आदींच्या पथकाने या प्रकरणाचा तपास केला.

### म्हैसूरमध्ये एमडीचा कारखाना

म्हैसूर येथून एमडी आणत असल्याची माहिती सलीम लंगडाने चौकशीत दिली. म्हैसूर शहरातील रिंग रोडवरील रस्त्याच्या कडेला निळ्या पत्र्याच्या शेडमध्ये एमडीचा कारखाना सुरू असल्याची माहिती मिळाली. पोलिसांनी त्या ठिकाणी छापा टाकून १८७ किलो एमडी जप्त केले. त्याची आंतरराष्ट्रीय बाजारभावानुसार ३८१ कोटी रुपये किंमत आहे. याशिवाय एमडी बनविण्यासाठी लागणारे अल्कोहोल, क्लोरोफॉर्म, मॅग्निशिअम सल्फेट, ॲसीटोन आदी रसयाने आणि अन्य साहित्य जप्त केले.

# बचतगटातील महिलांची गरुडझेप

## महिलांनी तयार केल्या १ लाख ५६ हजार २० गणपती मूर्ती

**| रायगड | प्रतिनिधी |**

रायगड जिल्ह्यातील पेण तालुक्यातील विविध महिला बचतगटातील २२८ महिलांनी उमेद अभियान अंतर्गत गणपती मूर्ती व्यवसायात पाऊल ठेवले आहे. या व्यवसायातून महिलांना आर्थिक स्थैर्य प्राप्त झाले आहे. बचत गटातील महिलांनी १ लाख ५६ हजार २० गणपती मूर्ती तयार केल्या असून, यामधून कोट्यवधी रुपयांची उलाढाल होण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे. रायगड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले व जिल्हा ग्रामीण विकास

पान २ वर



### अधिकाऱ्यांनी केली पाहणी

पेण तालुक्यातील बचतगटातील महिला तयार करीत असलेल्या गणपती मूर्तींची पाहणी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले व जिल्हाधिकारी जिल्हा ग्रामीण विकास अधिकारी प्रकल्प संचालक प्रियदर्शनी मोरे यांनी केली.

**अलिबागच्या मुख्याधिकारी यांचा अजब कारभार** | **निर्बंधामुळे मंडळाच्या आनंदावर विरजण**

# इको फ्रेंडलीच्या नावाखाली जाचक अटी

**| अलिबाग | प्रतिनिधी |**

सरकारने गणेशोत्सवाला राज्य महोत्सवाचा दर्जा दिला आहे. शासनाच्या या निर्णयाने गणेशभक्तांसह गणेशोत्सव मंडळांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. मात्र या आनंदावर अलिबागच्या मुख्याधिकारी यांच्याकडून विरजण पडण्याची शक्यता वर्तविली जात आहे. इको फ्रेंडली नावाखाली निर्बंध लावून मार्गदर्शक तत्वांची जाहिरातीचे फलक लावण्यात आले आहे. त्यामुळे अलिबागचे मुख्याधिकारी सचिन बच्छाव यांचा अजब कारभार असल्याची चर्चा जोरात सुरू आहे.

गणरायाचे आगमन येत्या २७ ऑगस्टपासून घरोघरी होणार आहे. जिल्ह्यातील वेगवेगळे गणेशोत्सव मंडळ बाप्पाच्या स्वागताच्या तयारीला लागले आहे. सामाजिक संदेश देणारे वेगवेगळे चलचित्र उभारणीचे कामही सुरु झाले आहे. गणेशोत्सव मंडळासह घरगुती गणेशमूर्तींचे स्वागत करण्यासाठी भाविक सज्ज झाले आहेत. वेगवेगळ्या आकाराची, रंगाची सुबक गणेशमूर्ती आणण्यासाठी तयारी जोरात सुरू आहे. अलिबाग शहरामध्येदेखील ठिकठिकाणी गणेशमूर्तींची प्रतिष्ठापना केली जाते. बेटी पढाव, बेटी बचाव,

पान २ वर




इको फ्रेंडली बरोबरच मार्गदर्शक तत्वाच्या नावाखाली जाचक अटी शर्ती लागू करणारे फलक शहरामध्ये ठिकठिकाणी नगरपरिषदेच्या वतीने लावण्यात आले आहेत. राज्य शासनाने जारी केलेल्या मार्गदर्शक तत्त्वांची अंमलबजावणी करण्याचे आवाहन या फलकांद्वारे केले जात आहे. या नियमांमुळे गणेशभक्तांमध्ये नाराजीचा सूर उमटत आहे. शाडूच्या मूर्तीचा आग्रह या फलकांद्वारे करण्यात आला आहे. पीओपी मूर्ती वापरण्यास बंदी नसताना मुख्याधिकारी यांच्या शाडूच्या मूर्तीच्या आग्रहाबाबत नाराजी निर्माण झाली आहे.

**भारतीय शेतकरी कामगार पक्ष**
रायगड-अलिबाग
**वर्धापन दिन**
**दिनांक २ ऑगस्ट २०२५**

**लाल सलाम**

भारतीय शेतकरी कामगार पक्षाच्या ७८ व्या वर्धापन दिनानिमित्त पक्ष सदस्यांचा मेळावा **शनिवार, दि. २ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी १०-०० वाजता सेक्टर नं.५/ए, गुरूद्वाराच्या बाजूला पोलीस ग्राऊंड, नवीन पनवेल** येथे **पक्षाचे सरचिटणीस मा.आमदार भाई जयंत पाटील** व इतर मान्यवर यांच्या प्रमुख उपस्थितीत आयोजित केला आहे. सदर मेळाव्यास पक्षाचे ज्येष्ठ नेते मार्गदर्शन करणार आहेत. तरी पक्ष कार्यकर्त्यांनी या मेळाव्यास बहुसंख्येने उपस्थित रहावे, ही विनंती.

कळावे,

आपला,
**सुरेश नामदेव खैरे**
जिल्हा चिटणीस
शे.का.प. रायगड-अलिबाग

# ‘रासळ’च्या गैरव्यवहाराची होणार फेर चौकशी

। पाली/बेणसे । वार्ताहर ।

सुधागड तालुक्यातील रासळ ग्रामपंचायतच्या तत्कालीन गैरव्यवहार निधीचा अपव्यव व अनियमितता याची पुन्हा चौकशी होणार आहे. यासंदर्भात सर्व अहवालांच्या फेर चौकशीचे आदेश गटविकास अधिकारी पंचायत समिती सुधागड यांना उच्च न्यायालयाने दिले आहेत. त्यानुसार मंगळवारी (ता. २९) सर्व अहवालांची चौकशी पंचायत समिती कार्यालयामध्ये होणार आहे.

या बाबत सविस्तर माहिती अशी की सुभाष राजाराम कदम मु.पो. रासळ ता. सुधागड यांनी रासळ ग्रामपंचायतचे तत्कालीन सरपंच, तत्कालीन प्रभारी सरपंच, तत्कालीन ग्रामपंचायत प्रशासन अधिकारी व महाराष्ट्र शासन यांच्या विरुध्द हायकोर्ट मुंबई येथे याचिका क्रं.८२९९/२०२५ दाखल केली होती. सदर याचिकेच्या सुनावणी दरम्यान ग्रामपंचायत विरुद्ध केलेल्या कारवाईचा अहवाल दिनांक १३/१०/२०२२,१३/०४/२०२३,०९/१०/२०२३ व ११/०१/२०२४ नुसार गट विकास अधिकारी पंचायत समिती सुधागड यांना फेर चौकशीचे आदेश उच्च न्यायालयाने दिले आहेत. हायकोर्ट मुंबई यांच्या आदेशानुसार याचिका क्र.८२९९/२०२५ मध्ये नमुद केलेल्या अहवालाची चौकशी मंगळवारी (ता. २९) रोजी पंचायत समिती सुधागड-पाली कार्यालयामधे दुपारी ठिक दोन वाजता घेण्यात येणार आहे.

सुभाष राजाराम कदम यांनी रासळ ग्रामपंचायतचे तत्कालीन सरपंच (आता हयात नाहीत), प्रभारी सरपंच नरेंद्र खाडे, तत्कालीन रासळ ग्रामपंचायत प्रशासन अधिकारी मोहन पोपटराव पवार, तत्कालीन रासळ ग्रामपंचायत प्रशासन अधिकारी ईश्वर अमरसिंग पवार व महाराष्ट्र शासन यांच्या विरुध्द हायकोर्ट मुंबई येथे याचिका क्रं.८२९९/२०२५ दाखल केली होती.




## अर्जदाराची विंनती

या याचिकेत अर्जदाराने पुढील बाबींसाठी न्यायालयाकडे विनंती केली होती.

गट विकास अधिकारी यांनी अर्जदाराने सादर केलेली चार निवेदने यांचा विचार करून योग्य ती कायदेशीर कारवाई करावी. ग्रामपंचायतीच्या कार्यकाळात (२०१८२०२३) झालेला गैरव्यवहार, निधीचा अपव्यय आणि अनियमितता संदर्भात सरकारच्या ४ जानेवारी २०१७ च्या शासन निर्णयानुसार गुन्हा नोंदवावा आणि वसुलीची कारवाई करावी. संबंधित व्यक्तींविरुद्ध कारवाई करण्याचा आदेश द्यावा, जर ते दोषी आढळले तर कारवाई करावी.

## सुधागड पंचायत समितीला उच्च न्यायालयाचे आदेश

### ग्रामपंचायत गैरव्यवहारा संदर्भात उच्च न्यायालयाचे निर्देश

मुंबई उच्च न्यायालयात दाखल करण्यात आलेल्या लेखी याचिका क्र. ८२९९/२०२५ मध्ये अर्जदार सुभाष राजाराम कदम यांनी राज्य सरकार व इतर प्रतिसादकर्त्यांविरोधात गंभीर गैरव्यवहारासंदर्भात कारवाईची मागणी केली आहे. याचिका भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २२६ अंतर्गत दाखल करण्यात आली होती. ही सुनावणी न्यायमूर्ती जी.एस. कुलकर्णी आणि अरिफ एस. डॉक्टर यांच्या खंडपीठासमोर झाली.

या प्रकरणाच्या सुनावणीदरम्यान अर्जदाराच्या वतीने अधिवक्ता चिंतामणी भंगोजी तर प्रतिसाद कर्त्यांच्या वतीने अधिवक्ता अशोक कोटांगळे, विष्णू चौधरी, नितिकेश कोटांगळे, नरेंद्र भगत आणि राजश्री करांडे उपस्थित होते. राज्य शासनातर्फे अतिरिक्त सरकारी वकील एन. सी. वाळिंबेयांनी बाजू मांडली.

सुनावणीत अर्जदाराच्या वतीने असे सांगण्यात आले की, याचिकेतील मुख्य मागणी ही केवळ निवेदनांवर विचार करण्याची असून, सध्या कोणतीही पुढील कारवाईची मागणी नाही. प्रतिसादकर्त्यांच्या वतीने असे सांगितले गेले की, संबंधित अधिकारी निवेदनांवर विचार करून निर्णय घेतील. त्याअनुषंगाने न्यायालयाने निर्देश दिले की गटविकास अधिकारी हे वरील चार निवेदनांवर या आदेशाच्या अपलोड दिनांकापासून चार आठवड्यांच्या आत निर्णय घेतील. याचिका यावरच निकाली काढण्यात आली, व खर्चाचा कोणताही आदेश देण्यात आलेला नाही. उच्च न्यायालयाच्या या निर्णयामुळे ग्रामपंचायतीच्या कार्यपद्धतीबाबत पारदर्शकता आणि उत्तरदायित्व कायम ठेवण्यासाठी पुढील दिशा ठरणार आहे.

वाघ्रणला अनिल पाटील वाचनालयाच्या वतीने

# वृक्षारोपण कार्यक्रम संपन्न



। वाघ्रण । वार्ताहर ।

वाघ्रण येथील अनिल रमाकांत पाटील वाचनालयाच्या वतीने २८ जुलै रोजी वृक्षारोपण करण्यात आले.

वाचनालयांना शासन सुचित कार्यक्रमा अंतर्गत जिल्हा ग्रथालय शासन अधिकारी रायगड जिल्हा प्रमुखांच्या सूचनेचे पालन करीत माननीय सरपंच राजेंद्र पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत वृक्ष लागवड करण्यात आली.

वाचनालय अध्यक्ष उदय पाटील यांनी प्रामुख्याने अशोक आणि बदाम व इतर दहा वृक्ष नर्सरी मधून उपलब्ध करून दिली.

वाचनालय - प्राथमिक शाळा व ग्रामपंचायत परीसरात झाडे लावण्यात आली . कार्यक्रमात उपस्थित सरपंच मुख्याध्यापिका संगिता म्हात्रे पंचायत कर्मचारी ज्येष्ठ नागरिक संघ वाघ्रणचे अध्यक्ष विनायक म्हात्रे पेढांबे ग्रा.पं. सदस्य रुपेश पाटील अंगणवाडी कर्मचारी विद्यार्थी यांचे स्वागत अनिल पाटील वाचनालयाचे ग्रंथपाल पत्रकार दिपक यशवंत पाटील यांनी केले. तर आभार खजिनदार तुकाराम पाटील यांनी मानले. या कार्यक्रमात संचालक सुनिल पाटील, प्रमोद पाटील, महेंद्र पाटील, किरण पाटील, रुत्वीक पाटील, गणेश पाटील, आदिनी सहकार्य केले.

# काँग्रेसचे अ‍ॅड. प्रविण ठाकूर राष्ट्रवादीच्या वाटेवर

## ■ २ ऑगस्ट रोजी करणार प्रवेश

। उरण । वार्ताहर।

काँग्रेस पक्षाचे प्रदेश चिटणीस आणि रायगड जिल्ह्यातील ज्येष्ठ नेते अ‍ॅड. प्रविण मधुकर ठाकूर यांनी काँग्रेस पक्षाच्या सध्याच्या कार्यशैलीवर नाराजी व्यक्त करत, पक्षाला रामराम ठोकण्याचा निर्णय घेतला आहे. येत्या २ ऑगस्ट २०२५ रोजी, अलिबागमध्ये आयोजित विशेष कार्यक्रमात ते राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात अधिकृतपणे प्रवेश करणार असून, यावेळी राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार आणि रायगडचे खासदार तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे उपस्थित राहणार आहेत.

अ‍ॅड. प्रविण ठाकूर हे माजी आमदार मधुकर ठाकूर यांचे सुपुत्र असून, २००९ मध्ये त्यांनी रायगड लोकसभा मतदारसंघातून काँग्रेसच्या अधिकृत उमेदवाराविरोधात बंडखोरी करत निवडणूक लढवली होती. त्यांचा स्थानिक राजकारणात सक्रीय आणि प्रभावी हस्तक्षेप असून, अलिबाग नगरपरिषदेचे विरोधी पक्षनेते म्हणून त्यांनी उल्लेखनीय कामगिरी केली आहे.



प्रवेशासंदर्भात बोलताना अ‍ॅड. प्रविण ठाकूर म्हणाले, काँग्रेसमध्ये सध्या कुठलाही ताळमेळ उरलेला नाही. कार्यकर्त्यांचा आवाज दाबला जातोय. त्याउलट राष्ट्रवादी काँग्रेसकडून कोकण व रायगडसाठी स्पष्ट दिशा व धोरण आहे. या पार्श्वभूमीवर मी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश करण्याचा निर्णय घेतला आहे. अलीकडेच माणगाव येथील शिवसेनेचे नेते अ‍ॅड. राजू साबळे यांनी देखील राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला. आता अ‍ॅड. प्रविण ठाकूर यांच्या प्रवेशामुळे रायगड जिल्ह्यात काँग्रेस आणि शिवसेना या दोन्ही पक्षांना मोठा राजकीय झटका बसणार आहे, तर राष्ट्रवादी काँग्रेसची ताकद अधिक वाढणार आहे. २ ऑगस्ट रोजीचा कार्यक्रम अलिबागमध्ये आयोजित करण्यात आला असून, जिल्ह्यातील अनेक राजकीय नेते, कार्यकर्ते, पदाधिकारी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत.

# रातवडनजिक एसटीला अपघात; ७ जखमी



। माणगाव । वार्ताहर ।

माणगाव पासून १५किमी अंतरावर असणाऱ्या रातवड गावच्या हद्दीत मुंबई-गोवा महामार्गावर एसटी बसला अपघात होऊन पलटी झाल्याने ७ जण जखमी झाल्याची घटना घडली आहे. मिळालेल्या माहितीनुसार सविस्तर वृत्त असे की, दि. २९ जुलै रोजी श्रीवर्धन भिवंडी बस माणगावहून मुंबई बाजूकडे जात असताना सायंकाळी ५ वा. च्या दरम्यान मौजे रातवड गावच्या हद्दीत आल्यावेळी चालकाचा बसवरील नियंत्रण सुटल्याने बस महामार्गाच्या खाली जाऊन शेतात पलटी झाली. बसमध्ये एकूण २४ प्रवासी प्रवास करीत होते.

या अपघाताची माहिती मिळताच माणगाव पोलीस तातडीने घटनास्थळी दाखल झाले. या अपघातात निकिता जितेंद्र पवार, जितेंद्र पवार, जिनल जितेंद्र पवार, महेश मारुती जाधव, रोहित पांडे, माया जाधव व बस चालक असे एकूण ७ जण जखमी झाले आहेत. जखमींना उपचारासाठी उपजिल्हा रुग्णालय माणगाव येथे दाखल करण्यात आले असून घटनेचा पुढील तपास माणगाव पोलीस करीत आहेत.

# मुरुड ते अक्कलकोट लालपरी धावणार

मुरुड । प्रतिनिधी ।

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ रायगड विभागातील मुरुड आगारातून श्रावणातील देवदर्शन करा आता लालपरी संगे स्वामींच्या कृपेने मुरुडमधील स्वामीभक्तांना सुवर्णसंधी आहे. मुरुड आगारातर्फे श्रावण मासात बुधवारी ३० जुलै रोजी मुरुड ते अक्कलकोट बससेवा सुरू करण्यात येणार आहे.

मुरुड अक्कलकोट मुरुड अलिबाग - लोणावळा - स्वारगेट - सोलापूर मुरुड ते अक्कलकोट सुटायची वेळ सकाळी ०८:०० वाजता गुरुवारी दुसऱ्या दिवशी शुक्रवारी अक्कलकोट ते मुरुड सुटायची वेळ सकाळी ०९:०० वाजता सदर सेवेचा प्रवाशांनी लाभ घ्यावा, असे आवाहन मुरूडचे आगार व्यवस्थापक राहुल शिंदे यांनी केले आहे.



पालीवाला महाविद्यालयात

# ग्रीन क्लबची स्थापना

। पाली/ वाघोशी । वार्ताहर ।

जागतिक निसर्ग संवर्धन दिनाच्या औचित्याने शेठ ज. नो. पालीवाला महाविद्यालय, पाली (सुधागड) येथे राष्ट्रीय सेवा योजना व भूगोल विभागाच्या संयुक्त विद्यमाने ग्रीन क्लब या विशेष समितीची स्थापना करण्यात आली. पर्यावरण रक्षणाच्या दिशेने एक सकारात्मक आणि प्रेरणादायी पाऊल उचलत या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाला विद्यार्थ्यांचा व प्राध्यापकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. सुधाकर लहूपचांग सर होते. त्यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात ग्रीन क्लब स्थापन करण्यामागील विद्यापीठाची संकल्पना, जागतिक निसर्ग संवर्धनाची गरज आणि मानवासाठी निसर्गाचे महत्त्व यावर सखोल मार्गदर्शन केले.

त्यांनी विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण संवर्धनाची जाणीव निर्माण होण्यासाठी वेगवेगळ्या उपक्रमांची आखणी कशी करावी यावर भर दिला.

विद्यापीठाचे प्रतिनिधी म्हणून पुढील पाच विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. शशिकला शिद, सागर शेंडे, अंकिता खंजीर, प्रतीक साळुंखे, नूतन ठाकूरया कार्यक्रमाचे प्रास्ताविक भूगोल विभागप्रमुख डॉ. एस. ए. पाटील यांनी केले. त्यांनी आपल्या भाषणात वाढते प्रदूषण, वृक्षतोड, पर्यावरणीय असमतोल यावर चिंता व्यक्त करत पर्यावरण संवर्धनाचे महत्त्व अधोरेखित केले. तसेच वाढदिवसाला केक न कापता झाड लावण्याची सुंदर कल्पना मांडली.

विशेष व्याख्यान भौतिकशास्त्र विभागप्रमुख व समन्वयक प्रा. शिवपुजे यांनी दिले. त्यांनी पर्यावरण रक्षणासाठी आवश्यक कृती, प्रदूषणाची कारणे, इलेक्ट्रिक वाहनांचे फायदे, सोलर एनर्जीचा उपयोग, दैनंदिन जीवनात पर्यावरण पूरक वस्तूंचा वापर आणि वृक्षांचे संगोपन यावर विद्यार्थ्यांना जागरूक केले.

वाणिज्य विभाग प्रमुख प्रा. स्नेहल बेलवलकर यांनी आपल्या मार्गदर्शनात विद्यार्थ्यांना आवाहन केले की, पर्यावरण संवर्धनाची सुरुवात स्वतःपासून करावी. त्यांनी विद्यार्थ्यांमध्ये स्वच्छता व पर्यावरण रक्षणाची सवय लागावी, यावर भर दिला.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. सागर ससाने यांनी केले, तर आभार प्रदर्शन देखील त्यांनीच केले.

पान १ वरून

## स्मार्ट मीटर बंद करा

अ‍ॅड. गौतम पाटील, शेकाप अलिबाग तालुका माजी चिटणीस अनिल पाटील, शेकाप अलिबाग तालुका चिटणीस सुरेश घरत, शेकाप शहर प्रमुख अनिल चोपडा, अ‍ॅड. निलम हजारे, वृषाली ठोसर, अ‍ॅड. किशोर हजारे, अजय झुंजारराव, अशोक प्रधान, आदी मान्यवर पदाधिकारी, महिला व कार्यकर्ते उपस्थित होते.

याप्रसंगी अ‍ॅड. मानसी म्हात्रे म्हणाल्या की, सर्वसामान्यांना केंद्रबिंदू ठेवून शेतकरी कामगार पक्ष काम करीत आला आहे. गेल्या अनेक महिन्यांपासून वेगवेगळ्या बैठकांमधून कार्यकर्त्यांचा उत्साह दिसून येत आहे. कार्यकर्ते स्वयंस्फुर्तीने सभा बैठकांमध्ये सामील होऊन पक्ष अधिक मजबूत करण्यासाठी कामाला लागला आहे.

शेतकरी कामगार पक्षाने अनेक संस्था उभ्या करून रोजगाराचे दालन खुले केले. मात्र विरोधकांना साधी बालवाडीदेखील काढता आली, नाही ही मोठी चिंताजनक बाब आहे. परंतू शेकापने केलेल्या कामांचे श्रेय घेण्याचा प्रयत्न विरोधक करीत असल्याचे चित्र आहे. योग्य वेळ आल्यावर शेकाप त्यांची पाठ काढण्याचे काम नक्की करेल, असे मानसी म्हात्रे म्हणाल्या. पुढे त्यांनी सांगितले की, गेल्या चार वर्षापासून नगरपरिषदेची निवडणुक नाही. प्रशासकामार्फत कारभार चालत आहे. तरीदेखील शेतकरी कामगार पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते बसून न राहता, जनतेच्या हितासाठी काम करीत राहिले आहेत. सर्वसामान्यांच्या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी धडपडत आहेत. सरकारने स्मार्ट मीटरची योजना आणली. साडेबारा हजार रुपयांचे मीटर मोफत बसविले जात आहे. या मीटरमुळे वीज बील भरमसाठ येत आहे. मीटरची रक्कम यातूनच वसूल करण्याचा घाट आहे. त्यामुळे हे बदलण्याची गरज आहे. आगामी काळात स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणूका येणार आहे. सर्व कार्यकर्ते महिलांनी ताकदीने या निवडणुकांना सामोरे जायाचे आहे. मोठ्या जिद्दीने प्रत्येकाने काम करायचे आहे. अलिबाग शहर हे उद्याचे एक मॉडेल ठरणार आहे. अलिबाग नगरपरिषद ही महाराष्ट्रातील मार्गदर्शक नगरपरिषद असणार आहे, असे मानसी म्हात्रे म्हणाल्या.

### नियुक्तीनंतर जबाबदारी वाढली - चित्रलेखा पाटील

**प्रयत्न केला. रस्ते, रोजगार या विषयांवर बोलण्यास सत्ताधाऱ्यांना वेळ नाही. हनी ट्रॅप व अन्य विषयांवर जास्त लक्ष दिले जात आहे. त्यामुळे सामान्य जनता त्रस्त झाली आहे. शेकापच त्यांचे प्रश्न सोडवू शकतो. ही जाणीव करून द्या. असे शेकाप राज्य प्रवक्त्या तथा सोशल मीडिया प्रमुख चित्रलेखा पाटील म्हणाल्या.**

## दहीहंडी उत्सव

फोडणाऱ्या शहरातील महिला व पुरूष गोविंदा पथकांना विशेष बक्षीस दिले जाणार आहे. दहीहंडी फोडणाऱ्या शहरातील पुरुष गोविंदा पथकाला एक लाख रुपये व महिला गोविंदा पथकाला ५० हजार रुपयांचे अतिरिक्त बक्षीस दिले जाणार असल्याची माहिती प्रदिप नाईक यांनी बैठकीत दिली.

## पर्यटन क्षेत्राचा होणार प्रचार व प्रसार

नियोजित कार्यक्रम पर्यटन विभागाच्या उद्दिष्टांशी सुसंगत असावा. मान्यताप्राप्त मीडिया संस्थांकडून प्रसिद्धी करण्यात यावी. कार्यक्रमात महाराष्ट्र पर्यटन विभागाचे प्रतिनिधित्व आवश्यक आहे. या योजनेंतर्गत राज्यातील विविध संस्थांना पर्यटनविषयक कार्यक्रम आयोजनासाठी शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार मार्गदर्शन मिळणार असून, पर्यटन क्षेत्राचा विस्तार व प्रचार करण्यासाठी ही योजना एक महत्त्वपूर्ण पाऊल ठरणार आहे.

**उच्चस्तरीय समितीची स्थापना**

पर्यटन विभागाच्या अपर मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय समिती स्थापन करण्यात आली आहे. यामध्ये पर्यटन संचालनालय, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ, गृह व सांस्कृतिक कार्य विभागाचे वरिष्ठ अधिकारी सदस्य म्हणून असतील. ही समिती पात्र प्रस्तावांना मान्यता देणार आहे.

## बचतगटातील महिलांची गरुडझेप

यंत्रणा प्रकल्प संचालक प्रियदर्शिनी मोरे यांनी बचत गटातील महिलांना व्यवसायाच्या दृष्टीने मार्गदर्शन केल्याने, जिल्ह्यातील महिला शक्ती गणपती मूर्ती व्यवसायात गरुड झेप घेऊ शकल्या आहेत.

रायगड जिल्ह्यातील पेण तालुका गणपती मूर्तींचे माहेरघर म्हणून ओळखले जाते. पेणमध्ये तयार केलेल्या गणपती मूर्तींना देश, विदेशात मोठी मागणी आहे. सुबक आखणी, नेटकी बैठक, सुंदर कोरीवकाम, डोळ्यांची रचना आणि रंगकाम यामुळे पेणच्या गणपती मूर्तींना स्वतची खास ओळख प्राप्त झाली असून, गणेशमूर्तींना भौगोलिक मानांकन मिळाले आहे. या व्यवसायात पेण तालुक्यातील महिला बचतगट उतरले आहेत.

ग्रामीण जीवनोन्नती अभियान अंतर्गत पेण तालुक्यातील विविध बचत गटातील २२८ महिला या गणपती व्यवसायात सहभागी झाल्या आहेत. महिला बचत गटांनी १ लाख ५६ हजार २० गणपती मूर्ती तयार केल्या असून, यामधील १ हजार ५०० गणपती मूर्ती परदेशात पाठविण्यात आल्या आहेत. गणपती मूर्ती व्यवसायातून कोट्यवधी रुपयांची उलाढाल होण्याची अपेक्षा आहे. व्यवसायासाठी उमेद अभियान मार्फत महिला बचत गटांना फिरता निधी तसेच ग्राम संघांना समुदाय गुंतवणूक निधी आणि बँकांमार्फत पतपुरवठा करण्यात आला असून, महिलांच्या या व्यवसायाला गती प्राप्त झाली आहे. या व्यवसायामुळे महिलांच्या हाताला काम मिळाल्यामुळे त्या अधिक सक्षम झाल्या आहेत.

## ट्रॉमा केअर सेंटर उभारणीकडे शासनाची पाठ!

अवस्था ही प्रशासनाच्या ढिसाळ कारभाराचा आणि राजकीय इच्छाशक्तीच्या अभावाचा प्रत्यय देते. माणगाव ट्रॉमा केअर सेंटर १० खाटांचे लेवल ३ चे उभारले जाणार आहे. यात स्त्री - पुरुष स्वतंत्र कक्ष अतिदक्षता विभाग, शस्त्रक्रिया विभाग, अपघात विभाग, डायसेस विभाग, शवविच्छेदन कक्ष, प्रयोगशाळा कक्ष, अधिकारी कर्मचाऱ्यांसाठी निवासस्थान असे विविध सोयीसुविधा याठिकाणी असणार आहेत. या सेंटरचे वास्तुशास्त्रज्ञाकडून आराखडा शासनानाकडे आला असून तो आता मंजुरीसाठी मंत्रालयात पाठविला गेला आहे. या कामाला आर्थिक तरतूद मंजूर झाल्यानंतर पुढची प्रक्रिया पार पडणार आहे. मात्र २४ फेब्रुवारी २०२२ ला सार्वजनिक आरोग्य विभागाच्या मंजुरीला चार वर्ष होत आहेत. त्यामुळे या कामाला म्हणावी तितकी गती नसल्याने नागरिकांच्या भावना अधिक तीव्र होत आहेत.

मुंबई - गोवा व दिघी-पुणे अशा महत्वाच्या राज्य मार्गावर अनेक वेळा विविध अपघाताच्या घटना घडल्या आहेत. या अपघात ग्रस्तांवर तातडीने उपचार करण्यासाठी ट्रॉमा केअर सेंटरची नितांत गरज आहे. मात्र हे ट्रॉमा केअर सेंटर उभारणीला शासनाला मुहूर्त सापडत नसल्याने हे ट्रॉमा केअर सेंटर फक्त कागदावर उरले आहे. त्यामुळे रुग्ण व नागरिकांतून संताप व्यक्त होत आहे. माणगाव तालुक्यासह अन्य तालुक्यातून नागरिक उपचारासाठी मोठ्या संख्येने येतात. सामान्य नागरिकांना खाजगी - महागडी रुग्णसेवा परवडत नसल्याने दक्षिण रायगडसह नजीकच्या रत्नागिरी जिल्ह्यातील विविध तालुक्यातून अनेक रुग्ण माणगाव उपजिल्हा रुग्णालयात उपचारासाठी येत आहेत. नवनवीन उपचारासाठी लागणाऱ्या यंत्रसामुगी, पुरेसा ऑक्सिजन साठा, डायलेसिस विभाग सीटीस्कॅन सेंटर, यामुळे हे रुग्णालय कात टाकत आहे. माणगाव ट्रॉमा केअर सेंटरला मंजुरी मिळाल्यामुळे रुग्णालयाच्या आधुनिकीकरणाच्या वाटचालीत आणखी एक भर पडणार असून माणगावची आरोग्य यंत्रणा ट्रॉमा केअर सेंटरमुळे अधिक बळकट होणार आहे. मात्र हे ट्रॉमा केअर सेंटर गेले तीन वर्षापासून कागदवरच राहिले असून हे सेंटर उभारणीसाठी शासन एक पाऊल पुढे कधी टाकणार असा प्रांजळ सवाल नागरीकातून उपस्थित होत आहे. या ट्रॉमा केअर सेंटरमध्ये रस्त्यावरील अपघातग्रस्त रुग्णावर तातडीने उपचार होऊन त्यांचे प्राण वाचणार आहेत. मात्र या ट्रॉमा केअर सेंटरला ३ वर्षापूर्वी मंजुरी मिळाली असून ते आजही कागदावरच राहिले आहे.या ट्रॉमा केअर सेंटर उभारणीला मुहूर्त कधी सापडणार असा नागरीकातून सवाल उपस्थित होत आहे.

## ३९० कोटींचे एमडी जप्त

चार किलो ५३ ग्रॅम वजनाचे आठ कोटी रुपये किंमतीचे एमडी जप्त करण्यात आले होते. या प्रकरणात सलीम शेख उर्फ सलीम लंगडा (४५) हा मुख्य आरोपी फरारी होता. या प्रकरणाचा तपास साकीनाका पोलीस तपास करत होते. पोलिसांच्या विशेष पथकाने वांद्रे रेक्लेमेशन येथून सलीम लंगडा याला अटक केली.

वसईमधील कामण येथे एप्रिलमध्ये आठ कोटी रुपयांचे अमली पदार्थ जप्त करण्यात आले होते. या प्रकरणाचा तपास करताना म्हैसूर येथून ३८१ कोटी रुपयांचे एमडी जप्त करण्यात आले. एकाच गुन्ह्यात तीन महिन्यात तब्बल ३९० कोटी रुपयांचे अमली पदार्थ जप्त करण्यात आल्याची माहिती परिमंडळ-१० चे पोलीस उपायुक्त दत्ता नलावडे यांनी दिली.

## इको फ्रेंडलीच्या नावाखाली जाचक अटी

स्वच्छता राखा, देशभक्तीपर वेगवेगळे चलचित्र शहरातील मंडळाच्या वतीने काढले जातात. त्यामुळे या परिसरात उत्साह व धार्मिक वातावरण निर्माण होते. अलिबागमध्ये गणेशमुर्तींचे दर्शन घेण्यासाठी भाविकांची प्रचंड गर्दी होते. सरकारने गणेशोत्सवाला राज्य महोत्सवाचा दर्जा दिला आहे. त्यामुळे हा उत्सव या वर्षीच उत्साहात साजरा होण्याची शक्यता आहे. मात्र या उत्सवावर अलिबागच्या मुख्याधिकारी यांनी विरजण टाकल्याची चर्चा सध्या जोरात सुरू आहे.

प्रशासक तथा मुख्याधिकारी सचिन बच्छाव यांच्या वतीने शहरात लावलेल्या फलकांनूसार यावर्षी गणेशोत्सव साध्या पध्दतीने साजरा करा, सार्वजनिक मंडळात मुर्ती चार फुट आणि घरगुती दोन फुटापेक्षा अधिक उंच नसावी, शाडूच्या मातीच्या मूर्ती तयार करा अशा अनेक प्रकारचे नियम लावण्यात आले आहेत.

मूर्तींच्या उंचीवर मर्यादा लादल्याने भक्तांची घोर निराशा झाली आहे. अनेक गणेश मंडळांना आणि घरगुती भक्तांना हे नियम जाचक वाटत आहेत. जाचक नियमांमुळे उत्सव साजरा करण्याच्या स्वातंत्र्यावरच गदा येत असल्याची भावना अनेकजण व्यक्त करत आहेत.याबाबत मुख्याधिकारी यांच्याशी संपर्क साधला, असता, होऊ शकला नाही.

# बंगाली कारागीरच्या वीज चोरीवर धाड

**पनवेल :** भांडुप महावितरणाचे कर्तव्यदक्ष मुख्य अभियंता संजय पाटील यांना एका गुप्त माहीतीदाराने पनवेल मिरची गल्ली येथे छुप्या पध्दतीने मिटरची छेडछाड करून विजचोरी केली जात असल्याची माहीती मिळाली या बाबत त्यांनी तात्काळ सदर वीज चोरीबाबत अधिकारी यांना सविस्तर माहिती देऊन कारवाई करण्याचे आदेश देण्यात आले. याबाबत पनवेल महावितरणाने वरीष्ठांचे आदेश मिळताच शोध मोहीमेअंतर्गत पनवेल मिरची गल्ली येथील स्वेअर रीॲलीटी ईमारतीमध्ये प्लॅट क्रमांक १०२ मधील बंगाली कारागीर राजु पराई याने महावितरणाच्या इलेक्ट्रीक विद्युत मिटरमध्ये छेडछाड करून मिटर बायपास करून विज चोरी केल्याचे महावितरणाच्या धाडीत उघड झाले. भारतीय विद्युत कायद्यांतर्गत कलम १३५ अन्वये सदर कारवाई करण्यात आली. बंगाली कारागीराने सुमारे २९१७ युनिटची चोरी केल्याने त्याला या युनिटचे सुमारे ८०,९५० रूपयाचे बील महावितरणाकडुन देण्यात आले.



### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, मौजे सावळे ता.कर्जत, जि.रायगड येथील खालील वर्णनाच्या मिळकतीच्या ७/१२ सदरील इतर अधिकारामधील रस्ता वहिवाटीचे मालक सतपाल बन्शनारायण सिंग यांचे क्षेत्र घेत असल्याबाबत जाहिर पेपर नोटीस.

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्रफळ हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| ९४ | ०७ | ०-१८-०० पैकी रस्ता वहिवाटीचे क्षेत्र ०-०८-०० | ०-१६ |
| ९४ | १४ | ०-७५-०० पैकी रस्ता वहिवाटीचे क्षेत्र ०-०१-९८ | ०-४८ |

सबब सदर मिळकतीबाबत कोणचाही कोणत्याही प्रकारची हरकत व हितसंबंध असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकत हि निर्वेध व बोजारहीत आहेत तसेच सदर मिळकतींमध्ये कोणाचाही हक्क हितसंबंध नाही असे समजणेत येईल. मागाहून येणाऱ्या तक्रारींची नोंद घेतली जाणार नाही.

दिनांक :- २९/०७/२०२५

**अ‍ॅड. संदीप हरिश्चंद्र मसणे**
बी.ए.एल.एल.बी.
पत्ता - ब्लॉक नं.१०१,
कोर्ट व्ह्यू बिल्डींग, पहिला मजला,
दिवाणी व फौजदारी न्यायालयासमोर,
कर्जत, ता.कर्जत, जि.रायगड ४१०२०१
मोबाईल नंबर ९६०४५४५७७७

कृषीवल
। रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग
। आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७
। MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)





दीपक पवार,
विटा - सांगोला
९९६०३९४१२३

# समाजकारणातील संत गणपतराव देशमुख













**महाराष्ट्राचे ज्येष्ठ नेते, शेतकरी कामगार पक्षाचा बुलंद आवाज, सांगोला विधानसभा मतदारसंघाचे तब्बल ५५ वर्षे विधानसभेत नेतृत्व, ११ वेळा एकच पक्ष, एकच झेंडा, एकच निशाणी चिन्हावर निवडून येण्याचा बहुमान मिळाला तो भाई गणपतराव देशमुख यांना. आयुष्यभर शेतकरी कामगार पक्षाच्या विचारांशी एकनिष्ठ राहिले. ती एकनिष्ठता आजच्या प्रचलित राजकारणात दुरापास्त झाली आहे. अशा वेळी गणपतराव देशमुखांची प्रकर्षाने आठवण येते. असे लोकाभिमुख नेतृत्व माजी मंत्री भाई गणपतराव तथा आबासाहेब देशमुख यांचा आज बुधवार, दि. ३० जुलै रोजी स्मृतिदिन. त्यानिमित्त आबासाहेबांच्या कार्याचा घेतलेला आढावा.**

सोलापूर जिल्ह्यातील सांगोला म्हटलं की, नजरेसमोर शेकापचे भाई गणपतराव देशमुखांची प्रतिकृती उभी राहते. तब्बल ५५ वर्षे सांगोलाचे विधानसभेत नेतृत्व केले. नुसते नेतृत्व केले नाही. कायमस्वरूपी दुष्काळी भागाला शासनाच्या विविध योजना व लोकसहभागातून विकासकामे केली. विकासाच्या पटलावर नेण्याचे काम गणपतराव तथा आबासाहेबांनी केले. जेव्हा राज्यात टिळकांच्या देहावसनानंतर टिळकवादी आणि गांधीवादी यांच्या नाईलाजाने एकत्र राहण्याच्या राजकीय प्रयोगांचा. फेरवाद्यांनी राज्याच्या घोषणेनंतर खिलाफत स्वराज्य पक्षाची स्थापना केली. त्यानंतर तांबे प्रकरण आणि स्किन समिती प्रकरणानंतर या फेरवादी गटातही फूट पडली. यातूनच १९२६ ला प्रतियोगिता सहकारिता पक्षाची स्थापना झाली. यातून देशाची राजकीय अस्थिरता दिसून येत होती. फुटीचं राजकारण उघड्या डोळ्यांनी दिसत होतं. त्याच वर्षी मात्र सोलापुरातील सांगोल्याला स्थिर राजकारणाचं दिव्य स्वप्न पडलं. याच संघर्षाच्या काळात सांगोल्याचं पुढच्या कित्येक वर्षांचं भविष्य असणाऱ्या गणपतराव देशमुखांचा जन्म झाला.

पंढरपूर-मोहोळ रस्त्यावर पेण्णुर (ता. मोहोळ) गाव आहे, जिथे गणपतरावांचा जन्म १० ऑगस्ट १९२६ रोजी झाला. त्यांनी मॅट्रिकपर्यंतचं शिक्षण पंढरपूर येथे घेतलं. पुढच्या शिक्षणासाठी ते पुण्याच्या सर परशुरामभाऊ महाविद्यालयात आले व कला शाखेची पदवी प्राप्त केली. पुढे पुण्याच्या 'लॉ' कॉलेजमधून कायद्याचं शिक्षण घेतलं आणि वकिली पेशा स्वीकारला. या प्रवासात राजकारणाचं बाळकडू त्यांना पुण्यानेच दिले. त्या काळात पुण्याच्या राजकारणात शंकरराव मोरे, केशवराव जेधे यांसारखी नावे मोठी झाली होती. त्यांच्या बैठकांना गणपतरावांनी स्वयंसेवक म्हणून जायला सुरुवात केली. त्यांच्या चर्चा ऐकू लागले. त्यातल्या त्यात शंकरराव मोरे म्हणजे मार्क्सवादी विचारसरणी असलेलं व त्यासाठी अभ्यासवर्ग भरवणारं एक मोठं नाव. त्यांचा प्रभाव गणपतरावांवर पडायला सुरुवात झाली. दरम्यानच्या काळात ते मार्क्सवादी विचारसरणीच्या जवळ आले. चौफेर वाचन केलं आणि त्यानंतर ठरवून घेतलं की, उद्या जर राजकारणामध्ये यायचा विचार झालाच, तर ह्या कष्टकरी लोकांसाठी ते पाऊल असेल आणि अखंड त्यांच्यासाठीच ते पडत राहील.

सन १९४६ च्या सप्टेंबर महिन्याच्या काळात काँग्रेसमध्ये काम करणाऱ्या सहकाऱ्यांना शंकरराव मोरे यांनी आपली खंत बोलून दाखविली. ते म्हणाले, ''काँग्रेस पक्षाने जनतेला वेळोवेळी दिलेल्या आश्वासनांना आणि निवडणूक जाहीरनाम्यातील वचनांना हरताळ फासलेला आहे. काँग्रेस सरकार हे भांडवलदारांचे हित पाहणाऱ्यांच्या आणि शेतकरी कामगारांचे राज्य स्थापन करण्याच्या घोषणेच्या विरोधात काम करत आहे. यामुळे आपणास वेगळा मार्ग निवडावा लागेल.'' अशी खंत व्यक्त केल्यानंतर प्रत्यक्षात ११ सप्टेंबर १९४६ रोजी शंकरराव मोरे यांनी त्यांचे सहकारी भाऊसाहेब राऊत, केशवराव जेधे, तुळशीदास जाधव, दत्ता देशमुख, रामभाऊ नलावडे व इतर काही आमदारांच्या मदतीने शेतकरी-कामकरी संघ स्थापन केला. या संघाच्या स्थापनेनंतर मोरे यांच्या काँग्रेसमधील विरोधकांनी टीकास्त्र सोडले. त्यावेळेस 'नवयुग'सारख्या साप्ताहिकामधून शंकरराव मोरे यांनी आपल्या लेखणीने त्यांना चोख उत्तर दिले. यानंतर दि. ११ जानेवारी १९४७ रोजी मुंबईतील फणसवाडी येथील शंकरराव मोरे यांच्या बंगल्यात पूनश्च एकदा काँग्रेस शेतकरी कामकरी संघाची बैठक बोलावण्यास आली. या बैठकीत महाराष्ट्राचे उद्‌गाते यशवंतराव चव्हाण यांनी प्रथम शेतकरी-कामकरी पक्ष स्थापनेस प्रखर विरोध केला होता. या विरोधाने खचून न जाता पुण्यात भाऊसाहेब शिरोळे यांच्या घरी केशवराव जेधे, औटे, मोहिते, आनंदराव चव्हाण, तुळशीदास जाधव, दत्ता देशमुख, भापकर, भाऊसाहेब शिरोळे यांना एकत्रित करून शंकररावजी मोरे यांनी शेतकरी-कामकरीऐवजी नवा शेतकरी कामगार पक्ष स्थापन करण्याच्या मुहूर्ताचा नारळ फोडला. त्यानंतर दि. ३ ऑगस्ट १९४७ रोजी आळंदी मुक्कामी शंकरराव मोरे यांनी निवडक कार्यकर्त्यांना बोलावून ऐतिहासिक बैठक घेतली. याच बैठकीत आजचा शेतकरी कामगार पक्ष महाराष्ट्रात जन्मास आला. आणि ही सगळी परिस्थिती वीस वर्षांचा एक युवक अगदी जवळून पाहात होता. आपलं गाव देशभक्त तुळशीदास जाधव यांना मानणारं असल्या कारणाने व शेकापवर मार्क्सवादी विचारसरणीचा प्रभाव असल्याने गणपतरावांनी शेकापमधून पुढचा प्रवास करण्याचा निर्णय घेतला.

त्यानंतर संयुक्त महाराष्ट्र चळवळीचा लढा झाला. त्यात गणपतरावांची भूमिका हीदेखील अत्यंत महत्त्वाची होती. अखेर १ मे १९६० ला मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राची स्थापना झाली. यशवंतराव चव्हाण मुख्यमंत्री झाले. हळूहळू आपल्या प्रश्नांकडे पाहिले जावे, असे प्रत्येक भागातील सर्वसामान्य लोकांना वाटू लागले. त्याआधी १९५६ ला एल.एल.बी. चे शिक्षण पूर्ण केलेले गणपतराव मोहोळ कोर्टात वकिली करत होते. उरलेल्या वेळेत आसपासच्या लोकांचे प्रश्न जाणून घेणे आणि उपाय सुचवणे, हे प्रत्येक गावातील उच्चशिक्षित तरुण जसे करत असतो, तसं गणपतराव करत होते. यात एक पाण्याचा प्रश्न गंभीर होता. तो प्रश्न म्हणजे, सबंध सोलापूर जिल्ह्याला शाप म्हणावा लागेल.

या प्रश्नावर काय करावं? याचा विचार गणपतराव करत होतेच, यातूनच त्यांनी सांगोला दुष्काळ परिषद भरवली व त्या परिषदेत क्रांतिसिंह नाना पाटील आणि नागनाथअण्णा नायकवडी यांना आमंत्रित केले. त्या परिषदेला सांगोला, मोहोळ, पंढरपूर, माळशिरस या तालुक्यातून तसेच सांगली भागातून हजारो लोकांनी उपस्थिती लावली होती. प्रत्येकाचे प्रश्न जाणून घेऊन तो आवाज शासनदरबारी पोहोचवण्याची विनंती केली. त्यावेळी गणपतरावांनी केलेलं भाषण ऐकून सगळ्यांची कानउघाडणी झाली, असं म्हणता येईल. या परिषदेनंतर नाना पाटील यांनी केवळ मागणीच पोहोचवली नाही, तर गणपतरावांना लवकरात लवकर आपल्यासोबत घ्या, अन्यथा भलं मोठं काहीतरी गमावून बसाल, असा सल्लासुद्धा दिला. त्या परिषदेनंतर गणपतराव देशमुख या नावाची चर्चा सर्वत्र होऊ लागली. १९६२ ला येणारी संयुक्त महाराष्ट्राची पहिली निवडणूक या दृष्टीने मोर्चेबांधणी सुरु होती. तिकीट वाटप, त्यासाठी मुलाखती, वेगवेगळ्या नावांची चर्चा, त्यात कमकुवत असलेला विरोधी पक्ष, यामुळे काँग्रेस पक्ष बळावत चाललेला. याकारणाने मूलभूत प्रश्नाकडील लक्ष विरळ झालेले दिसले. याचाच फायदा शेतकरी कामगार पक्षाने घ्यायला सुरुवात केली. युवकांची फळी सोबत घेऊन आखणी केली. त्या फळीतील अग्रगण्य नाव म्हणजे गणपतराव देशमुख.

वकिली करण्यासाठी ते सांगोल्यात आले. त्यावेळी संयुक्त महाराष्ट्राची चळवळ जोरात सुरू होती. सांगोला तालुक्यात भूमीगत राहून पत्रके वाटण्याचे काम त्यांनी केले. संपूर्ण तालुक्यावर काँग्रेसचा एकछत्री अंमल होता. तशातच निवडणुका लागल्या. राऊत नावाचे विद्यमान आमदार होते. त्यांच्या विरोधात कुणी उभे राहायचे, हा प्रश्न होता. उभे राहायचे म्हणजे हमखास पडायचेच होते. पडायचेच आहे, तर गणपतरावांना उभे करूया, असे संयुक्त महाराष्ट्र समितीच्या एका बैठकीत ठरले आणि गणपतराव विधानसभेचे उमेदवार बनले. अशा स्थितीत शक्य तिथे पोहोचून गणपतराव सभा घ्यायचे. एस.एम. जोशी, शंकरराव मोरे, आचार्य अत्रे वगैरेंच्या सभा ऐकून वक्तृत्व कमावले होते, त्याचा उपयोग होऊ लागला. लोक प्रत्यक्ष सभेला न येता लांबूनच त्यांचे भाषण ऐकायचे. लोकांचा प्रत्यक्षात प्रतिसाद न मिळालेल्या या पहिल्या निवडणुकीत गणपतराव निवडून आले, ते मराठा समाजाच्या मतांवर. मराठा समाजाचे प्राबल्य असलेल्या गावांनी गणपतरावांना भरभरून मते दिली. सांगोल्यातील जनता त्यावेळीही जातीवर आधारित मते देत नव्हती आणि पन्नास वर्षांनीही परिस्थितीत फरक पडला नाही. हा सामाजिक सलोखा टिकवून ठेवण्याचे श्रेय गणपतरावांच्याकडे जाते. निवडून आल्यानंतरचा त्यांचा सुरुवातीचा काळ मोठा खडतर होता. आमदार असले तरी सगळ्या ग्रामपंचायतींवर काँग्रेसचे वर्चस्व, त्यामुळे पंचायत समिती काही त्यांना जिंकता आली नव्हती. कारण, पंचायत समितीसाठी ग्रामपंचायत सदस्यांचे मतदान होते आणि तालुक्यातील बहुतांश काँग्रेसचे वर्चस्व होते. कालांतराने गणपतराव देशमुखांनी तालुका लालबावटामय केला. तालुक्यात लाल वादळ निर्माण केले.

सांगोला तालुका म्हटले की दुष्काळ, पिण्याच्या पाण्यासाठी टँकर, महिलांची पाण्यासाठी पायपीट, हे नित्याचेच होते. मात्र, आबासाहेबांनी ८१ गावांची शिरभावी पाणी पुरवठा योजना मंजूर करुन घेतली. अल्पावधीत ती सुरु केली व पंढरपूरच्या चंद्रभागेच पाणी सांगोल्यातील गावागावात आणले. महिलांच्या डोक्यावरची घागर आबासाहेबांनी कायमची उतरवली. आज सांगोल्यातील जनता रोज चंद्रभागेच्या पाण्याने आंघोळ करीत आहे. ही किमया आबासाहेबांनी करुन दाखवली. स्व. वसंतदादा मुख्यमंत्री असताना नागज येथे भव्य पाणी परिषद आयोजित केली होती. त्यामध्ये ही संकल्पना आबासाहेबांनी मांडली. पुढे तीच मागणी सभागृहात करुन आबासाहेबांनी सविस्तरपणे अभ्यासपूर्ण रीतीने या योजनेचे महत्त्व पटवून दिले. परिणामी, सर्व दुष्काळी तालुक्यातील लोकप्रतिनिधींनी त्यास सहमती दर्शविली. दुष्काळ कायमचा हटवण्यासाठी तेरा दुष्काळी तालुक्यांतील शेतकऱ्यांची एकजूट करुन क्रांतिवीर नागन्नाथअण्णा नायकवडी व स्व. आबासाहेबांनी पाणी संघर्ष चळवळ उभी केली. चळवळीच्या माध्यमातून भला मोठा लढा उभा केला. अनेक मोर्चे, रास्ता रोको, धरणे आंदोलने, जेल भरो अशा लोकशाही मार्गाने अनेक लढाया लढल्या गेल्या, तसेच प्रत्येक वर्षी नित्यनियमाने छत्रपती शाहू महाराजांच्या जयंतीदिनी पाणी परिषद आटपाडी येथे आयोजित केली जाते. पाण्यासाठी चाललेला दीर्घकाळ लढा म्हणून याकडे पाहिले जाते.

या आंदोलनाचा एवढा दबाव वाढला की, सरकारला ही योजना मंजूर करुन घ्यावी लागली. कुठे कृष्णा नदी व कुठे सांगोला तालुका, इथे पाणी कसे येणार, अशी थट्टा उडवणारे टेंभू म्हैसाळ योजनेचे पाणी आलेवरती मीच पाणी आणले, मीच आणले म्हणून उर बडवून सांगू लागले. अशा वेळीसुद्धा आबासाहेब संयमाने लोकांना सांगत, या पाण्याचे श्रेय कोणीही घेऊद्यात, पाणी आले ते खरे! लोक हुशार असतात, जनता डोळस असते, ती सर्व काही जाणते, अशी टिप्पणी आबासाहेब करीत असत.

आबासाहेबांना श्रेय घेण्याची हौस नव्हती, मीच केले ते म्हणत नव्हते. पाणी आल्यानंतर या पाण्याचे श्रेय ते संपूर्णतः तेरा तालुक्यांतील दुष्काळी जनतेच्या संघर्षाला, लढ्याला व एकजुटीला देत असत. अशा प्रकारे सत्तेचा कुठलाही मोह न बाळगता, डामडौल न करता, साधी राहणी व उच्च विचारसरणी अवलंबून निःस्वार्थपणे व निष्कलंक चारित्र्य जपत आबासाहेबांनी जनसेवा केली. सांगोला मतदारसंघाचा सर्वांगीण विकास विरोधी पक्षात राहून करुन दाखवला. असे आबासाहेब पुन्हा होणे नाही. अशा ऋषितुल्य व्यक्तिमत्त्व असणाऱ्या गणपतराव तथा आबासाहेब देशमुख यांना विनम्र अभिवादन. ●●

## सांगोला ते विधानसभा, एसटी बसनेच प्रवास

कार्यकर्ता बॅनरवर झळकला तर दुचाकीशिवाय खाली उतरत नाही. आणि जर एखाद्या पक्षाचा साधा नेता जरी असला तर तो चारचाकी गाडीच्या खाली फिरत नाही. पण, या सर्वांना ज्येष्ठ नेते गणपतराव देशमुख अपवाद होते. मुंबईची विधानसभा असो किंवा नागपूरचे हिवाळी अधिवेशन गणपतराव देशमुख हे ठरल्याप्रमाणे एसटी महामंडळाच्या बसनेच यायचे.

उच्च विचार, साधी राहणी हे प्रत्येकाला जमतेच असं नाही. पण गणपतराव देशमुख हे आपल्या विचारांना पक्के होते. तब्बल ११ वेळा आमदार म्हणून निवडून आले. पण, त्यांनीही आमदारकीचा मोठेपणा मिरवला नाही. गरीब, शोषितांसाठी त्यांनी उभे आयुष्य खर्ची घातले. गणपतराव देशमुख हे मुंबईला महामंडळाच्या एसटी बसनेच यायचे. २०१७ मध्ये नागपूरच्या हिवाळी अधिवेशनालासुद्धा गणपतराव देशमुख एसटी बसनेच आले होते. पहिल्या टर्मपासून त्यांनी क्रम मोडला नाही, तो शेवटपर्यंत कायम राखला. गणपतराव देशमुख हे राजकारणात येण्यापूर्वी वकिली करत होते. या माध्यमातून लोकांना न्याय देता देता त्यांची शेतकरी कामगार पक्षाशी काम करण्याची जवळीक झाली. १९५० पासून ते शेकापचे सक्रिय कार्यकर्ते झाले. १९६२ साली गणपतराव देशमुख यांनी सांगोला विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढवली. इथूनच त्यांची राजकीय कारकीर्द बहरू लागली. पहिली निवडणूक लढवताना दुष्काळी सांगोल्यातील जनतेला पाणी मिळाले पाहिजे, या मागणीसाठी त्यांनी लढाई सुरू केली होती. आणीबाणीच्या काळात त्यांनी तुरुंगवासही भोगला होता. १९७२ च्या विधानसभा निवडणुकीत त्यांना पराभव पत्करावा लागला होता. पण दोन वर्षांतच झालेल्या पोटनिवडणुकीत गणपतराव पुन्हा निवडून आले ते सलग १९९५ पर्यंत.

एकच शेतकरी कामगार पक्ष, एकच मतदारसंघ सांगोला विधानसभा मतदारसंघ आणि एकच उमेदवार गणपतराव देशमुख महाराष्ट्रात असं उदाहरण दुर्मिळच आहे. आजोबांपासून नातवाचेही मतदान गणपतराव यांना मिळाले होते. आयुष्यातील ५० वर्षे त्यांनी विधानसभेतील अनेक मुख्यमंत्री आणि मंत्री यांचे कामं पाहिली होती. तसंच आपल्या कामाचा ठसासुद्धा त्यांनी राज्यातील राजकारणात उमटवला होता.

## शेवटपर्यंत जनतेचे 'आबा'च

**दिवंगत माजी आमदार गणपतराव देशमुख आणि साधेपणा हे समीकरण अगदी घट्ट रुजलेलं. ११ वेळा आमदार झालेला हा माणूस सांगोल्याच्या आणि महाराष्ट्राच्या जनतेसाठी अखेरपर्यंत 'आबा'च होते. आबा आमदार असतानादेखील घराच्या पुढे थांबणाऱ्या एखाद्या गाडीला किंवा एसटीला हात करायचे आणि मतदारसंघातल्या एखाद्या गावात जायचे. लोकांच्या भेटीगाठी घ्यायचे आणि प्रामाणिक हेतून काम करायचे.प्रॅक्टिकल राजकारणाच्या काळातदेखील गणपतराव देशमुखांनी एकाच म्हणजे शेतकरी कामगार पक्षात आपली उभी राजकीय हयात घालवली. १९६२ पासून दोन अपवाद सोडले, तर ते कधी सत्तेच्या राजकारणातदेखील नव्हते. पुलोद कार्यक्रमात त्यांच्याकडे मंत्रीपद होते, नंतर ९९ च्या दरम्यान शेकापने आघाडी सरकारला पाठिंबा दिल्यानंतर ते सत्तेत होते.**

## आबासाहेबांचा जीवनपट

### गणपतराव देशमुख
### (१० ऑगस्ट १९२६ – ३० जुलै २०२१)

- मोहोळ तालुक्यातील पिंपरी येथे १० ऑगस्ट १९२६ रोजी जन्म
- सांगोला मतदारसंघातून ११ वेळा आमदार होण्याचा गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड
- विधानसभेवर एकाच मतदारसंघातून सर्वाधिक वेळा निवडून येण्याचा द्रविड मुन्नेत्र कळघमचे नेते एम. करुणानिधी यांचा विक्रम मोडला
- तब्बल ५४ वर्षे त्यांनी सांगोल्याचे प्रतिनिधित्व
- सांगोल्यात सर्वप्रथम १९६२ च्या निवडणुकीत विजयी.
- १९७२ आणि १९९५चा अपवाद वगळता प्रत्येक निवडणुकीत विजयी.
- १९५०-५४ : शेतकरी कामगार पक्ष पुरस्कृत विद्यार्थी सभेचा कार्यकर्ता. संयुक्त महाराष्ट्र आंदोलनात सहभाग व अनेक वेळेस कारावास.
- १९६५- पासून शेतकरी कामगार पक्षाच्या मध्यवर्ती समिती व चिटणीस मंडळाचे सदस्य.
- १९६५-अन्नधन्य चळवळीत येरवडा जेलमध्ये स्थानबद्ध
- १९६९-७५- सरचिटणीस, महाराष्ट्र राज्य शेतकरी सभा.
- १९६९- संस्थापक अध्यक्ष, सांगोले तालुका शिक्षण प्रसारक मंडळ, या संस्थेचे सांगोले येथे न्यू इग्लिश स्कूल व ज्युनियर कॉलेज, कला व विज्ञान महाविद्यालय
- १९७२-७५- सदस्य, महाराष्ट्र राज्य रस्ते वाहतूक मंडळ, मुंबई.
- १९७५-आणीबाणीच्या काळात खटला व तुरुंगवास. आटपाडी येथील माणगंगा सहकारी साखर कारखाना व सांगोले तालुक्यातील सांगोले तालुका शेतकरी सह. साखर कारखान्याच्या उभारणील सक्रीय सहभाग. संस्थापक, शेतकरी सहकारी सूत गिरणी मर्या, सागोले, संस्थापक, शेतकरी महिला सहकारी व स्वनिर्माण सूत गिरणी मर्या. सांगोले संस्थापक, सांगोले औद्योगिक सहकारी वसाहत मर्या. सांगोले. महाराष्ट्र राज्य पाणी परिषदेचे अध्यक्ष, राज्यातील दुष्काळी भागाला पाणी मिळावे म्हणून प्रयत्न, सांगोले तालुका पाणलोट विकास क्षेत्रामध्ये अग्रेसर करण्यासाठी प्रयत्न, सांगोले शाखा पाटबंधारे प्रकल्प क्रमांक ४ व ५. टेंभू व म्हैसाळ प्रकल्पाची कामे पूर्ण करण्यासाठी तसेच कृष्णा खोरे महामंडळाचे अपूर्ण प्रकल्प पूर्ण करण्यासाठी प्रयत्न.
- से.ह. योजनेखाली-बोर, डाळींब व अन्य फळबागांची मोठ्या प्रमाणात लागवड करण्यासाठी व विक्रीसाठी सहकारी फळबाग उत्पादक शेतकरी संघ स्थापन करून देशात व परदेशामध्ये फळ विक्रीची व्यवस्था करण्यात पुढाकार, महाराष्ट्र विधानसभा सदस्य १९६२-६७, १९६७-७२, १९७४-७८, १९७८-८०, १९८०-८५, १९८५-९०, १९९०-९५, १९९९-२००४, २००४-२००९, ऑक्टोबर २००९, ऑक्टोबर २०१४ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर ११ व्या वेळेस फेरनिवड.
- १९७७- विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानसभा
- पुलोद शासन : जुलै १९७८ ते फेब्रुवारी १९८० पर्यंत कृषी, ग्रामविकास आणि विधी व न्याय खात्याचे मंत्री.
- पुरोगामी लोकशाही आघाडी शासन – १९ ऑक्टोबर १९९९ ते मे २००२ पर्यंत पणन, रोजगार हमी योजना खात्याचे मंत्री, मे २००२ मध्ये मंत्रीपदाचा राजीनामा.
- विधानसभेचे हंगामी अध्यक्ष – मार्च १९९०, नोव्हेंबर २००४ आणि पुन्हा तिसऱ्या वेळेस ९ नोव्हेंबर २००९ रोजी महाराष्ट्र राज्याचे राज्यपालांकडून विधानसभेचे हंगामी अध्यक्ष म्हणून नियुक्ती.
- शासकीय समिती सदस्य – १९८०-१९८२- महाराष्ट्र विधान मंडळाच्या लोकलेखा समितीचे अध्यक्ष, विधानमंडळाच्या अंदाज, लोकलेखा, कामकाज सल्लागार, उप-विधान, सार्वजनिक उपक्रम व विनंती अर्ज इत्यादी समित्यांचे सदस्य.
- २०१२ मध्ये आमदार म्हणून विधानसभेतील त्यांच्या सहभागास ५० वर्षे पूर्ण झाल्याबद्दल सभागृहाने तसेच सरकारकडून गौरव.
- २०१४ साली विधानसभा निवडणुकीत तब्बल ९४ हजार ३७४ मते मिळवून शिवसेनेचे शहाजीबापू पाटील यांचा २५ हजार २२४ मतांनी पराभव केला.

कृषीवल
। रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग
। आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७
। MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)



# आयटीवरचे काळे ढग

आयटी अर्थात इन्फर्मेशन टेक्नॉलॉजी हा सध्याचा परवलीचा शब्द आहे. तरुण मुलामुलींना आयटीमध्ये नोकरी मिळाली की आकाश गाठल्यासारखे वाटते. नव्या शतकात नव्या भारताला याच क्षेत्राने मोठा हात दिला. पण आता त्याच्यावर काळे ढग दाटले आहेत. देशातील सर्वात मोठी आयटी कंपनी टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस म्हणजे टीसीएसने बारा हजार कर्मचाऱ्यांना काढून टाकण्याचे जाहीर केले आहे. विशेष म्हणजे नऊ ते सतरा वर्षे नोकरी झाली आहे अशा मध्यम स्तरातील कर्मचाऱ्यांचा यात समावेश असणार आहे. नवीन कर्मचारी भरती कमालीची कमी झाली आहेच. त्यात दहा-पंधरा वर्षे काम केल्यानंतर माणसांना काढून टाकले जात आहे. टीसीएस ही कंपनीच असे करते आहे असे म्हटल्यावर त्याचा परिणाम देशातील इतर आयटी क्षेत्रावर होणार यात शंका नाही. टीसीएसने स्पष्टपणे म्हटलेले नाही. पण आर्टिफिशियल इंटेलिजन्स किंवा एआयच्या वाढत्या प्रसारामुळेच या नोकऱ्या जाणार आहेत. टीसीएसचा धंदा किंवा उलाढालही सातत्याने कमी होत आहे. यंदा मार्च ते जून या तीन महिन्यांमध्ये ही उलाढाल तब्बल तीन टक्क्यांनी कमी झाली आहे. गेल्या वर्षभरात हीच स्थिती कायम राहिली असून कंपनीने यंदा मार्च महिन्यात कर्मचाऱ्यांना अपेक्षित असलेली पगारवाढही दिलेली नाही. अर्थात ही केवळ टीसीएसची स्थिती नाही. जागतिक पातळीवर हेच चित्र आहे. गेल्या काही दिवसात मायक्रोसॉफ्टने १५ हजार आणि आयबीएमने आठ हजार लोकांना कमी केले आहे. गुगलनेही हजारो लोकांना काढले आहे. भारतातल्या इन्फोसिस, एचसीएल, महिन्द्रा या इतर प्रमुख कंपन्यांनीही आधीच कपात केली आहे किंवा ते त्या तयारीत आहेत. या नाववाल्या व पैसेवाल्यांनी ही कपात केल्यावर खालच्या बिननाववाल्या छोट्या व मध्यम कंपन्यांना तर कारणच मिळेल. या कंपन्या दिसायला आधुनिक वगैरे असल्या तरी त्यांचे मालक जुन्या काळातल्या जमीनदारांइतके किंवा त्याहूनही अधिक उलट्या काळजाचे असतात. तेही या निमित्ताने कर्मचाऱ्यांना काढण्याची संधी साधून घेतील. शिवाय, उदारीकरणाचा जमाना असल्याने त्याविरुध्द हाक ना बोंब अशी कर्मचाऱ्यांची अवस्था असेल.

## सगळ्यांनाच फटका

आर्टिफिशियल इंटेलिजन्स किंवा एआय हे तंत्रज्ञान कित्येक वर्षे वापरात आहेच. आपण मोबाईलवर सध्या स्कूटर्स कोणती चांगली आहे असा शोध घेतला तर लगेच त्याच्या आसपासची सगळी माहिती आपल्याला येऊ लागते. कर्ज देणाऱ्या कंपन्यांचे फोन येऊ लागतात. किंवा व्हॉटसॅपवर मेसेज टाईप करू लागलो की हार्दिक असा शब्द लिहिल्यावर शुभेच्छा असा पुढचा शब्द आपोआप लिहिला जातो. यामागे एआयचेच तत्व काम करते. मात्र गेल्या दोन-तीन वर्षात या तंत्रज्ञानाचा स्फोट झाला आहे. त्यामुळे अनेक क्षेत्रांमध्ये नोकऱ्या जातील अशी भीती निर्माण झाली आहे. राजीव गांधी यांनी संगणक आणण्याचा पुरस्कार केला तेव्हा १९८० च्या दशकात अशीच भीती व्यक्त झाली होती. संगणक आले तर बँकांमधील कर्मचारी बेकार होतील अशी शंका वाटून त्याला संघटनांनी जोरदार विरोध केला होता. ती भीती अगदीच खोटी नव्हती. काही प्रमाणात संगणकांमुळे कारकून वगैरेंची भरती कमी झाली आहे. अनेक बँकांमध्ये पैसे काढणे, चेक भरणे किंवा पासबुक भरून घेणे ही कामे आता एटीएममध्येच केली जातात. त्या प्रमाणात तिथे कर्मचाऱ्यांची संख्या कमी झालीच असणार. पण ही भरती सर्वस्वी थांबली नाही. बँकांमध्ये इतर नवे रोजगार निर्माण झाले. शिवाय आयटीमध्ये तर लाखोंच्या संधी उपलब्ध झाल्या. पण आता यालाच ब्रेक लागण्याची शक्यता आहे. आता खुद्द आयटी क्षेत्रातल्याच नोकऱ्यांवर गदा येणार आहे. मायक्रोसॉफ्टच्या सत्या नडेला यांच्या मते त्यांच्या कंपनीतले तीस टक्के काम एआय करू शकेल असे आहे. आयटी क्षेत्रामध्ये डेटा एंट्री करणे किंवा नवीन प्रोग्रॅम्स लिहिणे किंवा त्यांची अप्लिकेशन्स तयार करणे अशी प्राथमिक स्तरावरची कामे असतात. ती त्याच त्या स्वरुपाची असतात. ती एआयच्या मदतीने सहज करता येऊ शकतात. पोस्ट ऑफिसमध्ये विविध ठिकाणांहून पत्रे येतात. अलिबागसारख्या शहरातल्या पत्त्यांनुसार या पत्रांचे वर्गीकरण केले जाते व वेगवेगळ्या पोस्टमनकडे सोपवले जाते. सध्या वर्गीकरणाचे काम माणसेच करतात. त्याऐवजी एका यंत्राला अलिबाग शहरातील सर्व इमारती, घरे, दुकाने यांची माहिती फीड केली व त्यात ती पत्रे टाकली तर ते सहजपणे त्या पत्रांचे वर्गीकरण करू शकेल.

## मंदीचा धोका

याच रीतीने खूप प्रचंड प्रमाणावरची कामेही एआय सहज करू शकेल. नव्हे ते करू लागलेच आहे. पण केवळ तेच ते काम करणे याच्या पुढे जाऊन स्वतःची बुध्दी वापरू शकणे हाही एआयचा एक गुण पुढच्या काळात विकसित होणार आहे. उदाहरणार्थ, न्यायालयांमध्ये सध्या दोन्ही पक्षांची कागदपत्रे व युक्तिवाद पाहिल्या व ऐकल्यानंतर कायद्यानुसार त्या त्या प्रकरणात निकाल देणे हे काम न्यायाधीश करतात. निदान साध्या प्रकरणांमध्ये एआय हे काम सहज करू शकेल अशी अवस्था आहे. किंवा रुग्णाच्या तपासण्या करूनच जर रोगाचे निदान होणार असेल तर ते एआयदेखील करू शकेल व औषधेही सुचवू शकेल. पण आधी म्हटल्याप्रमाणे आयटी क्षेत्राला याचा सर्वाधिक फटका बसू शकेल. कारण तिथे गुंतागुंतीच्या कामांमध्येही एआय वापरता येणार आहे. अमेरिका व युरोपने त्याच त्या स्वरुपाची, वेळखाऊ आयटी कामे भारत वा इतर देशातील इंजिनिअर्सकडून स्वस्तात करून घेण्याचा सपाटा गेल्या काही वर्षात लावला. हा उभयपक्षी फायद्याचा सौदा होता. त्यांच्या पैशात बचत झाली व आपल्या लोकांना रोजगार व त्या मानाने भरपूर कमाई झाली. एआयमुळे हे चक्र बंद पडण्याचा धोका निर्माण झाला आहे. दुर्दैवाने याची म्हणावी तितकी दखल आपल्या नेत्यांनी व माध्यमांनी घेतलेली नाही. आपले नेते अजूनही गोमूत्राचे फायदे किंवा अमुक दिवशी मासे खाल्यामुळे आमच्या भावना दुखावल्या वगैरे गोष्टींमध्ये अडकून पडले आहेत व लोकांनाही त्यातच गुंतवून ठेवत आहेत. भारत हा सर्वाधिक तरुण असलेला देश आहे. पण त्या देशाची तरुणाई नेत्यांच्या फालतू कावडी वाहण्यात वाया चालली आहे. टीसीएसमधील नोकरकपातीसारख्या घटनांची तात्पुरती व तीही त्या क्षेत्रापुरती चर्चा होते. पण लगेच लोक पुन्हा हिंदू विरुध्द मुस्लिम या आपल्या नेहमीच्या राजकारणाकडे वळतात. हा प्रकार कोणाचेच भले करणारा नाही. आज टीसीएस व इतर कंपन्यांमध्ये नोकरकपात झाली की त्या प्रमाणात देशातील कंपन्यांच्या वस्तूंना मागणी कमी होणार आहे. त्याचा परिणाम खालपर्यंत सर्वच अर्थव्यवस्थेवर होण्याचा धोका आहे. आयटीवाल्यांच्या रोजगारांवर व पैशांवर अवलंबून असणारे इतर शेकडो लोक आहेत. ते वांद्यात येणार आहेत. याचा गंभीरपणे विचार करायला हवा.

विचार

# धास्ती एआय आणि वेतन आयोगाची

***अर्थनगरीतले वारे सतत पालटत असताना गेला काही काळ अर्थक्षेत्रात नवनव्या लक्षवेधी बातम्या ऐकायला मिळाल्या. त्यातील मुख्य बातमी 'एआय'मुळे कर्मचारीवर्गाच्या उडालेल्या झोपेशी संबंधित होती. दरम्यान, आठव्या वेतन आयोगामुळे सरकावर पावणेदोन लाख कोटींचा बोजा पडणार असल्याचे स्पष्ट झाले. याच सुमारास म्युच्युअल फंडात दहा वर्षांमध्ये सहापट वाढ झाल्याचे समोर आले.***



महेश देशपांडे

सरत्या आठवड्यात अर्थनगरीमध्ये संमिश्र बातम्या ऐकायला मिळत होत्या. त्यातील मुख्य बातमी 'एआय'मुळे कर्मचारीवर्गाच्या उडालेल्या झोपेशी संबंधित होती. दरम्यान, आठव्या वेतन आयोगामुळे सरकावर पावणेदोन लाख कोटींचा बोजा पडणार असल्याचे स्पष्ट झाले. याच सुमारास म्युच्युअल फंडात दहा वर्षांमध्ये सहापट वाढ झाल्याचे समोर आले.

या बातम्यांचा वेध घेताना लक्षात आले की कंपन्यांच्या तिमाही उत्पन्नात प्रचंड वाढ होत असूनही अलिकडे कर्मचाऱ्यांना बाहेरचा रस्ता दाखवला जात आहे. मायक्रोसॉफ्टपासून गूगलपर्यंत अनेक महाकाय टेक कंपन्यांमध्ये 'ले ऑफ' थांबत नाही. २०२५ मध्ये 'आर्टिफिशियल इंटेलिजेंस' उलथापालथ करत असून प्रत्येक क्षेत्रात एक नवीन अध्याय लिहिला जात आहे. 'अमेझॉन'ने 'एडब्ल्यूएस क्लाउड डिव्हिजन'मधून मोठ्या संख्येने कर्मचाऱ्यांना काढून टाकले आहे. मेटासह इतर टेक कंपन्यादेखील या कामात मागे नाहीत. एकीकडे 'आर्टिफिशियल इंटेलिजन्स' चांगले भविष्य, जलद वाढ आणि स्मार्ट कामाचे आश्वासन देत आहे. त्याच वेळी जगभरातील हजारो कंपन्यांसाठी भविष्याची अनिश्चितता आणि अस्वस्थतेची रात्र बनली आहे. याचा सरळ अर्थ असा की आता ओरेगॉनमधील इंटेलच्या चिप प्लांटपासून रेडमंडमधील मायक्रोसॉफ्ट, मुंबईतील डिस्ने ऑफिस आणि हैदराबादमधील ॲमेझॉन क्लाउड हब्सपर्यंत हजारो कर्मचाऱ्यांची रात्रीची झोप उडाली आहे. त्यांच्यावर टाळेबंदीची तलवार लटकत आहे.

'अमेझॉन'ने 'एडब्ल्यूएस क्लाउड कॉम्प्युटिंग' विभागातील हजारो कर्मचाऱ्यांना बाहेरचा मार्ग दाखवला आहे. त्या प्रशिक्षण, समर्थन आणि क्लाउड स्पेशालिस्ट युनिट्स या विभागांचा समावेश आहे. २०२५-२६ या आर्थिक वर्षाच्या पहिल्या तिमाहीमध्ये नफ्यात १७ टक्क्यांनी मोठी वाढ झाली असताना अमेझॉनने ही टाळेबंदी केली आहे. ते आपल्या खर्चात कपात करत आहेत. अहवालात म्हटले आहे की कर्मचाऱ्यांना ६० दिवसांच्या पगारासह इतर सुविधा दिल्या जात आहेत. कोणालाही थेट काढून टाकण्याऐवजी 'गूगल'ने धोरणांची पुनर्रचना करत स्वेच्छानिवृत्ती कार्यक्रम आणला. अमेरिकेत काम करणाऱ्या जाहिरात, शोध आणि अभियांत्रिकी विभागासाठी हे नियम लागू केले गेले. 'गूगल'ने सुरू केलेल्या या कार्यक्रमाचा खरा उद्देश कोणालाही कामावरून काढून टाकण्यास भाग पाडण्याऐवजी कर्मचाऱ्यांची संख्या कमी करणे हा होता. सुप्रसिद्ध अमेरिकन टेक कंपनी मायक्रोसॉफ्टदेखील सतत आपल्या कर्मचाऱ्यांची कपात करत आहे. जुलैमध्ये मायक्रोसॉफ्टने सुमारे ९००० लोकांना बाहेरचा रस्ता दाखवला आहे. म्हणजेच त्यांच्या एकूण कर्मचाऱ्यांपैकी सुमारे चार टक्के कर्मचाऱ्यांना कामावरुन काढून टाकण्यात आले आहे. मायक्रोसॉफ्टने २०२५ साठी ८० अब्ज डॉलर्सचा भांडवली खर्च करण्याचे वचन दिले आहे. हा खर्च प्रामुख्याने कृत्रिम पायाभूत सुविधा वाढवण्यावर केला जाईल.

दरम्यान, केंद्र सरकारने आठव्या वित्त आयोगाला मान्यता दिल्यापासून यावर बरीच चर्चा होत आहे. सातव्या वेतन आयोगात कर्मचाऱ्यांचे पगार आणि पेन्शन किती वाढेल, फिटमेंट फॅक्टर किती लागू होईल याबाबत अंदाज बांधले जात आहेत. नवीन वित्त आयोगात पगार सुधारित केल्याने सरकारला मोठा धक्का बसू शकतो. केंद्र सरकारवर १.८ लाख कोटी रुपयांचा अतिरिक्त भार पडू शकतो. 'अँबिट कॅपिटल'च्या मते नवीन वेतन रचनेच्या अंमलबजावणीमुळे एक कोटींहून अधिक कर्मचारी आणि निवृत्तीवेतनधारकांच्या एकूण पगारात ३०-३४ टक्के वाढ होऊ शकते. हा बदल लागू झाल्यास २०२६ किंवा आर्थिक वर्ष २०२७ पासून सुरू होऊ शकतो. यामुळे सरकारी खर्चावर १.८ लाख कोटी रुपयांचा अतिरिक्त भार पडू शकतो. आठव्या वेतन आयोगात पगार वाढवण्याचा सर्वात मोठा आधार फिटमेंट फॅक्टर असेल. या वेळी फिटमेंट फॅक्टर १.८३ ते २.४६ दरम्यान असू शकतो. म्हणजेच सध्या १८ हजार रुपये असलेले किमान वेतन १.८३ फिटमेंट फॅक्टरवर ३२,९४० रुपये आणि २.४६ वर ४४,२८० रुपये पर्यंत जाऊ शकते.

एखाद्याचा मूळ पगार पन्नास हजार रुपये असेल, तर तो कमी फिटमेंटवर ९१,५०० रुपयांपर्यंत तर जास्त फिटमेंटवर १.२३ लाख रुपयांपर्यंत असू शकतो. तसेच, महागाई भत्ता (डीए) महागाईनुसार समायोजित केला जाईल आणि पेन्शनधारकांसाठी देयकेदेखील अद्यतनित केली जातील. हे बदल २०२६ किंवा २०२७ या आर्थिक वर्षापासून लागू केले जाऊ शकतात. तज्ज्ञांचा विश्वास आहे, की आठवा वेतन आयोग अर्थव्यवस्थेसाठी गेमचेंजर ठरू शकतो. एक कोटींहून अधिक कर्मचारी आणि पेन्शनधारकांच्या वाढलेल्या पगारामुळे उपभोग वाढेल. लोक आरोग्यसेवा, गृहनिर्माण आणि विश्रांतीवर अधिक खर्च करतील. किरकोळ, रिअल इस्टेट आणि सेवा क्षेत्रांना याचा मोठा फायदा होईल; परंतु सरकारसाठी हे सोपे असणार नाही.

आता एक लक्षवेधी बातमी. देशाच्या दूरवरच्या भागात पोहोचणाऱ्या म्युच्युअल फंडांनी गेल्या दहा वर्षांमध्ये सहापट वाढ साध्य केली आहे. २०१५ मध्ये एकूण ४१ फंड हाऊसेसचे एयूएम (असेट्स अंडर मॅनेजमेंट) म्हणजेच गुंतवणूकदारांच्या गुंतवणुकीचे मूल्य १२.२९ लाख कोटी रुपये होते. ते आता ७५ लाख कोटी रुपयांच्या जवळपास पोहोचले आहे. तथापि, या दहा वर्षांमध्ये दाईवा, एल अँड टी, जेपी मॉर्गन आणि आयडीएफसीसारखी अनेक फंड हाऊसेस आपला व्यवसाय विकून या उद्योगातून बाहेर पडली. 'असोसिएशन ऑफ म्युच्युअल फंड्स इन इंडिया' (एएमएफआय) नुसार, सध्या ४७ फंड हाऊसेस आहेत. त्यापैकी एक लाख कोटी रुपयांची 'एयूएम' असलेल्या फंड हाऊसेसची संख्या १९ आहे. एक लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त 'असेट्स अंडर मॅनेजमेंट' असलेल्या फंडांमध्ये, निप्पॉन, फ्रँकलिन, आदित्य बिर्ला आणि युटीआय म्युच्युअल फंड्सने या दहा वर्षांमध्ये सर्वात कमी वाढ दर्शवली. २०१५ मध्ये तिसऱ्या क्रमांकावर असलेले निप्पॉन आता चौथ्या क्रमांकावर आले आहे. त्यांचे 'असेट्स अंडर मॅनेजमेंट' चार पटींनी वाढून १.४४ लाख कोटी रुपयांवरून ६.१२ लाख कोटी रुपये झाले आहेत. 'फ्रँकलिन टेम्पल्टन'चे 'एयूएम' ७४,३११ कोटी रुपयांवरून दीडपट वाढून १.१४ लाख कोटी रुपये झाले आहे. युटीआय पाचव्या स्थानावरून आता सातव्या स्थानावर घसरले आहे. त्याची 'असेट्स अंडर मॅनेजमेंट' ९२,७३० कोटींवरून चारपट वाढून ३.६० लाख कोटी झाली आहे. आदित्य बिर्ला चौथ्या स्थानावरून सहाव्या स्थानावर आला आहे. त्याची 'असेट्स अंडर मॅनेजमेंट' १.२५ लाख कोटींवरून तीन पटींनी वाढून ४.०३ लाख कोटी रुपये झाली आहेत.

एक लाख कोटींपेक्षा जास्त 'असेट्स अंडर मॅनेजमेंट' असलेल्या फंडांमध्ये 'एडलवाईस'ने सर्वाधिक वाढ पाहिली आहे. २०१५ मध्ये त्याची 'असेट्स अंडर मॅनेजमेंट' फक्त १,१४८ कोटी होती. ती आता १.४८ लाख कोटी रुपये झाली आहे. मिराई ९९ पटीने वाढून दुसऱ्या स्थानावर गेले आहे. त्याची 'असेट्स अंडर मॅनेजमेंट' १,९८१ कोटी रुपयांवरून १.१८ लाख कोटींवर पोहोचली आहे. 'एचएसबीसी ची 'असेट्स अंडर मॅनेजमेंट'१७ पटींनी वाढून १.२९ लाख कोटींवर पोहोचली आहे. 'मोतीलाल ओसवाल'ची 'असेट्स अंडर मॅनेजमेंट' ३८ पटींनी वाढून १.०४ लाख कोटींवर पोहोचली आहे तर 'पीपीएफएएस'ची 'असेट्स अंडर मॅनेजमेंट' १९ पटींनी वाढून १.१६ लाख कोटींवर पोहोचली आहे. भारतीय बाजारपेठेत किरकोळ गुंतवणूकदारांचा सहभाग सतत वाढत आहे. यामुळेच २०१९ मध्ये डिमॅट खात्यांची ३.६ कोटी असलेली संख्या २०२५ मध्ये १९.४ कोटींवर पोहोचली. 'सेबी'च्या मते, या काळात सूचीबद्ध कंपन्यांमधील देशांतर्गत संस्थात्मक गुंतवणूकदारांची मालकी १३ टक्क्यांवरून २० टक्क्यांपर्यंत वाढली. तथापि, परदेशी गुंतवणूकदारांची मालकी २२ टक्क्यांवरून १७ टक्क्यांपर्यंत कमी झाली. 'सेबी'च्या मते गेल्या दहा वर्षांमध्ये भारतीय कंपन्यांनी शेअर्स आणि कर्जाद्वारे सुमारे ९३ लाख कोटी रुपये उभारले आहेत. २०२४-२५ मध्ये इक्विटी जारी करून विक्रमी ४.३ लाख कोटी रुपये उभारले गेले. त्यात 'आयपीओ'मधून १.७ लाख कोटी रुपये जमा झाले.

चर्चा आजची

# मतदानासाठी नागरिकत्वाचा आधार महत्वाचा

सुयोग आंग्रे

बिहारमधील मतदारांच्या यादीचा आढावा घेण्यासाठी वैध कागदपत्रांच्या यादीमध्ये आधार कार्ड आणि मतदार आयडीचा समावेश करण्याचे आदेश देऊन सर्वोच्च न्यायालयाने सामान्य लोकांना मोठा दिलासा दिला आहे. अशी अपेक्षा केली जाऊ शकते की यामुळे सर्वसामान्यांसाठी प्रक्रिया सुलभ होईल आणि त्याची चिंता दूर होईल.राजकीय गोंधळाच्या पलीकडे पाहिल्यास, हा एक संवेदनशील आणि महत्वाचा मुद्दा आहे. त्यात खोलवर परिणाम होत आहेत, कारण घटनेत अशी तरतूद आहे की २५ वर्षांहून अधिक लोकांचा मतदार आमदार, खासदार, मुख्यमंत्री आणि अगदी देशातील कोणत्याही भागातील पंतप्रधान बनू शकतो.
विशेष गहन पुनरावृत्ती म्हणजे एसआयआर. विरोधी पक्षाचा असा आरोप आहे की विशिष्ट विभागातील लोकांना पुनरावृत्तीच्या सबबेवर मत देण्याचा अधिकार नाकारला जात आहे. संसदेच्या पावसाळ्याच्या अधिवेशनात बरीच गोंधळ उडाला आहे. अशा परिस्थितीत प्रत्येकजण सर्वोच्च न्यायालयाच्या या सुनावणीकडे पहात होता. असे मानले जाऊ शकते की कोर्टाचा आदेश गतिरोध टाळण्यास मदत करेल. म्हणूनच, अशी निवडणूक आयोगाची जबाबदारी बनली आहे की अशा कोणत्याही व्यक्तीने मतदार होऊ नये जो भारताचा नागरिक नाही. हे सुनिश्चित करण्यासाठी घटनेने निवडणूक आयोगाला पुरेसे हक्क दिले आहेत. निवडणूक आयोगाला निवडणूक रोल आणि स्वतंत्र आणि निःपक्षपाती घटकांची देखभाल करण्याची शक्ती देते आणि त्याचे कार्य परिभाषित करते. त्याच वेळी,शी तरतूद केली आहे की लोकसभा आणि प्रत्येक राज्यातील विधानसभा प्रौढांच्या मताधिकाराच्या आधारे असेल, या



संदर्भात कायद्याद्वारे भारताचे प्रत्येक नागरिक अशा कोणत्याही निवडणुकीत मतदान म्हणून नोंदणीकृत केले जातील.
शेवटच्या सुनावणीदरम्यान सर्वोच्च न्यायालयाने आधार आणि मतदार कार्ड तसेच रेशन कार्ड्स दस्तऐवजांच्या यादीमध्ये समाविष्ट करण्याचे सुचवले होते. तथापि, या कागदपत्रांवर विश्वास ठेवता येणार नाही असे म्हणत निवडणूक आयोग हे टाळत होते. परंतु, यामुळे बिहारच्या सामान्य लोकांसमोर समस्या उद्भवल्या. कागदपत्रे मिळविण्यासाठी सरकारी विभागांमध्ये किती काळ ओळी तयार केल्या जात आहेत अशा राज्यातून असे अहवाल आले आहेत. लोकांची भीती आहे की त्यांचे मतदानाचे हक्क संपतील. आज सर्वात मूलभूत कागदपत्रांपैकी आधार आणि मतदार कार्डे आहेत. अशा परिस्थितीत, सर्वोच्च न्यायालयाची वृत्ती लोकांच्या अडचणीला मोठ्या प्रमाणात सोडवू शकते. जो भारताचा नागरिक नाही तो मतदार म्हणून नोंदणी करण्यास पात्र नाही. अशाप्रकारे, संसदेने मंजूर केलेले राज्यघटना आणि निवडणूक कायदे या दोघांनीही स्पष्टपणे कबूल केले आहे की केवळ भारतीय नागरिकांना मतदानाचा हक्क मिळू शकतो.
सर्वोच्च न्यायालयाने मतदारांची मसुदा थांबविला नाही आणि मंगळवारी शेवटची सुनावणीची तारीख निश्चित केली जाईल असे सांगितले. जेव्हा इतकी मोठी प्रक्रिया सुरू होते, तेव्हा मध्यभागी थांबविणे हे कोणत्याही समस्येचे निराकरण नसते. प्रक्रियेदरम्यान होणाऱ्या समस्या समजून घेण्याची आणि त्यावर मात करण्याची गरज आहे. निवडणूक आयोगाने असेही म्हटले आहे की एखाद्याच्या मतदानाचे हक्क पूर्ण संधी न देता रद्द केले जाणार नाहीत. मतदारांना अजूनही मतदारांच्या यादीमध्ये स्थान मिळविण्याची संधी आहे.
विशेष गहन पुनरावृत्ती यासंदर्भात खूप विरोध आहे कारण त्यासंदर्भात अनेक शंका विरोधी आणि सामान्य लोकांच्या मनात आहेत. दुसरे म्हणजे, ही प्रक्रिया नंतर संपूर्ण देशात केली जाईल. जर निवडणूक आयोगाच्या आकडेवारीनुसार, बिहारमधील ६६ लाखांची नावे मतदारांच्या यादीमधून कमी केली जाऊ शकतात तर त्याचा राजकीय परिणाम खूप खोल असेल. पारदर्शकता आणि विश्वासाने या भीती आणि भीतीवर मात केली जाऊ शकते. निवडणूक आयोगाने प्रत्येक कायदेशीर निकषानुसार पुढे सरकले पाहिजे. तसेझाल्यास नागरिकत्वाच्या आधारावर प्रत्येक भारतीयाला खऱ्या अर्थाने आपले विचार आणि मत मांडण्याचे सार्वभौमत्व मिळेल.

लोकसंसद

## मराठमोळ्या दिव्या देशमुखचे अभिनंदन!

नागपूरच्या दिव्या देशमुखने जॉर्जिया देशातील बटुमी या शहरात ६ जुलै ते २८ जुलै दरम्यान पार पडलेल्या फिडे महिला बुद्धिबळ विश्वचषक स्पर्धेत भारताच्याच आंध्रप्रदेशच्या अनुभवी आणि जागतिक स्तरावर प्रसिद्ध असलेल्या कोनेरू हम्पीला पराभूत करून महिला बुद्धिबळ विश्वचषकावर आपले नाव कोरले. या विश्वविजेतेपदामुळे दिव्याला आपोआपच प्रतिष्ठित ग्रँडमास्टरचा किताब मिळाला असून ५०००० यूएस डॉलरचे (अंदाजे ४३ लाख रुपये) बक्षीस मिळणार आहे. खरे तर या स्पर्धेत दिव्यासह भारताच्या नऊ महिला बुद्धिबळपटूंसह जगातील ४६ वेगवेगळ्या बुद्धिबळ महासंघांमधील एकूण १०७ सर्वोत्तम महिला बुद्धिबळपटूंनी भाग घेतला होता. त्यातही जागतिक पातळीवरील सध्याच्या टॉप वीसपैकी सतरा खेळाडूंचा समावेश होता. त्यामुळे अवघ्या १९ वर्षाच्या दिव्याचे हे यश अधिकच उजळून निघाले आहे. लहानपणापासून बुद्धिबळ खेळात पारंगत असलेल्या दिव्याला २०१३ मध्ये जगातील सर्वात लहान महिला फिडे मास्टर ही पदवी मिळाली. २०१८ मध्ये महिला आंतरराष्ट्रीय मास्टर, २०२१ मध्ये महिला ग्रँडमास्टर आणि २०२३ मध्ये दिव्याने आंतरराष्ट्रीय मास्टर ही सर्वोच्च पदवी मिळवली. या विश्वविजेतेपदामुळे दिव्या आता २०२६ मध्ये होणाऱ्या महिला कँडिडेट्स बुद्धिबळ स्पर्धेसाठी पात्र ठरली आहे. बुद्धिबळ जगतात भारताचा तिरंगा डौलाने फडकवणाऱ्या मराठमोळ्या दिव्या देशमुखचे अभिनंदन !

**-प्रदीप अनुसया शंकर मोरे**

## कायद्यापुढे सगळेच समान

पुण्यातील अंमली पदार्थ प्रकरणात एकनाथ खडसे यांचे जावई डॉ. प्रांजल खेवलकर यांचे नाव समोर आल्यावर खडसे यांनी पोलिसांच्या कारवाईवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. सात जण फ्लॅटमध्ये बसले होते, डान्स नव्हता, मग रेव्ह पार्टी कशी, असा त्यांचा प्रश्न होता. पण मूळ मुद्दा ''रेव्ह'' आहे की नाही, हा नसून, अंमली पदार्थ सापडले की नाही, हाच आहे. खेवलकर यांच्यावर यापूर्वी एकही गुन्हा नसल्याचे खडसे सांगतात, हे खरे असले तरी अंमली पदार्थ मिळाल्यावर चौकशी होणं स्वाभाविकच आहे. पोलिसांची कारवाई यासाठी चुकीची म्हणता येणार नाही. मात्र, खडसे यांनी काही दिवसांपूर्वी गिरीश महाजनांवर आरोप केले होते. त्यामुळे ही कारवाई राजकीय हेतूने झाली असावी, असा एक मतप्रवाहही आहे. या पार्श्वभूमीवर सरकारची भूमिकाही काहीशी संदिग्ध वाटते. तरीही, जावई आहेत म्हणून त्यांच्यावर चौकशी होऊ नये, किंवा ते पहिल्या क्रमांकाचे आरोपी ठरू नयेत, हा युक्तिवाद फारसा ग्राह्य वाटत नाही. नातेसंबंध बाजूला ठेवून कायद्याला काम करू दिलं पाहिजे, हेच अधिक योग्य.

**दीपक काशिराम गुंडये, वरळी.**

दिनविशेष

# माळीण गावात दरड कोसळून अनेक जणांचा मृत्यू

आजच्याच दिवशी पुणे जिल्ह्यातील घडलेल्या एक घटनेने केवळ महाराष्ट्रच नव्हे तर संपूर्ण देश हादरला होता. रात्री गाढ झोपेत असताना काळाने घाला घातला आणि हसतं-खेळतं टुमदार गाव उद्ध्वस्त झालं. तब्बल १५१ गावकऱ्यांनी झोपेतच शेवटचा श्वास घेतला. ही बाब पसरताच महाराष्ट्र हादरून गेला होता.

पुणे जिल्ह्याच्या आंबेगाव तालुक्याच्या पश्चिम भागात असणाऱ्या माळीणची दुर्घटना अनेकांच्या आयुष्यात कायमची व्रण ठेवून गेली. आज या घटनेला दहा वर्ष पूर्ण झाली. मात्र अजूनही या भागातील आदिवासी जनतेच्या मनातून त्या घटनेची भीती कायम आहे. १५१ बांधवांचा जीव




घेणारी ही दुर्घटना शत्रूच्याही वाट्याला येऊ नये अशीच मागणी कोणाकडूनही केली जाईल.

या ठिकाणी माळीण गावाचं पुनर्वसन तर झालं मात्र जी माणसं गेली जे गाव याच्यामध्ये संपूर्ण नष्ट झालं त्याच्या आठवणी अजूनही तशाच आहेत. मंचरकडून आहुपे गावाकडे जाणाऱ्या रस्त्यावर डिंभे धरणाच्या अगदी आत सत्तावीस किलोमीटरवर असणार छोटसं माळीण गाव... एरवी कधीही कोणाच्या लक्षातही आलं नसतं मात्र या गावावर दरड कोसळली आणि एक नवे दोन नव्हे तर तब्बल १५१ लोक यात गाडली गेली. ही घटना जेव्हा जगासमोर आली तेव्हा जग निश्चितच हळहळत होतं.. मात्र ही घटना पहिल्यांदा समोर आली ती एका एसटी ड्रायव्हरमुळे आणि इथून पुढे प्रशासनासह सगळ्यांचीच धावपळ उडाली. सर्वत्र एकच आक्रोश सुरू असताना येथील एका घरातील लहानग्याने आपल्या आईला घट्ट मिठी मारली होती. इथे मदत कार्य करणाऱ्या तरुणांच्या नजरेला हे दृश्य पडलं...त्यांनी ताबडतोब हालचाल करून ढिगाऱ्या खालून आईला दोन महिन्यांच्या रुद्रासह बाहेर काढलं. आता हा रुद्र पाचवीमध्ये आहे. अशा एक ना अनेक कहाण्या या माळीनच्या दुर्घटनेसोबत जोडल्या गेल्या आहेत. आता या रुद्रला त्या आठवतही नाहीत. मात्र याच्या सारखीच अनेक लहान मुलं या कथा ऐकत मोठी होत आहेत.

दिलीप लेंभे हे पत्नी, भाऊ, भावजय आणि त्यांची चार मुले यांच्यासह माळीणमध्ये राहत होते. डोंगर कुशीमध्ये असणाऱ्या भात शेतीवरच ते पोटाची खळगी भरत होते. त्या दिवशी सकाळी भात शेतीच्या काही कामासाठी ते बाहेर पडले आणि हा डोंगर कोसळला. या दुर्घटनेत त्यांच्या कुटुंबातील तब्बल दहा जणांचा जीव गेला. आजही या डोंगर कपाऱ्यांमधील अशीच काही गावं आजही भीतीच्या छायेखाली वावरत आहेत. नुकतेच माळीणच्या वरच्या बाजूला असलेल्या कुंभेवाडी जवळील घाटामध्ये दरड कोसळली होती. अशाच पद्धतीच्या छोट्या मोठ्या दरडी या भागात कोसळत असतात. जेव्हा अधिकचा पाऊस होतो तेव्हा येथील गावकऱ्यांच्या हृदयाचे ठोके वाढतात. त्यामुळे प्रशासनाने डोंगर कुशीमध्ये असणाऱ्या गावांची वेळीच दखल घेणं देखील गरजेचे आहे. पुन्हा असं माळीण होणं आपल्याला परवडणार नाही.

## अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

३० जुलै

१) श्रीम. सुरेखा अविनाश बिडये विद्यानगर, अलिबाग, ३०-७-१९४८
२)श्रीम. युधिष्ठिर जगदीश त्यागी चेंढरे-अलिबाग ३०-७-१९५४
३)श्री.विवेकानंद नारायण भागवत कुरूळ, अलिबाग ३०-७-१९६२
४)छगनलाल शेषमल ओसवाल बाजारपेठ, अलिबाग ३०-७-१९४९

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.


**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)**
**९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**

आजचे अन्नदाते

**वीणा विनोद नार्वेकर, वाढदिवस अलिबाग**

## सुवर्णकण



शुद्ध आचार विचार असल्याशिवाय उत्तम गती मिळणारच नाही. सद्गुरु नी दाखवलेल्या पायवाटेने विवेक तीर्थावर जाऊन, यमनियमानी शरीरशुद्धी साधलीच पाहिजे असा भगवान श्री ज्ञानदेवांचा आग्रह आहे.

**श्रीज्ञानेश्वरभावहृदय**
**आबामहाराज परांजपे**
**साधना आश्रम,**
**दातार आळी, पेण.**

# स्मशानभूमीचा प्रश्न कायम

## ● गोवळकोट-पेठमाप समितीकडून उपोषणाचा इशारा

**। चिपळूण । प्रतिनिधी ।**

**चिपळूण शहरातील गोवळकोट, पेठमाप स्मशानभूमीचा प्रश्न गेल्या ३७ वर्षांपासून सुटलेला नाही. त्यामुळे गोवळकोट-पेठमाप स्मशानभूमी समिती स्वातंत्र्यदिनी नगर परिषदेसमोर आमरण उपोषण करणार असल्याचे निवेदन जिल्हाधिकाऱ्यांसह मंत्र्यांना देण्यात आले आहे.**

निवेदनात म्हटले आहे की, शहरातील गोवळकोट, पेठमाप येथील बौद्ध समाजाच्या कदमवाडी, ताराचीवाडी, सुभेवाडी, गोवळकोट रोड, पेठमाप अशा पाच वाड्या पूर्वापार वास्तव्य करीत आहेत. गेली ६० वर्षे येथील नागरिक गोवळकोटरोड येथील २६ गुंठ्यामध्ये असणाऱ्या स्मशानभूमीचा वापर करत आहोत. ही स्मशानभूमी वाशिष्ठी नदीकाठी असल्याने पावसाळ्यात या भागाची सातत्याने झीज होत असल्याने स्मशानभूमीचा काही भाग नदीत वाहून गेला आहे. तर अतिवृष्टीकाळात येथे दफन करणे अवघड बनत असून अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. यासंदर्भात आमदार शेखर निकम, तहसीलदार, मुख्याधिकारी यांच्याकडे अनेकदा पत्रव्यवहार करण्यात आला आहे.

त्यामध्ये स्मशानभूमीला नदीकाठी संरक्षक भिंत बांधणे, ६ फूट उंच संरक्षक कट्टा बांधावा, स्मशानभूमीकडील रस्त्याचे रुंदीकरण करुन उंची वाढवावी, विजेची व्यवस्था करावी, पाण्याची सोय करावी, स्मशानशेड बांधावी, दफन करण्यासाठी आवश्यक असणारे साहित्य ठेवण्यासाठी शेड बांधावी, अशा मागण्या केल्या आहेत. मात्र, या मागण्यांकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात आहे. यासंदर्भात आमदार निकम यांनी नगर परिषदेला या मागण्यांबाबत लेखी पत्र देऊन तातडीने कामांची पूर्तता करावी अशा सूचना केल्या आहेत.

मात्र, स्मशानभूमीत दहन करण्यासाठी शेड उभारण्यापलिकडे नगर परिषदेने कोणतेही काम केलेले नाही. स्मशानभूमीकडे जाणारा रस्ता पूर्वीचा सरकारी गोवंड हा सध्या अस्तित्वात असून त्याची रुंदी सुमारे ४ मीटर आहे. सध्या तो रस्ता नगर परिषदेच्या ताब्यात असून लगतचे जमीनधारकही शेतीच्या कामासाठी याच रस्त्याचा वापर करतात.

या रस्त्याला झाडा-झुडपांनी वेढले आहे. त्यामुळे तो मोकळा करुन रस्त्याचे डांबरीकरण करण्यात यावे. तसे केल्यास वाहनातून मृतदेह स्मशानापर्यंत नेणे शक्य होणार आहे. मात्र ते कामही केले जात नाही. त्यामुळे स्मशानभूमीसारख्या विषयासाठी इतकी वर्षे झगडावे लागत आहे. त्यामुळे स्वातंत्र्यदिनी उपोषण करणार असल्याचे नमूद केले आहे.

या निवेदनाच्या प्रती पालकमंत्री उदय सामंत, आमदार शेखर निकम, प्रांताधिकारी आकाश लिगाडे, उपविभागीय पोलीस अधिकारी राजेंद्रकुमार राजमाने, तहसीलदार प्रवीण लोकरे, मुख्याधिकारी विशाल भोसले यांना देण्यात आल्या आहेत.



# केमिकलने भरलेला टँकर उलटला

## गुगल मॅपवरील शॉर्टकट पडला महागात

**। संगमेश्वर । प्रतिनिधी ।**

गोव्याहून मुंबईच्या दिशेने येताना गुगल मॅपवर शॉर्टकट शोधून फुणगुसमार्गे प्रवास करणारा केमिकलने भरलेला आयशर टेम्पो उलटून अपघात झाला. या अपघातात आयशरमधील केमिकलने भरलेले बॅरल जंगलात वाहून गेल्याने मोठे नुकसान झाले आहे. सुदैवाने आयशर चालकाने गाडीतून उडी मारल्यामुळे जीवितहानी टळली.

गोवा महामार्गावरून मुंबईकडे कलरसाठी लागणारे ४७ बॅरल घेऊन आयशर टेम्पो येत होता. निवळी येथे आल्यानंतर त्याने गुगल मॅपचा आधार घेतला. गुगल मॅपने फुणगुस आणि ऊक्षी मार्ग दाखवला. मात्र ऊक्षी मार्गावरील अवघड वळणामुळे त्याने जाकादेवी फुणगुसमार्गे संगमेश्वरला जाण्याचा निर्णय घेतला. फुणगुस येथे सकाळी एका अवघड वळणावर वाहनावरील ताबा सुटल्याने आयशर उजव्या बाजूला कलंडला. यामध्ये असलेले ४७ बॅरलपैकी ३० बॅरल शिल्लक राहिले आहेत. बाकीचे बॅरल उतारावरील जंगलात वाहून गेले आहेत. आयशरचे यामध्ये मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.

# आवास योजनेची घरे रखडली

**। चिपळूण । प्रतिनिधी ।**

खेड तालुक्यातील शिव खुर्द-सुतारवाडी येथे पंतप्रधान आवास योजनेंतर्गत ४ ते ५ लाभार्थ्यांची घरे मंजूर झाली. सहा महिन्यापूर्वी लाभार्थ्यांनी स्वतःची घरे जमिनदोस्त करत नवीन घरे बांधण्याचे काम हाती घेतले. मात्र, या लाभार्थ्यांना घरांचे हप्तेच दिले नसल्याने घरे रखडली आहेत. येत्या १० दिवसात लाभार्थ्यांना घरांचे हप्ते अदा न केल्यास १५ ऑगस्ट रोजी लाभार्थ्यांसमवेत उपोषण छेडण्याचा इशारा मनसेचे माजी तालुकाध्यक्ष संदीप फडकले यांनी दिला आहे.

घरांचे हप्ते मिळण्यासाठी लाभार्थी पंचायत समितीत खेटे घालत आहेत. स्वतःची घरे उद्ध्वस्त केल्यापासून लाभार्थी शेजारी तसेच नातेवाईकांकडे आश्रयाला आहेत. मात्र, घरांचे हप्तेच अदा केले नसल्याने लाभार्थ्यांची कोंडी झाली आहे. शेजारी अथवा नातेवाईकांकडे किती दिवस आसरा घ्यायचा, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. निधी उपलब्ध झाला नसल्याचे उत्तर लाभार्थ्यांना अधिकाऱ्यांकडून दिले जात आहे. निधीच नव्हता तर घरे मंजूर का केली, असा प्रश्नही उपस्थित केला जात आहे. ६ महिने लोटून देखील अद्याप लाभार्थ्यांना हप्ते देण्यात आलेले नाहीत.



● ६ महिन्यांपासून लाभार्थी हप्त्याच्या प्रतीक्षेत

या पार्श्वभूमीवर प्रशासनाला खडबडून जागे करण्यासाठी उपोषणाचा निर्णय लाभार्थ्यांनी घेतला आहे. हप्ते अदा करण्यासाठी १० दिवसाची डेडलाईन दिली आहे. याकालावधीत निश्चित कार्यवाही न झाल्यास उपोषणावर ठाम राहणार असल्याचे लाभार्थ्यांचे म्हणणे आहे.

# तरुणाची गळफास घेऊन आत्महत्या

**पुणे** : बुरुंजवाडी (ता. शिरूर) येथील रोहन अंकुश पवार (वय २३, रा. पद्मावती वस्ती, बुरुंजवाडी) या तरुणाने साडीच्या साहाय्याने राहत्या घरातच गळफास घेऊन आत्महत्या केली आहे. याबाबत शिक्रापूर पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, बुरुंजवाडी येथील पुष्पा पवार या घरात स्वयंपाक करत असताना त्यांचा मुलगा रोहन घरात बसलेला होता. स्वयंपाक झाल्यावर पुष्पा मुलाला जेवायला बोलवायला गेल्या असता त्यांना रोहनने गळफास घेतल्याचे दिसून आले. दरम्यान, नागरिकांनी त्याला उपचारासाठी जवळील रुग्णालयात नेले असता, डॉक्टरांनी रोहनला उपचारापूर्वीच मृत्यू झाल्याचे घोषित केले.

# जळगावात घातक रसायनांपासून दूधनिर्मिती

**। जळगाव । प्रतिनिधी ।**

जळगावमधील धरणगाव तालुक्यातील भवरखेडे येथे घातक रसायनांपासून दूध तयार करून ते ग्राहकांना विकणाऱ्या एका तरूणाला अटक करण्यात आली. ही कारवाई अन्न व औषध प्रशासन आणि पोलिसांच्या पथकाने सोमवारी (दि. २८) मध्यरात्री केली. या प्रकरणी संशयिताच्या विरोधात गुन्हा दाखल झाला असून, सुमारे ८० लिटर भेसळयुक्त दूध नष्ट करण्यात आले आहे.

धरणगाव तालुक्यात भवरखेडा येथे सोमनाथ आनंदा माळी (३१) हा तरूण आरोग्यास अपायकारक असलेल्या रसायनांचा वापर करून भेसळयुक्त दुध तयार करून ग्राहकांना राजरोसपणे विकत होता. त्याबाबतची माहिती जळगाव येथील



## तरूणाला अटक

अन्न व औषध प्रशासनाचे अन्न सुरक्षा अधिकारी किशोर साळुंखे यांना मिळाली होती. त्याची खात्री करून त्यांनी धरणगाव पोलीस ठाण्याला त्याविषयी माहिती दिली. पोलीस कर्मचारी मदतीला घेऊन सोमवारी मध्यरात्री भवरखेडा येथे नियोजनबद्ध छापा टाकण्यात आला. यावेळी सोमनाथ माळी हा रसायनांचा वापर करून दूध तयार करत असल्याचे आढळून आले. पोलिसांनी ताब्यात घेऊन चौकशी केली असता त्याने गुन्ह्याची कबुली दिली. अन्न सुरक्षा अधिकारी साळुंखे यांनी दिलेल्या तक्रारीवरून संशयित सोमनाथ याच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आल्यानंतर त्याच्याजवळील सर्व रसायने जप्त करण्यात आली.

# कारची दुचाकीला धडक; पती-पत्नी ठार

**नागपूर** : चंद्रपूर-नागपूर महामार्गावरील साखरवाही फाट्या जवळील ताडाळीच्या सीडीसीसी बँकजवळ भीषण अपघात झाला. एका कारने दुचाकीला धडक दिली. या धडकेत दुचाकीवरील पती व पत्नी गंभीर जखमी झाल्याने त्यांचा मृत्यू झाला. भद्रावती तालुक्यातील मूर्सा निवासी सुभाष पुंडलिक कामतवार (४५) तर गिरजा सुभाष कामतवार (४२) असे मृत दांपत्याचे नाव आहे. हंगामी व्यवसाय करणारे हे दाम्पत्य नेहमीप्रमाणे नागपंचमीच्या पर्वावर व्यवसाय करण्यासाठी साहित्य खरेदी करण्यासाठी चंद्रपूर येथे गेले होते. विक्रीचे साहित्य खरेदी करून आपल्या दुचाकीने मूरसाकडे जात होते. याचवेळी चंद्रपूर-नागपूर महामार्गावरील साखरवाही फाट्याजवळील ताडाळीच्या चंद्रपूर मध्यवर्ती बँकेच्या समोर मागून येणाऱ्या कारने त्यांच्या दुचाकीला धडक दिली.

यात सुभाष व त्यांची पत्नी गिरजा हे गंभीर जखमी झाले. उपचारासाठी त्यांना चंद्रपूरच्या कोल सिटी या खासगी रुग्णालयात दाखल केले. परंतु प्रकृती गंभीर असल्याने; त्यांना पुढील उपचारासाठी नागपूरला रवाना केले. मात्र या दरम्यान त्यांना वरोरा येथील उपजिल्हा रुग्णालयात नेण्यात आले तिथे त्यांना मृत घोषित केले.

# ऐन पावसाळ्यात पाच दिवस पाणीटंचाई



**। रत्नागिरी । प्रतिनिधी ।**

रत्नागिरी तालुक्यातील काळबादेवी ग्रामपंचायतमध्ये येणाऱ्या पाटीलवाडी आणि कदमवाडीत गेले पाणीपुरवठा झालेला नाही. त्यामुळे या दोन्ही वाडीतील ग्रामस्थांकडून संताप व्यक्त होत आहे.

जलस्वराज्य योजनेतून या गावात नळपाणी योजना सुरू करण्यात आली आहे. मात्र, पाटीलवाडी आणि कदमवाडीतील ग्रामस्थांना अनेकवेळा पाण्यापासून वंचित राहावे लागते. भरपावसात गेले पाच दिवस पाटीलवाडी आणि कदमवाडीत पाणी पुरवठा झालेला नाही. श्रावण महिन्यातच पाण्याची बोंब झाल्याने ग्रामस्थ संतापले आहेत. काळबादेवी ग्रामपंचायतीच गावातील पाणी पुरवठा सुरळीत व्हावा यासाठी लक्ष द्यावे, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

# मोफत आरोग्य शिबीर

**चिपळूण** : साम्राज्य ग्रुप फाउंडेशन कोकण विभागातर्फे तालुक्यातील खेर्डी येथील संजीवनी सर्जिकल व जनरल हॉस्पिटलमध्ये सोमवारी (दि. २८) सकाळी १० ते दुपारी ३ या वेळेत मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. साम्राज्य ग्रुप फाउंडेशन महाराष्ट्र राज्य ही विधायक शैक्षणिक, सामाजिक व अन्यायाविरुद्ध लढणारी संघटना आहे. या शिबिरात डॉ. अक्षय विजय यादव व स्त्रीरोग व प्रसुती तज्ज्ञ डॉ. पूजा ओंकार भुरण यांनी रूग्णांना सल्ला, उपचार व मार्गदर्शनदेखील केले. या शिबिराच्या यशस्वीतेसाठी विनायक शिरगांवकर, अक्षय पवार यांनी विशेष मेहनत घेतली.

# काळू नदीच्या पुलावर भलेमोठे भगदाड

**। ठाणे । प्रतिनिधी ।**

शहापूर-मुरबाड या दोन तालुक्यांना जोडणाऱ्या महामार्गावरील काळू नदीच्या पुलावर भगदाड पडले आहे. त्यामुळे या पुलाच्या बांधकामाच्या दर्जाविषयी प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. यावर कायमस्वरूपाची तात्काळ उपाययोजना करावी, अशी मागणी प्रवाशांकडून होत आहे.

महाराष्ट्र राज्य रस्ते व विकास महामंडळ अर्थात एमएसआरडीसीच्या नियंत्रणाखाली शहापूर-मुरबाड-म्हसा-पाटगाव-कर्जत ५४८ ए या राष्ट्रीय महामार्गाचे रुंदीकरण व मजबुतीकरण करण्याचे काम आजतागायत सुरु आहे. या मार्गावरील काळू नदीच्या पुलावरील जोड असलेल्या भागातील सिमेंट गळून पडल्याने या पुलावर मोठा खड्डा पडलेला दिसून येत आहे. या भगदाडात एखाद्या वाहनाचे चाक अडकून मोठा अनर्थ घडण्याची शक्यता नाकारता येणार नसल्याचे स्थानिक ग्रामस्थांनी सांगितले. मुळात हा संपूर्ण रस्ता तयार होतांना कधीही जबाबदार अधिकारी पर्यवेक्षण करताना दिसून आला नाही. त्यामुळे या रस्त्याच्या दर्जाबाबत साशंकता दिसून येत आहे. दरम्यान या काळू नदीवरील पुलावर पडलेल्या भगदाडाची तत्काळ दुरुस्ती करावी, अशी मागणी प्रवासी करत आहेत.



मागील आठ वर्षापासून सुरू असलेल्या या महामार्गाच्या कामामुळे स्थानिकांना खूप त्रास सहन करावा लागत आहे. दोन वर्षापूर्वी पावसाळ्याच्या आधी घाईघाईने या पुलाचे काम एमएसआरडीसीने पूर्ण केल्याने या पुलाचा सुरुवातीचा भाग खचला आहे. भविष्यातही या पुलामुळे मोठी दुर्घटना होण्याची शक्यता नाकारता येत नाही, अशी भीती ग्रुप ग्रामपंचायत दहिवलीचे उपसरपंच दत्तात्रय पाटील यांनी व्यक्त केली आहे.

# अमली पदार्थाची विक्री करणारे दोघे ताब्यात

## लाखोंचा मुद्देमाल जप्त

**। नाशिक । प्रतिनिधी ।**

परराज्यातून गावठी कट्टे आणून नाशिकमध्ये विक्री करणाऱ्या सराईत गुन्हेगाराला एमडी (मॅफेड्रॉन) नामक अमली पदार्थाची विक्री करताना नाशिक रोड पोलिसांनी अटक केली आहे. साथीदारासह ताब्यात घेतलेल्या दोघांकडून सुमारे एक लाखांचे २९.९ ग्रॅम एमडी ड्रग्ज आणि कार असा सुमारे सव्वा बारा लाखांचा मुद्देमाल पोलिसांकडून जप्त करण्यात आला आहे. याप्रकरणी नाशिक रोड पोलिसात एनडीपीएस कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



राहुल संदीप सोनवणे (३३, रा. फर्नांडिसवाडी, जयभवानी रोड, नाशिकरोड) आणि केतन पांडुरंग पोले (२५, रा. जाचक मळा, जय भवानी रोड, नाशिकरोड) अशी अटक केलेल्या दोघांची नावे आहेत.

सराईत गुन्हेगार राहुल सोनवणे हा साथीदार केतन पोले याच्यासमवेत रविवारी (दि. २७) सायंकाळी जेलरोड ते बिटको चौकाकडे जाणाऱ्या रस्त्यालगत एमडी अमलीपदार्थाची विक्री करण्यासाठी आला होता. याची खबर नाशिक रोड पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक जितेंद्र सपकाळे यांना मिळाली असता, पथकाने सापळा रचून दोघांना ताब्यात घेतले. तसेच त्यांच्याकडून ९८ हजारांचे २९.९ ग्रॅम एमडी आणि अकरा लाखांची कार असा १२ लाख १८ हजार ४०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

हवालदार विजय टेमगर यांच्या फिर्यादीनुसार, नाशिक रोड पोलिसात एनडीपीएस कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. राहुल गावठी कट्टे विक्रेताबहिणीकडे वास्तव्यास असलेला राहुल सोनवणे हा सराईत गुन्हेगार असून त्याच्याविरोधात नाशिकसह जिल्ह्यात व परजिल्ह्यात १८ ते २० विविध गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल आहेत. तसेच, तो पूर्वी परराज्यातून गावठी कट्टे आणून नाशिकमध्ये विक्रीसाठी प्रसिद्ध होता.

# महानगरपालिकेचे आरोग्य केंद्र डॉक्टरांविना

## ● रुग्णांना खासगी रुग्णालयाचा आधार

**। पुणे । प्रतिनिधी ।**

गेल्या अनेक महिन्यांपासून रावेतमधील मुकाईनगर परिसरातील महानगरपालिकेचे जिजाऊ क्लिनिक आणि नागरी आरोग्य वर्धिनी केंद्र डॉक्टरांविना चालू आहे. बाह्य रुग्णसेवा विभाग (ओपीडी) पूर्णपणे ठप्प झाला आहे. त्यामुळे रुग्णांना खासगी रुग्णालयाचा किंवा दूरच्या शासकीय रुग्णालयाचा आधार घ्यावा लागत आहे.

महिलांसह सर्वसामान्यांना सहज आरोग्यसेवा उपलब्ध व्हावी या हेतूने महापालिकेतर्फे जिजाऊ क्लिनिक आणि नागरी आरोग्य वर्धिनी केंद्र सुरू करण्यात आले आहे. आरोग्य वर्धिनी केंद्र हे स्थानिकांसाठी सुलभ आणि विनामूल्य सेवा पुरवणारे केंद्र आहे. क्लिनिकमध्ये दररोज अनेक रुग्ण उपचाराच्या अपेक्षेने येतात. मात्र, सध्या 'ओपीडी' सेवाच बंद असल्याने त्यांना उपचाराविना परत जावे लागत आहे. अनेकदा त्यांना केवळ प्राथमिक तपासणी किंवा औषधासाठी खासगी क्लिनिकमध्ये पैसे मोजावे लागत आहेत.



> **सध्या रावेतसह अनेक ठिकाणी जिजाऊ क्लिनिक व नागरी आरोग्य वर्धिनी केंद्रात पूर्णवेळ डॉक्टरांची अडचण आहे. महानगरपालिकेने या संदर्भात जाहिरात काढून सर्व प्रक्रिया पूर्ण केली आहे. पुढील सहा ते आठ दिवसांत या ठिकाणी पूर्ण वेळ डॉक्टर हजर होतील.**
>
> **- डॉ. लक्ष्मण गोफणे, अतिरिक्त वैद्यकीय अधिकारी, महापालिका**

# बनावट वकिलाकडून शेतकऱ्याची फसवणूक

**। रत्नागिरी । प्रतिनिधी ।**

रत्नागिरी लांजा तालुक्यातील आसगे येथे एका ६२ वर्षीय शेतकऱ्याची वकिल असल्याचे सांगून तब्बल ४५ हजार ११० रुपयांची फसवणूक केल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी पोलिसांनी आरोपी जीवन गणपत जाधव (वय ५५, रा. तानाखरे) याला अटक केली आहे.

फिर्यादी बाबाजी बुधाजी कोलापटे यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, आरोपी जीवन जाधव याने फिर्यादीला आपण वकील असल्याचे भासवले. त्यांच्या विश्वासाचा फायदा घेत जाधवने कोलापटे यांची वैगनार कार भाड्याने घेतली. परंतु त्याचे ३७ हजार रुपये भाडे दिले नाही. यासोबतच, आरोपीने फिर्यादीला जेल कॅन्टीनचे काम मिळवून देण्याचे आमिष दाखवले आणि त्यांचा ५ हजार रुपये किमतीचा मोबाईल (त्यात फिर्यादीच्या नावाचे सिमकार्ड टाकून) वापरण्यास घेतला व परत केला नाही. तर फिर्यादीकडून १ हजार ११० रुपये घेतले आणि दिले नाहीत. अशा प्रकारे आरोपीने फिर्यादीची एकूण ४५ हजार ११० रुपयांची फसवणूक करण्यात आली.

बाबाजी कोलापटे यांनी लांजा पोलीस ठाण्यात याबाबत तक्रार दाखल केली असता पोलिसांनी आरोपी जीवन जाधव याला अटक केली आहे.

## तरुण शेतकऱ्यांचा बांबू लागवडीकडे कल | रोजगार निर्मितीसाठी अत्यंत उपयुक्त

# पर्यावरणपूरक शेती, काळाची गरज

**। चिपळूण । प्रतिनिधी ।**

जलवायू बदल, नैसर्गिक संसाधनांचा अपव्यय, आणि पारंपरिक शेतीतून मिळणारे घटते उत्पन्न या सगळ्याच्या पार्श्वभूमीवर आजच्या तरुण शेतकऱ्यांनी नवे पर्याय स्वीकारणे गरजेचे झाले आहे. या दिशेने एक आदर्श उदाहरण पेढांबे गावात घडले आहे. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत येथील तरुण शेतकरी प्रथमेश शिंदे व विशाल शिंदे यांनी आपल्या १.०७ हेक्टर जमिनीवर टूल्डा जातीच्या १३०८ बांबू रोपांची लागवड करून पुढाकार घेतला आहे. या उपक्रमाचा शुभारंभ मंडळ कृषी अधिकारी मनोज गांधी यांच्या हस्ते पार पडला.

जलसंधारण, मातीची धूप रोखणे, हवामान शुद्ध करणे, आणि वनसंपत्तीचा पर्याय या बाबतीत बांबूचे अनन्यसाधारण महत्त्व आहे. कृषी विभागाच्या वतीने तरुण शेतकऱ्यांना बांबू, सागवान, फळबाग लागवड यासारख्या पर्यावरणपूरक, रोजगारनिर्मिती करणाऱ्या शेती प्रकारांकडे वळण्याचे आवाहन करण्यात येत आहे.



तरुण पिढीने पुढाकार घेतल्यास कृषी क्षेत्रात मोठा बदल शक्य आहे, असे मनोज गांधी यांनी सांगितले. कृषी विभागाच्या वतीने सर्व तरुण शेतकऱ्यांना आवाहन करण्यात येते की त्यांनी पारंपरिक शेतीबरोबर वनशेती, बांबू लागवड, सेंद्रिय शेती, औषधी वनस्पती उत्पादन यासारख्या नवनवीन क्षेत्रांकडे वळावे. ही शेती केवळ पर्यावरणपूरकच नाही, तर भविष्यातील आर्थिक स्थैर्य व ग्रामीण रोजगार निर्मितीसाठीही अत्यंत उपयुक्त ठरेल. तसेच, कोकणातील सर्व तरुण शेतकऱ्यांनीही पर्यावरणपूरक शेतीसाठी सज्ज होणे ही काळाची गरज आहे, असे आवाहन केले.

## दीर्घकालीन उत्पन्न देणारा पर्याय

बांबू लागवड ही शेतीच्या उत्पन्नाबरोबरच पर्यावरण संवर्धनासाठी अत्यावश्यक आहे. कमी खर्च, कमी पाणी, आणि चांगले दीर्घकालीन उत्पन्न देणारा हा पर्याय प्रत्येक शेतकऱ्याने स्वीकारावा. बांबू लागवडीतून फर्निचर, बांधकाम साहित्य, हस्तकला वस्तू, आणि जैविक वस्तूंना कच्चा माल मिळतो. भविष्यात यावर आधारित प्रक्रिया उद्योग ग्रामीण भागात निर्माण होऊ शकतात.

# निवडक

## हटाळे शाळेत मातृपूजन उपक्रम



**कोर्लई :** अलिबाग तालुक्यातील हटाळे येथील रायगड जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेत श्रावणी सोमवार निमित्ताने 'मातृपूजा' हा भावनिक आणि सांस्कृतिक मूल्य जपणारा नावीन्यपूर्ण उपक्रम अत्यंत उत्साहात संपन्न झाला. आईसारखे दैवत साऱ्या जगतावर नाही, आई म्हणजे प्रथम गुरु, त्यागाची मूर्ती आणि मायेचे प्रतीक असल्याची जाणीव या कार्यक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या मनावर बिंबवण्यात आली. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी आपल्या आईचे पदकमल पाण्याने धुऊन,तिला ओवाळून तिच्या त्यागाबद्दल,मायेबद्दल आणि प्रेमाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. विद्यार्थ्यांनी आईविषयीच्या आपल्या भावना समर्थक शब्दांमध्ये मांडल्या.हा प्रसंग अनेक माता भावविवश होऊन अनुभवत होत्या. यावेळी वैद्यकीय अधिकारी डॉ.हर्षदा गायकवाड यांनी पावसाळ्यातील संसर्गजन्य आजार व त्याबाबत घ्यावयाची खबरदारी याबद्दल उपयुक्त माहिती दिली. शालेय व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा जान्हवी घरत, वैद्यकीय अधिकारी डॉ. हर्षदा गायकवाड, आरोग्यसेविका वेटकोळी, मुख्याध्यापिका रश्मी भोपी, सीमा नागावकर, प्रीती कीर मान्यवर यावेळी उपस्थित होते.

## तळा बाजारपेठेत विविधरंगी राख्या

**तळा :** बहीण भावाच्या नात्यातील प्रेमाचे प्रतीक असलेल्या व नाते घट्ट करणाऱ्या रक्षाबंधन सणासाठी तळा बाजारपेठेत विविध रंगाच्या राख्या विक्रीसाठी दाखल झाल्या आहेत. रक्षाबंधन म्हणजे भाऊ बहिणीच्या आयुष्यातील अविस्मरणीय दिवस. हा सण काही



दिवसांवर येऊन ठेपला असल्याने रक्षाबंधनाचे प्रतीक असलेल्या विविध रंगाच्या राख्या तळा बाजारपेठेत विक्रीसाठी दाखल झाल्या आहेत. भाऊ लांब राहत असल्याने बहिणींना राख्या पोस्टाने अथवा कुरिअरने पाठवाव्या लागतात. त्यामुळे तळा बाजारपेठेत काही दिवस आधीच राख्या विक्रीसाठी दुकानात दाखल झाल्या आहेत. पूर्वी गोंडयाच्या राखीला ग्राहकांची अधिक पसंती असायची मात्र आता त्यात बदल होऊन ग्राहकांना आकर्षित करण्यासाठी लहानमुलांसाठी रंगीबेरंगी कार्टून, डोरेमन, क्रिश, छोटा भीम या कार्टून असलेल्या तर मोठ्यांसाठी गोंडा, रुद्राक्ष, हिरेजडित आशा अनेक आकर्षित राख्या उपलब्ध झाल्या आहेत. त्यामुळे तळा बाजारपेठेत अशा विविधरंगी राख्या खरेदी करताना महिला वर्ग पाहायला मिळत आहे.

## दयानंद अंजर्लेकर यांना डॉक्टरेट पदवी

**अलिबाग :** अलिबाग तालुक्यातील मेढेखार येथील जिल्हा परिषद शाळेतील शिक्षक दयानंद अंजर्लेकर यांना पीएचडी पदवी जाहीर झाली आहे. त्यांनी डॉक्टरेट ही पदवी



प्राप्त केली आहे. त्यांच्या कामगिरीबाबत सर्वस्तरातून अभिनंदनचा वर्षाव होत आहे. प्राथमिक शाळेतील शिक्षक दयानंद दत्तात्रेय अंजर्लेकर यांनी शिक्षण क्षेत्रातील उच्चतम पदवी शिक्षणशास्त्र या विषयात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातून डॉक्टरेट मिळवली. लोक गीतातून प्रतित होणारे शिक्षण व जीवनकौशल्य विषयक विचारांचा अभ्यास हे त्यांच्या संशोधनाचे शीर्षक होते. त्यांना या संशोधनासाठी नाशिक येथील विठ्ठलराव हांडे शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील प्राध्यापक डॉ. किशोर चव्हाण यांनी मुख्य मार्गदर्शन केले. नाशिक येथील केटीएचएम कॉलेजचे माची प्राचार्य डॉ. दिलीप धोंडगे यांनी सह मार्गदर्शन केले. दयानंद अंजर्लेकर यांनी ऑक्टोबर २०२३ मध्ये विद्यापीठाला प्रबंध सादर केला होता. २५ जून २०२५ रोजी विद्यापीठाने त्यांना पीएचडी पदवी जाहीर केली. त्यामुळे त्यांचे सर्वत्र कौतुक व अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## दरपत्रक सादर करावेत

। अलिबाग । प्रतिनिधी ।

अलिबागमधील जिल्हाधिकारी कार्यालय व



जिल्हाधिकारी यांचे निवासस्थान येथील स्वच्छता राहण्याच्या दृष्टीने जिल्हाधिकारी कार्यालय, अप्पर जिल्हाधिकारी कार्यालय, नियोजन भवन, रेकॉर्ड रूम इत्यादी इमारतींच्या आवारातील स्वच्छतागृहे व बाहेरील परीसर स्वच्छतेसाठी वार्षिक ठेका देणे आवश्यक आहे.स्वच्छतेसाठी दरपत्रक मागविण्यात येत आहेत. तरी इच्छूकांनी दि.०४ ऑगस्ट २०२५ पर्यंत दरपत्रक सामान्य शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय येथे देण्यात यावेत. असे आवाहन जिल्हाधिकारी कार्यालयाकडून करण्यात आले आहे.

क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- पांढरे डाग करा मुळापासून नष्ट : औषधामध्ये आहे याचा परिणाम या औषधाचा करा वापर पांढरे डागापासून मिळवा मुक्ती. संपर्क : ८९६९१३५३८९ यावर कॉल करा. घरीबसल्या औषध मिळवा.
- भारत पेट्रोल पंप चेंढरे अलिबाग बायपास येथे ऑफिस कामासाठी मुली पाहिजेत. शिक्षण - B.Com ७४४७४०४४३८/७४४७४०४४११
- Fresh graduates required for the post of office staff in Alibag. For interview call 9923750539, 9422383099

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

# धान्य वितरणात नियोजनाचा अभाव

## ग्रामीण भागातील ६६ रेशन दुकानदार धान्याच्या प्रतीक्षेत

। पनवेल । वार्ताहर ।

पावसाळा तसेच आपत्तीजन्य परिस्थितीत तीन महिन्याचे धान्य जूनमध्ये देण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला होता. मात्र पनवेलमधील ग्रामीण भागातील ६६ रेशन दुकानदारांना अद्यापही ऑगस्ट महिन्यातील धान्य मिळाले नाही. त्यामुळे हे धान्य कधी मिळणार याची वाट रेशन दुकानदार तसेच लाभार्थी पाहत आहेत.

पनवेल तालुक्यात ग्रामीण भागात १३४ रेशनिंगची दुकाने आहेत तर ६५ शहरी भागात दुकाने आहेत. शहरी भागातील दुकानदारांना




तीन महिन्याचे धान्य देण्यात आले असल्याची माहिती पुरवठा विभागाकडून देण्यात आली. मात्र ग्रामीण भागातील ६६ दुकानदारांना अद्यापही ऑगस्ट महिन्यातील धान्य मिळालेले नाही. अनेक ठिकाणी एका व्यक्तीला तीन महिन्याचे धान्य घ्यावे लागत असल्याने लाभार्थ्याला धान्य मिळण्यास विलंब होत आहे. तसेच रांगेत उभे राहून देखील धान्य मिळाले नसल्याने नागरिक निराश होऊन घरी परत गेले. ग्राहकांना वेठीस धरण्याचा हा प्रकार असल्याचे लाभार्थ्यांचे म्हणणे आहे.

अनेकदा केवायसी करण्यासाठी नागरिकांना वेठीस धरले जाते. अनेक लाभार्थ्यांना जवळच्या दुकानात रेशन मिळणे अपेक्षित आहे मात्र त्यांना दूरवरच्या रेशनिंग दुकानातून तीन ते चार किलोमीटरचे पायी अंतर कापत धान्य आणावे लागत असल्याने नागरिकांची ससेहोलपट होत आहे.

बायोमेट्रिकमुळे धान्य वितरणात बऱ्यापैकी पारदर्शकता आली आहे. तरी देखील रेशन दुकानदारांच्या कारभाराबाबत सतत तक्रारी येत असतात. अनेक दुकानदार वेळेचा वापर करत नाहीत आणि लाभार्थ्यांना वेठीस धरतात. एकूणच नियोजनाचा बोजवारा असल्याने नागरिकांना नाहक त्रास सहन करण्याची वेळ आलेली असल्याचे दिसून येत आहे.

> **ग्रामीण भागातील ६६ दुकानदारांना ऑगस्ट महिन्यातील धान्य जाणे बाकी आहे. याप्रकरणी ठेकेदारांना अलिबाग कार्यालयातून नोटीस काढण्यात आली आहे.**
> **- अश्विनी धनवे, पुरवठा अधिकारी, पनवेल**

# वडगाव शाळेची उत्तुंग भरारी

## नवी दिल्लीच्या पोर्टलवर शाळेची रचली यशोगाथा

। पाताळगंगा । वार्ताहर ।

रायगड जिल्हा परिषद तथा उच्च शाळा वडगांव नेहमी आपल्या विविध व नाविन्यपूर्ण उपक्रमाने कायम चर्चेत असते. या उपक्रमांची दखल महाराष्ट्र राज्य शैक्षणिक नियोजन व प्रशासन या संस्थेने व राष्ट्रीय शैक्षणिक नियोजन व प्रशासन या संस्थेने घेतली असून आपल्या राष्ट्रीय पोर्टलवर या शाळेची यशोगाथा आपल्या पोर्टलवर प्रकाशित केली आहे. दखल झाल्यामुळे या शाळेचे विशेष कौतुक होत आहे.

या शाळेमध्ये अनेक उपक्रम सादर करुन तालुक्यासह जिल्ह्यात नावारुपाला आली. यामधे शाळा गैरहजर विद्यार्थ्यांच्या दारी, भात लावणी, स्वीप अंतर्गत मतदार जनजागृती, एक पेड माँ के नाम,




चला वाचूया वाचन चटई, रिडींग गार्डन, भाषा, गणित प्रयोगशाळा, बिर्ला कार्बनकडून रंगरंगोटी, अल्काईल अमाईन्सकडून संगणक व विज्ञान कार्यशाळा, मर्क लाईफ सायन्सकडून स्मार्ट ई-क्लासरूम, एक्झॉनमोबिलकडून शैक्षणिक मदत, ज्युबिलीएन्टकडून मुस्कान किताबघर, अनेक व्यावसायिक कंपन्यांकडून शाळेसाठी सीएसआरच्या फंडातून कोट्यवधी रुपये शाळेच्या विकासाठी देण्यात आले. या माध्यमातून शाळेत विविध उपक्रम हाती घेण्यात आले.

जिल्हा परिषदेच्या तात्कालीन शिक्षणाधिकारी पुनीता गुरव, उपशिक्षणाधिकारी शेडगे, सुनील भोपळे, डॉ. इरफान ईनामदार डायट पनवेलचे प्राचार्य यांचे मोलाचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले. पंचायत समिती खालापूर यांच्या मार्गदर्शनाखाली विविध उपक्रमांचे आयोजन करत राष्ट्रीय स्तरावर पोहचविणारी म्हणून शाळेकडे पाहिले जाते.

तसेच, या शाळेच्या शिक्षकांचे कौतुक होत आहे. मुख्याध्यापक सुभाष राठोड, सहशिक्षक वैजनाथ जाधव, पदवीधर शिक्षिका मयुरी धायगुडे यांचे योगदान असून शाळा व्यवस्थापन समिती, ग्रुप ग्रामपंचायत वडगाव यांचे सहकार्य लाभले आहे.



# शैक्षणिक साहित्याचे वाटप

। महाड । वार्ताहर ।

महाड तालुक्यातील नांदगाव बुद्रुक येथे प्रबुद्ध भूमी फाउंडेशनच्या वतीने विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रोत्साहन मिळावे या उद्देशाने या शैक्षणिक साहित्याचे वाटप केल्याचे आयोजकांनी सांगितले.

यावेळी बौद्ध विकास मंडळाचे खजिनदार व आर. पी आय. बांद्रा तालुका अध्यक्ष प्रमोद चायाजी जाधव, सत्यवान राऊळ, सरपंच अलकाताई चिले, पोलीस पाटील गिरीश गायकर, सुशांत चिले यांच्यासह ज्येष्ठ ग्रामस्थ उपस्थित होते. यावेळी प्रमोद जयाजी जाधव यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना हे शैक्षणिक साहित्य एक प्रोत्साहन देण्याकरता असून तुम्ही तुमच्या जिद्दीच्या बळावर यश संपादन करत जा असा मोलाचा सल्ला दिला. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी स्थानिक भावकीचे पदाधिकारी व महिला, तरुण तरुणी मंडळ तथा विद्यार्थी यांनी अथक मेहनत घेतली.



# शेतकऱ्यांना कंपोस्ट खताविषयी प्रशिक्षण

## खतनिर्मितीसाठी ड्रम वाटप

। पाताळगंगा । प्रतिनिधी ।

औद्योगिक क्षेत्रामुळे शेती कमी होत चालली असताना त्यातच रसायनिक खताचा बेसुमार वापरामुळे शेतीचा दर्जा ढासळत चालला आहे. परिणामी शेतीतील उत्पन्न घटत असल्यामुळे शेतकरी वर्ग शेतीकडे पाठ फिरवित असताना शेती पुन्हा लागवडीखाली यावी, तसेच अधिकाअधिक उत्पन्न मिळावे यासाठी शेतकरी वर्गांस सेंद्रिय शेती करावी, तसेच त्यांची निर्मिती करुन आपण रासायनिक खते यांचा वापर टाळू शकतो, या अनुषंघाने कृषी खात्याच्या माध्यमातून सेंद्रिये खतनिर्मितीसाठी लागणारे ड्रम माजगाव येथील शेतकऱ्यांना वाटप करण्यात आले.

डॉ. पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती मिशन योजने अंतर्गत चावंडाई माता सेंद्रिय भात उत्पादक गटाचे गाव पातळीवरील प्रशिक्षण देण्यात आले. सहाय्यक कृषी अधिकारी पी.पी. कदम यांनी नैसर्गिक शेती, सेंद्रिय शेती, विषयी मार्गदर्शन केले. तसेच तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापक प्रज्ञा पाटील यांनी नैसर्गिक शेती काळाची गरज का आहे, जीवामृत, बीजामबृत, एस ९ कल्चर वापरून कंपोस्ट खत तयार कसे करावे व बीआरसी विषयी मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी ६६ शेतकऱ्यांना ड्रम वाटप करण्यात आले.

## कृष्णा पाटील यांचे निधन

**नागोठणे :** रिटघर येथील रहिवासी व गावतील वारकरी सांप्रदाय तसेच ग्रामस्थ मंडळाचे प्रमुख आधारस्तंभ ह.भ.प. कृष्णा राजाराम पाटील यांचे २१ जुलै रोजी सकाळी अल्पशा आजाराने निधन झाले. कृष्णा पाटील यांच्या पार्थिवावर रिटघर येथील वैकुंठ स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी परिसरातील विविध क्षेत्रातील मान्यवर, त्यांचे नातेवाईक, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. दिवंगत कृष्णा पाटील यांच्या पश्चात विवाहित मुलगे प्रकाश, कृष्णा एक विवाहित मुलगी सुगंधा भगत, सुना, जावई, नातवंडे यांच्यासह मोठा परिवार आहे. कृष्णा पाटील यांचे दशक्रिया विधी बुधवार दिनांक ३० जुलै रोजी नाशिक येथे तर उत्तरकार्य विधी (तेरावे) शनिवार दि. २ ऑगस्ट रोजी सकाळी रिटघर येथील त्यांच्या राहत्या घरी होणार असल्याल्याचे पाटील कुटुंबियांकडून सांगण्यात आले.

# पाली शहरात स्वच्छतागृहांचा अभाव

## अंकुश आपटे यांचे मूक आंदोलन

। पाली । वार्ताहर ।

पाली शहरात स्वच्छतागृहांचा अभाव असल्याने युवा सामाजिक कार्यकर्ते अंकुश आपटे यांच्या सोमवारी (दि. २८) एका अनोख्या जन आंदोलनाने समस्त पालीकरांचे लक्ष वेधले. अष्टविनायकांपैकी प्रसिद्ध तीर्थक्षेत्र असणाऱ्या पाली नगरीमध्ये स्वच्छतागृहांचा प्रचंड अभाव असल्याने सुधागड तालुक्यातील खेडोपाड्यातून येणाऱ्या शेकडो सर्वसामान्य नागरिकांची, महिला व विद्यार्थ्यांची नेहमीच कुचंबना होत असते. या प्रश्नाची गंभीर दखल घेत सामाजिक कार्यकर्ते व आयुष्य व्यसनमुक्ती केंद्राचे अध्यक्ष पाली शहरातील युवा सामाजिक कार्यकर्ते अकुश आपटे यांनी आपल्या हटके स्टाईलने पालीमध्ये मूक आंदोलन व जनजागृती करून समस्त पालीकर रहिवाशांचे व त्याचप्रमाणे पाली नगरपंचायत प्रशासन विभागाचे लक्ष वेधून या



गंभीर प्रश्नाची तातडीने दखल घेण्यास भाग पाडले.

पाली नगरपंचायत हद्दीमध्ये लवकरात लवकर स्वच्छतागृह सर्वसामान्य नागरिकांसाठी उपलब्ध व्हावे यासाठी अंकुश आपटे यांनी आपल्या सहकाऱ्यांसमवेत नगरपंचायतीला निवेदन दिले.

यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी नगरपंचायत, पाली नगरपंचायतीचे प्रभारी नगराध्यक्ष आरिफभाई मणीयार, नगरसेवक पराग मेहता उपस्थित होते. त्यांनी अंकुश आपटे यांनी केलेल्या या मूक जनजागृती आंदोलनाची दखल घेत येत्या वर्षभरात स्वच्छतागृहांची उभारणी करण्यात येईल, असे आश्वासन दिले.

सर्व पालिकर रहिवाशांनी या मुक जनजागृती आंदोलनाला उत्स्फूर्त प्रतिसाद देऊन अंकुश आपटे यांचे कौतुक केले. तसेच जर येत्या वर्षभरात नागरिकांसाठी स्वच्छतागृहांची उभारणी न केल्यास तीव्र जन आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा अंकुश आपटे यांनी प्रशासनाला दिला आहे.

# कशेळे-दोरेवाडी रस्त्यावर खड्ड्यांचे साम्राज्य

। कर्जत । वार्ताहर ।

कर्जत तालुक्यात सततच्या चालू असलेल्या मुसळधार पावसामुळे कशेळे-खांडस रस्त्यावरील दोरेवाडी रस्त्याला मोठे खड्डे पडले आहेत. त्यामूळे वाहन चालकांना येथून वाहने चालवताना मोठी कसरत करावी लागत आहे.

कशेळे दोरेवाडी, खांडस भागातील गावांसह आजूबाजूच्या परिसरातील गावांना जोडणारा मुख्य मार्ग असून या रस्त्याच्या डांबरीकरणाचे काम करण्यात आले होते. मात्र निकृष्ट दर्जाच्या



डांबरीकरणामुळे रस्त्यावरील डांबराचा थर पहिल्याच पावसाळ्यात निघून गेला आहे. सध्या या मार्गावर मोठ्या प्रमाणात खड्ड्यांच्या अतिक्रमणाच्या साम्राज्याचे वास्तव समोर येत असल्याने या मार्गावरून प्रवास करणाऱ्या विद्यार्थी, वयोवृद्ध, सामान्य नागरिकांसह वाहनचालकांना या मार्गावरून प्रवास करताना या खड्ड्यांचा मोठ्या प्रमाणात सामना करत आपला जीव मुठीत घेऊन प्रवास करण्याची वेळ आली आहे. तसेच कशेळे बाजारपेठेतील नेरळ रस्त्याला सुद्धा मोठा खड्डा पडला असून वाहन चालकांना त्रास होतो. त्यामुळे नागरीक व वाहन चालकाकडून प्रशासकीय अधिकारी यांच्यावर नाराजी व्यक्त केली जात आहे.

हा त्रास कमी करण्यासाठी ठेकेदाराने रस्त्यांवरील खड्डे बुजवावे अशी मागणी नागरीकांकडून केली जात आहे.

# कनकेश्वर येथे स्वच्छता मोहीम

**सोगाव :** अलिबाग तालुक्यातील प्रमुख तीर्थक्षेत्र असलेल्या श्री. क्षेत्र कनकेश्वर येथील डोंगरावर श्रावण सोमवारच्या पूर्वसंध्येला म्हणजेच रविवारी (दि. २७) सोशल मीडिया व्हाट्सएपच्या अलिबागकर एक हात मदतीचा या ग्रुपने मोठ्या प्रमाणात स्वच्छता मोहीम राबविली. यावेळी कनकेश्वर डोंगराच्या पायथ्यापासून ते मंदिराकडे जाणाऱ्या पायऱ्या व आजूबाजूच्या परिसर तसेच मंदिर, गायमुख व परिसरातील सर्वच



ठिकाणी असलेला प्लास्टिक, काचेच्या बाटल्या व इतर प्रकारचा कचरा गोळा करून त्याची योग्य ती विल्हेवाट लावण्यात आली. या स्वच्छता मोहिमेत ग्रुपमधील अनेक सदस्य उपस्थित होते.

## वाशीमधील सरपंच संदेश ठाकूर यांचा पुढाकार | जिल्हा परिषदेची मदत घेतली जाणार

# घनकचरा प्रश्न मार्गी लागणार

। प्रमोद जाधव ।
। अलिबाग ।

पेण तालुक्यातील वाशी येथील ग्रुप ग्रामपंचायतीच्या हद्दीतील नागरिकांचे आरोग्य चांगले राहवे, यासाठी सरपंच संदेश ठाकूर यांनी पुढाकार घेतला आहे. ओला सुका कचऱ्यासह कचऱ्याचे विलगीकरण करून योग्य पध्दतीने त्याची विल्हेवाट लावली जाणार आहे. त्यासाठी गावापासून काही अंतरावर घनकचरा भूमी उभारली जाणार आहे. त्यामुळे वाशीमधील घनकचऱ्याचा प्रश्न मार्गी लागणार आहे. त्यासाठी जिल्हा परिषदेची मदत घेतली जाणार असल्याची माहिती देण्यात आली आहे.

वाशी ग्रुप ग्रामपंचायत हद्दीत वाशी, ओढांगी, सरेभाग ही गावे आहेत. या गावांची लोकसंख्या



चार हजार २३३ हून अधिक आहे. गावांचा विकास साधत असताना सांडपाणी व्यवस्थापन कचऱ्याची योग्य पध्दतीने विल्हेवाट लावण्यासाठी सरपंच संदेश ठाकूर यांनी प्रयत्न केले आहेत. मागील मे महिन्यात परिसरात संरक्षक भिंत करून त्याठिकाणी वेगवेगळ्या प्रकारच्या रोपांची लागवड करण्यात आली. पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी झाडांची महत्वपूर्ण भूमिका असते. त्यामुळे वृक्षारोपणातून झाडांचे महत्व पटवून देण्याचा प्रयत्न केला आहे.

गावापासून काही अंतरावर दीड एक जागा आहे. या जागेत संदेश ठाकूर यांनी कचरा व्यवस्थापन करण्याचा मानस केला आहे. यासाठी जिल्हा परिषद पाणी व स्वच्छता मिशनच्या उपमुख्य कार्यकारी अधिकारी शुभांगी नाखले यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले आहे. वाशीमधील घन कचऱ्याचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी प्लास्टिक विलगीकरण, ओला व सुका करचा वेगळा करून देण्यावर भर दिला जाणार आहे.

ओल्या कचऱ्यापासून खत निर्मिती करण्याबरोबरच सुक्या कचऱ्याचे विलगीकरण व विघटीकरणाची प्रक्रीया राबविली जाणार आहे. कचरा मशनरीच्या मदतीने बारीक करून तो कारखान्यांना देण्यात येणार असल्याची माहिती ग्रामपंचायतीचे सरपंच संदेश ठाकूर यांनी दिली.

### कार्यशाळेसाठी वाशी ग्रामपंचायतीची निवड

**सर्वांसाठी पाणी व स्वच्छतेची उपलब्धता आणि व्यवस्थापन सुनिश्चित करणे. या उद्दीष्टांच्या पूर्ततेसाठी भारत सरकारच्या पंचायती राज मंत्रालयाने स्वच्छ व हरित गाव ही संकल्पना सुरू केली आहे. त्यासाठी प्रशिक्षण सूरू केले आहे. प्रशिक्षणासाठी निवडक ग्रामपंचायतीमधील सरपंच, ग्राम पंचायत अधिकारी, विस्तार अधिकारी यांची निवड केली आहे. राज्यस्तरिय सांडपाणी,घनकचरा व्यवस्थापन कार्यशाळा पुणे येथील यशदा येथे घेण्यात आली आहे. या कार्यशाळेसाठी पेण तालुक्यातील वाशी ग्रामपंचायतींची निवड करण्यात आली आहे. सोमवारी (दि.२८), ते बुधवारी (दि. ३०) या तीन दिवसीय कार्यशाळेसाठी वाशी ग्रामपंचायतीचे सरपंच संदेश ठाकूर सहभागी झाले आहेत.**

### दिग्गजांनी दिली ग्रामपंचायतीला भेट

**रायगड जिल्हा परिषद पाणी व स्वच्छता मिशनच्या उपमुख्य कार्यकारी अधिकारी शुभांगी नाखले यांनी घनकचरा व्यवस्थापन व तलाव सुशोभीकरणाला भेट दिली. तेथील कामांची पाहणी करून समाधान व्यक्त केले. कोकण विभाग सहाय्यक आयुक्त घोरपडे यांनी ग्रुप ग्रामपंचायतीला भेट देत गावांची पाहणी केली. तेथील सुशोभीकरण व तलावाची पाहणी केली. रायगड जिल्हा परिषदेचे ग्रामपंचायत विभागाचे तत्कालीन उपमुख्य कार्यकारी अधिकारी राजेंद्र भालेराव यांनी ग्रामपंचातीला भेट दिली. स्मार्ट ग्राम अंतर्गत केलेल्या कामांची पाहणी करून समाधान व्यक्त केला.**

# ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**


## पनवेल महानगरपालिका
### शहर अभियंता विभाग
### फेर ई-निविदा सुचना

निविदा सुचना क्र.पमपा/बांधकाम/५८२५/प्र.क्र.०१/२६७६/२०२५
दिनांक : २९/०७/२०२५

आयुक्त, पनवेल महानगरपालिका खालील नमूद कामाकरीता सार्वजनिक बांधकाम विभाग, केंद्रीय सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सिडको इत्यादी शासकीय/निम शासकीय (Central Government / State Government / Government under taking) विभागात खालील कामासाठी नोंदणीकृत पात्र अनुभवी ठेकेदाराकडून बी-१ शतमान पद्धतीनुसार फेर ई-निविदा (२nd call) मागवित आहेत.

| अ.क्र. | निविदा क्र. | कामाचे नाव | निविदा रक्कम रु. (without GSt) |
|---|---|---|---|
| १. | PMC/CE/36/ २०२५-२६ | पनवेल महानगरपालिका हद्दीतील तक्का गावामधील अंतर्गत रस्ते/गल्ली कॉंक्रीटीकरण करणे. (२nd call ) | ९२,०२,२१०/- |

या कामाच्या ई-निविदे बाबतची माहिती शासनाच्या 'http://mahatenders.gov.in' या संकेतस्थळावर दि.३१/०७/२०२५ रोजी प्रसिद्ध करण्यात येईल. संबंधित निविदाधारकांनी याची नोंद घ्यावी.

सही/-
**अतिरिक्त आयुक्त-I**
**पनवेल महानगरपालिका**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टा मध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकाकडुन आमचे अशिलांनी कायमचे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुलमुखत्यारपत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावरही नोटीस प्रसिध्द झाल्या पासून १४ (चौदा) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालका बरोबर आपला खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मुदत बाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**
**मौजे दहिगाव, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत**

| मालकाचे नांव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे-आर-पॉ | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| नवनाथ भाऊ देशमुख | ३ | ३ क | ०-२९-० | ३-३० |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
कार्यालयीन पत्ता :- मु.पो. कशेळे, कर्जत-मुरबाड रोड, सरकारी दवाखान्या समोर, ता. कर्जत, जि. रायगड. ४१०२०१

सही/-
**ॲड. भुपेश तानाजी पेमारे**
दिनांक :- ३०/०७/२०२५
मो.नं. ९१५८२७७७२८

## अंमली पदार्थ बाळगणाऱ्यांवर कारवाई

**पनवेल :** गांजा हा अंमली पदार्थ जवळ बाळगल्याप्रकरणी पनवेल शहर पोलिसांनी तिघांविरुद्ध कारवाई केली आहे. पोलिसांनी शाहिद शेख (३२), रोशन भालेराव (२५) व समीर शेख (२०) या तिघांना अंमली पदार्थ विरोधी कायदा १९८५ चे कलम ८ (ळ) २७ अन्वये कारवाई केली आहे.

## PUBLIC NOTICE

**Notice is hereby given that our client proposes to purchase from Mr. Zubin Farrokh Wadia** all his right, title and interest in all that piece and parcel of non-agricultural land bearing Plot No. 4 admeasuring 412 square meters bearing Gat No 37/2/1/4 situate, lying and being at Village Sogaon, Taluka Alibag, District Raigad in the Registration District and Sub-District of Raigad and bounded as follows:
On or towards North: Internal Road of Gat no. 37/2/1
On or towards South: Gat no. 37/2/2
On or towards East: Gat no. 36
On or towards West: Plot no. 3
(hereinafter referred to **"said Land"**).
Any person/s having any objection or any claim, right, title and/or interest including the right of and by way of sale, agreement for sale, transfer, assignment, occupation, mortgage, exchange, gift, partition, lien, charge, lease, sub lease, care-taker basis, maintenance, bequest, inheritance, trust, possession, easement, tenancy, sub tenancy, license, release, relinquishment, outgoings, conditions, covenants, memorandum of understanding, family arrangement /settlement, litigation, decree or order of any Court of Law or Tribunal or revenue or statutory authority, arbitration award, contracts/agreements or otherwise in respect of the said Land is hereby required to make the same known in writing to the undersigned at the below mentioned address and email addresses, along with documents in support thereof, **within 14 (fourteen) days from the date of publication hereof, failing which the claim of such person/s** shall be deemed to have been waived and/or abandoned.
**Dated this 30th day of July, 2025**

**M Mulla Associates**
**Advocates & Solicitors**
**Block F-41, 4th Floor, Dhanraj Mahal,**
**Apollo Bunder, Mumbai-400 001.**
**Email: maneck@mmassociates.in**
**mohini@mmassociates.in**

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची जमिन मिळकत तिचे मालक मुकुंद काळु मसणे यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तिचे तपशिलवार वर्णन पुढीलप्रमाणे :

**मौजे- अंत्राट तर्फे नीड तालुका कर्जत जिल्हा रायगड येथील जमिन मिळकत**

| भूमापन क्रं व उपविभाग/ सर्व्हे नंबर/हिस्सा नंबर | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|
| ८१/१/ब | एकुण क्षेत्र ०-७०-०० हे आर पॉ यापैकी वरील मालक यांचे क्षेत्र ०-३५-०० हे आर पॉ एवढे क्षेत्र | ००-३३ |

या मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, बयानापावती, खरेदीखत, साठेकरार, गहाण, दान, बोजा, लीज, कब्जा, लोन, भाडेपट्टा, अगर फरोक्त वा इतर कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध असल्यास आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत लेखी पुराव्यासह खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास, तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदी-विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक : ३०/०७/२०२५

**खरेदीदारातर्फे वकील ॲड.वृषाली रघुनाथ मोरे**
मोबा. ८५३०१४६८५४
ऑफिस पत्ता- शॉप नं.२९, तळमजला,
हिरापन्ना शॉपिंग प्लाझा बिल्डींग,भारत गॅस समोर.
अमराई रोड, कर्जत ता.कर्जत,
जि.रायगड ४१०२०१

**खरेदीदारातर्फे वकील ॲड.निलेश कान्हु मोरे**
मोबा. ९८२२६९११०९
ऑफिस पत्ता- शॉप नं.२९ तळ मजला,
हिरापन्ना शॉपिंग प्लाझा बिल्डींग, भारत गॅस समोर
अमराई रोड, कर्जत ता.कर्जत,
जि. रायगड ४१०२०१

## जाहीर सूचना

तमाम जनतेस या जाहीर नोटिसीने कळवण्यात येते की, आमचे आशिलांनी खालील अनुसूचीमध्ये वर्णन केलेली मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक रुपेश रामचंद्र म्हात्रे (''मालक'') यांचा सदर मिळकतीमध्ये असलेला अविभाज्य हिश्या संदर्भात मालकी हक्क तपासत आहोत, जसे आमचे अशील हे मालकांकडून सदर मिळकतीमध्ये असलेला मालकांचा अविभाज्य हिश्याच्या खरेदीसाठी इच्छुक आहेत.

सदर मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध मालकीहक्काची व प्रत्यक्ष वहिवाटीतील असून ती विकण्याचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा त्यांनी आमच्या आशिलांना दिलेला आहे. मात्र, तरी देखील कोणत्याही व्यक्ती/संस्था सदर मिळकत किंवा त्यावरील कोणत्याही भागाच्या संदर्भामध्ये/विरुद्ध कोणताही हक्क, मालकी हक्क, हितसंबंध, दावा, मागणी आणि/किंवा आक्षेप जसे की, विक्री, अदलाबदल, भाडेपट्टा, कुळवहिवाट, परवाना, विश्वस्त, धारणाधिकार, निर्वाह, सुविधाधिकार, वारसाहक्क, ताबा, जप्ती, गहाण, प्रभार, बक्षीस, प्रलंबित वाद, एफएसआय वापर किंवा अन्यकाही दावे असल्यास त्यांनी तसे सदरच्या लिखित सुचनेसह झुंजारराव आणि कं., वकील आणि सॉलिसिटर्स, ४था मजला, जलाराम ज्योत, जन्मभुमी मार्ग, फोर्ट, मुंबई - ४०० ००१ येथे तसे हक्क, मालकी हक्क, हितसंबंध, दावा, मागणी आणि/किंवा आक्षेपाच्या कागदपत्रांच्या प्रमाणित सत्य प्रतींसह या सूचनेच्या प्रसिद्धीच्या तारखेपासून १४ (चौदा) दिवसांच्या आत कळवाव्यात.

वरील मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे असे गृहीत धरून आमचे आशील सदरचा खरेदी विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळवण्यात येते.

**अनुसूची**
**(मालमत्तेचे वर्णन)**

नोंदणीकृत जिल्हा व उप-जिल्हा रायगड यांचे कार्यक्षेत्र मधील गाव-टेकाळी, तालुका-अलिबाग, जिल्हा-रायगड येथे स्थित गट क्रमांक व उपविभाग ६९, एकूण क्षेत्र ००-८४-०० (हे.आर.चौ.मी.) आकार रु.पै. १८.०१/- पैकी क्षेत्रासाठी.

ठिकाण : अलिबाग
दिनांक :३०/०७/२०२५

**झुंजारराव आणि कंकरीता**
**सही/-**
**विक्रांत झुंजारराव**

## जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, रायगड-अलिबाग
## जिल्हाधिकारी कार्यालय, हिराकोट तलावाजवळ, अलिबाग जि.रायगड-४०२२०१
## 'ई' - निविदा सुचना

जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, रायगड करीता आपत्ती व्यवस्थान प्रतिसाद केंद्रीत संगणक प्रणाली विकसित करणेसाठी नामांकित व अनुभवी कंपन्या/डिलर/सेवा पूरवठादार यांचेकडून स्पर्धात्मक निविदा प्रक्रियेमध्ये सहभागी होऊन पुरवठा करण्याकरिता 'ई' निविदा मागवित आहे. या निविदेचा संपुर्ण तपशील पाहण्याकरिता इच्छुक निविदाधारकांनी : http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर संपूर्ण माहिती घ्यावी.

ई निविदा ऑनलाईन पद्धतीने दि.९/०८/२०२५ रोजी दुपारी ४.०० पर्यंत स्वीकारण्यात येतील.

| Sr. no. | BID REFERENCE | DATE & TIME |
|---|---|---|
| 1 | Date of commencement of issue of Tender documents | 30/07/2025 at 10:00 AM |
| 2 | Last Date and Time for purchase of Tender documents | 10/08/2025 at 02:00 PM |
| 3 | Date of Pre-Bid Meeting | 06/08/2025 at 04:00 PM |
| 4 | Last Date & Time of submission of Bids | 12/08/2025 at 02:00 PM |
| 5 | Date & Time of Opening the Bid presence of the intending bidders | 13/08/2025 at 02:00 PM in the Office of District Collector, Raigad |
| 6 | Place of Sale of Tender document | Online- http://mahatenders.gov.in |
| 7 | EMD | 1% of the Total Bid Amount Quoted by the Bidder. |
| 8 | Security Deposit | 3% of purchased equipment |

**सही/-**
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण**
**रायगड-अलिबाग**

विमाका/कोवि/२०२५-२०२६-९०

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे-आंभेरपाडा ता.कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत मी त्याचे खालील नमूद विद्यमान मालक यांच्याकडून विकत घेण्याचे ठरविले आहे.

| मालकाचे नांव | सर्व्हे नं. | हि. नं. | क्षेत्र. हे.आर.चौ.मी | आकार रू. पै. |
|---|---|---|---|---|
| विनय कमलाकर म्हात्रे | ६३ | ७ | ०-३२-४० | ० = ५९ |
| | ६३ | १/ब | ०-०२-०० | ० = १२ |

तरी वरील मिळकती संदर्भात कोणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, बक्षिस, वारस हक्क, पोटगी, लीन, चार्ज, ताबा, वहिवाट अथवा कोणत्याही स्वरूपाचा कसलाही हक्क हितसंबंध असल्यास त्यांना ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसांचे आत खालील सही करणार यांचे पत्त्यावर प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात हरकत घ्यावी. वरील मुदतीत कोणाचाही लेखी हरकत न आल्यास सदरील मिळकतीमध्ये कोणाचाही हक्क हितसंबंध नाही व असल्यास त्यांनी तो सोडून दिला आहे असे समजून सदरील मिळकती निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजुन मी सदर मिळकतीचे खरेदीखताचे व्यवहार पुर्ण करेन. मागाहुन मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती माझ्यावर बंधनकारक राहणार नाहीत. हे सर्वास कळावे.

ठिकाण :- कर्जत
दिनांक :- ३०/७/२०२५

**पुनम सुधिर तांबे**
'इंद्रायणी' कर्जत-माथेरान रोड
हालीवली, कर्जत
ता.कर्जत, जि.रायगड ४१०२०१
मो. ९९७०१६५२१३

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे पोयनाड, ता.अलिबाग, जि.रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत, त्या मिळकतीचे विद्यमान मालक अजित सखाराम कांडार यांचेकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | स. नं./हि. नं. | क्षेत्र (हे. आर) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| पोयनाड | १४१/३ | ०-१४-६० | ३.३१ |
| | | पो. ख. ०-०१-३० | |
| | | ०-१५-९० | |

सदरची मिळकत ही त्यांचे निर्वेध मालकी हक्कांची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून ती विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क, रस्त्याच्या वहिवाटीचा निरंतर हक्क या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध असल्यास अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरूपात आणून द्याव्यात. मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे व तिचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असूनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडून दिला आहे, असे गृहित धरून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे.

अलिबाग
तारीख : ३०/७/२०२५

सही/-
**ॲड. गणेश गोविंद पाटील.**
अे/१,२, तळमजला,
'श्रुतीसारंग' को.ऑप.हा सोसायटी,
युनियन बँकेसमोर, ब्राह्मणआळी,
अलिबाग, रायगड, ४०२ २०१.

## जाहीर प्रगटन
### मा.कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसिलदार उरण यांचे न्यायालय उरण, ता.उरण, जि.रायगड

चौकशी अर्ज क्र.३१९/२०२५

श्री.अनंत चांगदेव नवाळे, — अर्जदार
रा.विंधणे,
ता.उरण, जि.रायगड.

विरूद्ध

ग्रामसेवक,
ग्रुप ग्रामपंचायत विंधणे,
ता. उरण, जि. रायगड. — सामनेवाला

तमाम लोकांस या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की,

ज्याअर्थी अर्जदार श्री.अनंत चांगदेव नवाळे, यांनी मा.कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसिलदार उरण यांचे न्यायालयात त्यांचा मुलगा कुमार विराग अनंत नवाळे, यांच्या जन्माची नोंद उपलब्ध नसल्याने दिवस ठरवून मिळण्याकरीता अर्ज दाखल केलेला आहे. तरी दिनांक २८/०५/२००७ रोजी राहत्या घरी मौजे.विंधणे, ता.उरण येथे जन्म झालेला आहे असे अर्जात नमूद केलेले आहे. अर्जदार यांनी उक्त नोंद सामनेवाला यांच्या कार्यालयात होणेकरीता आदेश मिळणेकामी सदरचा अर्ज मा. न्यायालयात दाखल केलेला आहे.

तरी कुमार विराग अनंत नवाळे, यांच्या जन्माच्या नोंदीबाबत कोणाचीही हरकत, घ्यावयाची असल्यास त्यांनी ही जाहीर प्रगटन प्रसिद्ध झालेल्या तारखेपासून १५ दिवसाचे आत लेखी अथवा तोंडी हरकती मा.न्यायालयाकडे योग्य त्या पुराव्यासह सादर कराव्यात.

याद्वारे असे जाहीर करण्यात येते की, हा कालावधी संपण्याच्या अगोदर योग्य त्या हरकती प्राप्त झाल्या नाहीत तर कुमार विराग अनंत नवाळे, यांच्या जन्माची नोंद सामनेवाला यांच्या कार्यालयास घेणेकामी त्यांना आदेश पारीत करणेंत येतील. तद्नंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही. याची नोंद घेणेंत यावी.

आज दिनांक १८/०७/२०२५ रोजी मे.कोर्टाच्या सही शिक्यानिशी देण्यात आली.

सही/-
**(डॉ. उध्दव कदम)**
**कार्यकारी दंडाधिकारी**
**तथा तहसिलदार उरण**

## जाहीर सूचना

तमाम जनतेस या जाहीर नोटिसीने कळवण्यात येते की, आमचे आशिलांनी खालील अनुसूचीमध्ये वर्णन केलेली मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक रणजित प्रभाकर राणे यांचेकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या संदर्भात आम्ही विद्यमान मालकांचे मालकी हक्क तपासत आहोत.

सदर मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध मालकीहक्काची व प्रत्यक्ष वहिवाटीतील असून ती विकण्याचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा त्यांनी आमच्या आशिलांना दिलेला आहे. मात्र, तरी देखील कोणत्याही व्यक्ती/संस्था सदर मालमत्ता किंवा त्यावरील कोणत्याही भागाच्या संदर्भामध्ये/विरुद्ध कोणताही हक्क, मालकी हक्क, हितसंबंध, दावा, मागणी आणि/किंवा आक्षेप जसे की, विक्री, अदलाबदल, भाडेपट्टा, कुळवहिवाट, परवाना, विश्वस्त, धारणाधिकार, निर्वाह, सुविधाधिकार, वारसाहक्क, ताबा, जप्ती, गहाण, प्रभार, बक्षीस, प्रलंबित वाद, एफएसआय वापर किंवा अन्यकाही दावे असल्यास त्यांनी तसे सदरच्या लिखित सुचनेसह झुंजारराव आणि कं., वकील आणि सॉलिसिटर्स, ४था मजला, जलाराम ज्योत, जन्मभुमी मार्ग, फोर्ट, मुंबई - ४००००१ येथे तसे हक्क, मालकी हक्क, हितसंबंध, दावा, मागणी आणि/किंवा आक्षेपाच्या कागदपत्रांच्या प्रमाणित सत्य प्रतींसह या सूचनेच्या प्रसिद्धीच्या तारखेपासून १४ (चौदा) दिवसांच्या आत कळवाव्यात.

वरील मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे असे गृहीत धरून आमचे आशिल सदरचा खरेदी विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळवण्यात येते

**अनुसूची**
**(मालमत्तेचे वर्णन)**

नोंदणीकृत जिल्हा व उप-जिल्हा रायगड यांचे कार्यक्षेत्र मधील गाव - नांदईपाडा, तालुका-अलिबाग, जिल्हा-रायगड येथे स्थित भूमापन क्रमांक व उपविभाग १७६, एकूण क्षेत्र ००-३१-९० (हे.आर.चौ.मी.) आकार रु.पै. ३.७५/-

ठिकाणः अलिबाग
दिनांक : ३०/०७/२०२५

**झुंजारराव आणि कं. करीता**
**सही/-**
**विक्रांत झुंजारराव**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची मिळकत तिचे मालक मे.मामाश्री कार्गो अॅण्ड लॉजिस्टिक प्रा. लि. यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविले आहे. तिचे तपशिलवर वर्णन पुढीलप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.चौ.मी.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| चिरनेर ता.उरण | १४१/१ | ०-८२-०० पैकी ०-०४-०० | २१.८२ |

वरिल ०-८२-०० हे.आर.चौ.मी. क्षेत्रापैकी मे.मामाश्री कार्गो अॅण्ड लॉजिस्टिक प्रा.लि.यांचे मालकीची ०-०४-०० हे.आर.चौ.मी.हे या नोटीसचा विषय आहे.

या मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, बयानापावती, खरेदीखत, साठेकरार, गहाण, दान, बोजा, लीज, कब्जा, लोन, भाडेपट्टा, अगर फरोक्त वा इतर कोणताही कायदेशिर हक्कहितसंबंध असल्यास आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हांस ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत लेखी पुराव्यासह खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी किंवा असल्यास, तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहार पुर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

अलिबाग,
दिनांक : २९/०७/२०२५

सही/-
**ॲड. परेश अ. देशमुख**
**जिल्हा न्यायालय अलिबाग-रायगड**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस कळविण्यात येते की, खालील वर्णनांचे जमिनीचे विद्यमान मालक श्री.रामचंद्र नारायण मनोहर, श्री.सदाशिव नारायण मनोहर व श्री.मधुसुदन नारायण मनोहर तर्फे श्री.सुभाष विमलचंद जैन रा.पेण यांनी सदर जमिनीतील असलेला आपला अविभक्त हिस्सा हा माझे अशिल सौ.स्मृती सचिन पाटील रा. गडब, तालुका-पेण, जिल्हा रायगड यांना रजिस्टर खरेदीखताने विकत देण्याचे ठरविले असुन त्याबाबत उभयतांमध्ये सविस्तर बोलणी झाली आहेत.

मिळकतीचे वर्णन जिल्हा रायगड, तालुका पेण, पंचायत समिती पेण, मे. दुय्यम निबंधक पेण, तलाठी सजा- मळेघर, ग्रामपंचायत वडगांव, मौजे वडगांव येथील गट नं.२१ हिस्सा नं.४ एकुण क्षेत्र १-९५-० हे.आर.चौ.मी. आकार रु.०-१४ पैसे पैकी ०-३९-० हे.आर.चौ.मी. ही जमिन या जाहीर नोटीसीचा विषय आहे.

सदरची जमिन ही निर्वेध व बोजाविरहीत असल्याची ग्वाही वरील विद्यमान मालकांनी माझे अशिलांना दिली आहे. तरी वरील अविभक्त हिश्श्याचे जमिन मिळकती संदर्भात जर कोणाचा साठेकरार, गहाण, दान, जप्ती, लिन, लीज, चार्ज, जामिनकी, कब्जा, वारसाहक्क अगर कायदेशिर हितसंबध असल्यास त्यांनी आपल्या लेखी हरकती प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाले दिवशी पासून १४(चौदा) दिवसांचे आंत खाली सही करणार ॲडव्होकेट यांचे पत्त्यावर रजिस्टर्ड पोस्टाने कळवाव्यात.

जर वरील मुदतीत कोणाचीही लेखी हर-हरकत न आल्यास सदरची ०-३९-० हे.आर.चौ.मी. ही जमिन निर्वेध व बोजाविरहित आहे व त्यावर इतर दुसरे कोणाचाही, कसल्याही प्रकारचा हक्क अगर हितसंबंध नाही असे समजुन माझे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील व वरील मुदतीनंतर येणारी कोणतीही हरकत ही माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी. येणेप्रमाणे जाहीर नोटीस असे.

पेण- रायगड.
दि. ३०/०७/२०२५.

सही /-
**ॲड. संजय भास्कर पाटील**
परमार प्लाझा, शॉप नं.१६.
तळ मजला, शिवाजी पथ
पेण-रायगड. ४०२१०७.
मोबा. ९८८१९१५२१९

## जाहीर नोटीस

सर्व संबंधितांस या नोटीसद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिल यांचे खुद्द मालकीच्या, खालील नमूद मिळकतीचे वैध मालकी हक्क प्रमाणपत्र देणेकामी सदर जाहिर नोटीस प्रसिद्ध करीत आहोत.

संदर्भित बिनशेती जमीन मिळकत ही पूर्णपणे बिनजोखमी व बोजाविरहित असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतीचे विद्यमान मालकांनी दिला आहे. याउपरही संदर्भित मिळकतीमध्ये अन्य कुणाचेही कसल्याही तऱ्हेचा हक्क, हितसंबंध व अधिकार असल्यास, त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्या दिनांकापासून ७ दिवसांचे अवधीत माझ्याकडे लेखी पुराव्यानीशी देवून माझी खात्री पटवून घ्यावी. विहीत मुदतीत अशी कोणतेही लेखी हरकत न आल्यास सदर मिळकतींचे वैध मालकी हक्क प्रमाणपत्र दिले जाईल, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | सिटी सर्व्हे नं. | क्षेत्र-(चौ.मी) | सत्ताप्रकार |
|---|---|---|---|
| अलिबाग, ता.अलिबाग, जि.रायगड | ४८२ | १३५.४ | क-२ |
| | ४८२/१ | २६९.२० | क |
| **मौजे** | **सर्व्हे नं/हिस्सा नं.** | **क्षेत्र-(आर.चौ.मी)** | **आकार-(रु.पै.)** |
| चेंढरे-अलिबाग, ता.अलिबाग, जि.रायगड | १०७/५ | १०-४०-०० | २४९.६० |

अलिबाग,
दि. २९/०७/२०२५

सही/-
**ॲड. महेश सुहास म्हात्रे**
M.M. Legal and Associates
MAH/5773/2006
Rituraj Plaza, Flat No.1,
Ground Floor, Shivaji Chouk
Near Gawade Optics.
Alibag Raigad.

## जाहीर सूचना

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे मानकुळे, ता.अलिबाग, जि.रायगड येथील खालील परिशिष्टात मनूद केलेली शेतजमिन मिळकत श्री.गजानन रोग्या नाईक यांच्या निर्वेध मालकी हक्काची असून, सदर जमिन मिळकत, सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांकडून, माझ्या अशिलांनी कायमस्वरूपी खरेदी करण्याचे मान्य व कबूल केले असून, त्या आशयाची बोलणी सदर मिळकतीचे विद्यमान मालक व माझे अशिला दरम्यान झाली आहे. सदरील जमिन मिळकत पूर्णतः निर्वेध व बिनजोखमी असल्या बाबतचा हवाला सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी माझे अशिलांस दिला आहे.

खालील परिशिष्टामध्ये नमूद केलेल्या मिळकतीवरील श्री.गजानन रोग्या नाईक यांच्या मालकी हक्काचा तपास करून मालकी हक्क निर्वेध असले बाबतचा दाखला त्यांस देणेचा आहे. तरी ज्या व्यक्ती/संस्था यांचा परिशिष्टात नमूद मिळकतीमध्ये गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अत्रवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र वहिवाट व अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४(चौदा) दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास वर नमूद मिळकत निर्वेध आहे समजून तसा दाखला माझे अशिलांना देण्यात येईल व माझे अशिल त्यांचा सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी, हे सर्वांस कळावे.

| मौजे | भूमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र हे.आर | आकार रू.पैसे |
|---|---|---|---|
| मानकुळे ता.अलिबाग | १३२/३ | ०.३८.२० एकुण | ०.६६ |

अलिबाग,
दि.२३/०७/२०२५

सही /-
**(ॲड.सचिन ए नाईक)**
जिल्हा न्यायालय
नविन वकिल बार रूम
अलिबाग रायगड

# ‘प्रो-गोविंदा’ लिगमध्ये जय जवानला डावलले

। ठाणे । प्रतिनिधी ।

दहा थरांचा विक्रम करणाऱ्या जय जवान गोविंदा पथकाला या वर्षी प्रो-गोविंदा लीगमध्ये संधी नाकारण्यात आली आहे. ठाकरे बंधूच्या मराठी विजयी मेळाव्यामध्ये सलामी दिल्याने राजकीय आकसापोटी ही संधी नाकारण्यात आली असल्याचा आरोप आता जय जवान गोविंदा पथकाकडून करण्यात येत आहे. तर विजयी मेळाव्यापूर्वीच निवड प्रक्रिया पूर्ण झाली असून हे सर्व आरोप निराधार असल्याचा दावा आयोजकांकडून करण्यात आला आहे. स्पर्धेत संधी नाकारण्यात आली असल्याने या गोविंदा पथकाच्या पाठीशी ठामपणे उभे राहण्याचा निर्धार मनसेच्या वतीने घेण्यात आला आहे. राज्य सरकारने दहीहंडी उत्सवाला साहसी खेळाचा दर्जा दिल्यानंतर मंत्री प्रताप सरनाईक यांच्याकडून प्रो-गोविंदाचे आयोजन करण्यास सुरुवात केली. यंदाचे हे प्रो-गोविंदाचे ३ रे वर्ष आहे. यंदाच्या पात्रता फेरीनंतर १६ संघ अंतिम फेरीसाठी पात्र ठरले आहेत.




> जय जवान गोविंदा पथकाला या खेळात संधी दिली गेली नाही तर त्यांचे वजन कमी होणार नाही. त्यांनी जे रेकॉर्ड करून ठेवले आहेत,त्याला हात लावायला अनेकांना अनेक वर्षे जातील. तुम्ही त्यांना संधी दिली नाही तर जय जवान गोविंदा पथक छोटे होईल असे होणार नाही. अशाप्रकारे राजकारण करू नये.
> – अविनाश जाधव, नेते, मनसे.

येत्या ७ ते ९ ऑगस्टदरम्यान मुंबईतील डोम एसव्हीपी, वरळी येथे ही महाअंतिम स्पर्धा रंगणार आहे. या लीगमध्ये राज्यभरातून आलेल्या ३२ गोविंदा पथकांची निवड झाली आहे. केवळ राज्यातच नाही, तर संपूर्ण देशभरात प्रसिद्ध असलेल्या आणि आपल्या नावावर १० थरांचा विश्वविक्रम करणाऱ्या मुंबईच्या जय जवान गोविंदा पथकाला मात्र, अपात्र ठरवत या स्पर्धेत संधी नाकारल्याने गोविंदा पथकाच्या वतीने नाराजी व्यक्त केली जात आहे.

या स्पर्धेत सहभाग घेण्यासाठी ऑनलाईन अर्ज भरावा लागतो. मात्र, जय जवान गोविंदा पथकाला स्पर्धेत सहभागी होण्यास अर्ज करण्यास फक्त ३ मिनिटांचा उशीर झाल्याने त्यांना अपात्र ठरवत त्यांना स्पर्धेत संधी नाकारण्यात आली. मराठीच्या मुद्द्यावरून मनसे अध्यक्ष राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांच्या एकत्रित मेळाव्या दरम्यान जय जवान पथकाने मानवी मनोरे रचत राज आणि उद्धव ठाकरे यांच्या भूमिकेला पाठिंबा दर्शवल्याने आम्हाला संधी नाकारल्याचा संशय पथकाचे अध्यक्ष संदीप ढवळे यांनी व्यक्त केला आहे. मात्र, यंदाच्या गोविंदा उत्सवात आम्ही मराठीचा मुद्दा घेऊनच मैदानात उतरणार.

ज्या ३२ संघांनी पहिली नोंदणी केली, त्या ३२ संघांना संधी देण्यात आली. जय जवान गोविंदा पथकाचा क्रमांक नोंदणीमध्ये ४३ वा होता. बालवीर गोविंदा पथक जे गेल्यावर्षी दुसऱ्या क्रमांकावर होते त्यांचा क्रमांकही ३७ होता. आणखी एका पथकाचा नंबर नंतरचा होता या तीन संघांनाही संधी नाकारण्यात आली आहे. ज्यांना संधी मिळाली, त्यातील एक पथक हे दापोलीचे आहे, दोन वसई-विरारमधील आहेत, पालघर-वाड्यातील पथकांचा देखील समावेश आहे. मागच्या वर्षी जी सहा पथके होती त्यांची देखील संधी हुकली आहे.

## निवडक




### इंग्लंडने राखले युरोचे विजेतपद

**बासेल :** इंग्लंडच्या महिला फुटबॉल संघाने युरो २०२५ स्पर्धेच्या अंतिम फेरीत स्पेनवर ३-१ अशा पेनल्टी शूटआऊटने विजय मिळवत सलग दुसऱ्यांदा युरोपियन चषकावर आपले नाव कोरले. बासेल, स्वित्झर्लंड येथील सेंट जेकब पार्क स्टेडियमवर झालेल्या या थरारक सामन्यात दोन्ही संघांनी १-१ अशी बरोबरी साधली होती, मात्र पेनल्टी शूटआऊटमध्ये इंग्लंडने बाजी मारली. सामन्याच्या २५ व्या मिनिटाला स्पेनच्या मारिओना काल्डेन्टेने हेडरद्वारे आघाडी मिळवली; परंतु इंग्लंडच्या अलेसिया रुसोने ५७ व्या मिनिटाला क्लो केल्लीच्या क्रॉसवर गोल करत बरोबरी साधली. दोन्ही संघांनी १२० मिनिटे झुंज दिल्यानंतर निकाल लागला नाही, त्यामुळे सामना पेनल्टी शूटआऊटकडे गेला. पेनल्टी शूटआऊटमध्ये इंग्लंडच्या गोलरक्षक हॅना हॅम्पटनने दोन अप्रतिम बचाव करत संघाला आघाडी मिळवून दिली. निर्णायक क्षणी क्लो केल्लीने विजयी पेनल्टी गोल केला आणि इंग्लंडच्या चाहत्यांमध्ये जल्लोष उसळला. या विजयामुळे इंग्लंडने २०२२ नंतर पुन्हा युरो विजेतेपद पटकावले. संघाच्या कर्णधाराने आणि खेळाडूंनी टीम स्पिरीट आणि जिद्दीचे कौतुक केले. इंग्लंडच्या या ऐतिहासिक विजयाचे पंतप्रधान, राजघराणे आणि जगभरातील फुटबॉलप्रेमींनी अभिनंदन केले आहे.

### कुस्ती विश्वचषकासाठी भारतीय महिला संघाची घोषणा



**नवी दिल्ली :** बल्गेरिया येथे होणाऱ्या महिला अंडर-२० जागतिक कुस्ती स्पर्धेसाठी भारतीय संघाची घोषणा करण्यात आली आहे. यासाठी दिल्लीतील इंदिरा गांधी स्टेडियममध्ये चाचण्या घेण्यात आल्या, ज्यामध्ये देशभरातील ४२ महिला कुस्तीगीरांनी भाग घेतला. भारताचा संघ जागतिक महिला कुस्ती स्पर्धेत निवडला गेला ७ हरियाणा कुस्तीगीर, अजिंक्यपद स्पर्धा बल्गेरिया सोनीपत रोहतक चरखी दादरी हरियाणा संघ बल्गेरिया येथे होणाऱ्या महिला अंडर-२० जागतिक कुस्ती स्पर्धेसाठी भार-ताची घोषणा करण्यात आली आहे. संघ निवडीसाठी दिल्लीच्या आयजी स्टेडियममध्ये चाचण्या घेण्यात आल्या. ज्यामध्ये दे-शातील ४२ महिला कुस्तीगीरांनी भाग घेतला. कुस्ती स्पर्धेसाठी बल्गेरिया येथे होणाऱ्या महिला अंडर-२० जागतिक कुस्ती स्पर्धे साठी भारतीय संघाची घोषणा करण्यात आली आहे. यासाठी दिल्लीतील इंदिरा गांधी स्टेडियममध्ये चाचण्या घेण्यात आल्या, ज्यामध्ये देशभरातील ४२ महिला कुस्तीगीरांनी भाग घेतला.

### अर्शद नदिमला घरचा आहेर

**नवी दिल्ली :** पॅरिस ऑलिम्पिकमध्ये ऐतिहासिक कामगिरी करत पाकिस्तानला भालाफेकीत पहिले सुवर्णपदक मिळवून देणारा अर्शद नदिम सध्या चर्चेत आहे. भारताचा स्टार ॲथलीट नीरज चोप्राला पराभूत करत नदिमने ९२.९७ मीटर भाला




फेकून ऑलिम्पिक विक्रम मोडला. मात्र, या यशानंतर सरकारकडून जाहीर झालेली सर्व बक्षिसं त्याला मिळालेली नाहीत, असा धक्कादायक खुलासा खुद्द नदिमने केला आहे. नदिमने जिओ टीव्हीशी बोलताना सांगितले की, माझ्यासाठी जाहीर करण्यात आलेली बरीचशी बक्षिसं केवळ घोषणांपुरतीच मर्यादित राहिली आहेत. विशेषतः मला प्लॉट देण्यात येईल असे सांगण्यात आले होते, पण आजतागायत मला एकही प्लॉट मिळालेला नाही. फक्त रोख बक्षिसं मिळाली आहेत. पॅरिस ऑलिम्पिकपूर्वी नदिमला कोणतीही सरकारी मदत मिळाली नव्हती. मात्र, सुवर्णपदक जिंकल्यानंतर त्याच्यावर बक्षिसांची आणि सन्मानांची खैरात केली गेली होती. पण प्रत्यक्षात या बक्षिसांपैकी बहुतेक केवळ कागदावरच राहिली असल्याचे त्याने सांगितले.



● अलिबाग तालुक्यातील महावीर ग्रामस्थ मंडळ खंडाळे यांच्यावतीने नागपंचमीनिमित्त कुस्ती स्पर्धा भरविण्यात आली होती. यावेळी रायगडचा मल्ल प्राण भगत आणि कल्याणचा मल्ल नमन म्हात्रे यांच्यातील प्रेक्षणीय कुस्ती झाली. दोन्ही मल्ल सुवर्णपदक विजेते असल्याने प्रेक्षकांना विविध डावपेच बघण्याची संधी मिळाली. अखेर नमनला चितपट करीत प्राण भगतने कुस्ती जिंकली. (छायाचित्र : समीर मालोदे)

## नेपाळ संघाचा भारतात सराव

**नवी दिल्ली :** २०२५ च्या टी-२० विश्वचषक पात्रता स्पर्धेपूर्वी नेपाळ संघ भारतात सराव करेल. २० ऑगस्ट ते ४ सप्टेंबर या कालावधीत बंगळुरू येथील बीसीसीआयच्या सेंटर ऑफ एक्सलन्स येथे नेपाळी संघ सराव सत्रांमध्ये सहभागी होईल. हा उपक्रम भारत सरकारच्या सहकार्याने केला जात आहे, ज्याचा उद्देश भारत आणि नेपाळमधील तरुणांना क्रिकेटद्वारे जोडणे आहे. टी-२० विश्वचषक पात्रता सामने ८ ते १७ ऑक्टोबर दरम्यान ओमानमध्ये खेळवले जातील. मुख्य स्पर्धा भारत आणि श्रीलंकेत होणार आहे. भारताने यापूर्वी गेल्या वर्षी ऑगस्टमध्ये नेपाळ संघाला सेंटर ऑफ एक्सलन्स येथे सराव करण्याची संधी दिली होती. यासोबतच, नेपाळने गेल्या वर्षी जूनमध्ये बडोदा क्रिकेट असोसिएशनच्या संघांविरुद्ध त्रिकोणी सराव स्पर्धा देखील केला. क्रिकेट सहकार्यामुळे भारत आणि नेपाळमधील ऐतिहासिक आणि खोल संबंधांना नवीन ऊर्जा मिळाली आहे.

## ऑस्ट्रेलियाने पाचवी मॅच जिंकली




। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

ऑस्ट्रेलियाने पाचव्या टी-२० सामन्यात वेस्ट इंडिजवर ३ विकेट्स व १८ चेंडू राखून विजय मिळवून मालिका ५-० अशी खिशात टाकली. या कामगिरीसह ऑस्ट्रेलियाचा संघ हा भारतीय संघानंतर मोठा विक्रम नोंदवणारा दुसरा संघ ठरला. भारताने २०२० मध्ये असा पराक्रम केला होता आणि आता ऑस्ट्रेलियाच्या नावावर हा विक्रम नोंदवला गेला आहे. पाचव्या सामन्यात वेस्ट इंडिजचे १७१ धावांचे लक्ष्य ऑस्ट्रेलियाने १७ षटकांत पार केले. प्रत्युत्तरात ऑस्ट्रेलियाकडून कॅमेरून ग्रीनने १८ चेंडूंत ३२, टीम डेव्हिडने १२ चेंडूंत ३० आणि आरोन हार्डीने नाबाद २८ धावांची खेळी केली. ऑस्ट्रेलियाने १७ षटकांत ७ बाद १७३ धावा केल्या. विंडीजकडून अकील होसैनने ३, तर जेसन होल्डर व अल्झारी जोसेफ यांनी प्रत्येकी २ विकेट्स घेतल्या..ऑस्ट्रेलियान याच दौऱ्यावर कसोटी मालिकेतही ३-० अशा विजय मिळवला होता आणि ट्वेंटी-२० मालिकेत ५-० असा विजयाची नोंद केली. ऑस्ट्रेलियाने सलग १३ ट्वेंटी-२० सामने जिंकले आहेत. भारताच्या विक्रमाशी बरोबरी केली आहे. भारताने २०२० मध्ये न्यूझीलंडविरुद्ध त्यांच्याच घरच्या मैदानावर ५-० अशी ट्वेंटी-२० मालिका जिंकली होती. त्यानंतर प्रतिस्पर्धी संघाच्या घरच्या मैदानावर ट्वेंटी-२० मालिकेत ५-० असा विजय मिळवणारा ऑस्ट्रेलिया हा दुसरा संघ ठरला आहे.

## महेश तांबेचा क्रिकेटमध्ये विश्वविक्रम

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।




भारतीय वंशाचा महेश तांबे याने फिनलँड संघाकडून खेळताना आंतरराष्ट्रीय टी-२० क्रिकेटमध्ये मोठा पराक्रमक केला. इस्टोनियाविरुद्धच्या तिसऱ्या टी-२० सामन्यात फिनलँडच्या ३९ वर्षीय महेश तांबेने ९ चेंडूंत पाच विकेट्स घेतल्या. आंतरराष्ट्रीय टी-२० क्रिकेटमध्ये सर्वात कमी चेंडूंत पाच विकेट्स घेण्याचा वर्ल्ड रेकॉर्ड त्याच्या नावावर नोंदवला गेला आहे. याआधी हा विक्रम बहरेनच्या जुनैद अझीज याच्या नावावर होता, त्याने २०२२ मध्ये जर्मनीविरूद्ध १० चेंडूंत पाच विकेट्स घेण्याचा पराक्रम केला होता. कसोटी खेळणाऱ्या देशांमध्ये अफगाणिस्तानच्या राशिद खानने २०१७ मध्ये आयर्लंडविरुद्ध ११ चेंडूंत पाच विकेट्स घेण्याचा पराक्रम केला होता. फिनलँडचा कर्णधार अमजद शेर याने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजीचा निर्णय घेतला. तांबेने १७ व्या षटकात साहिल चौहान याची विकेट घेऊन खाते उघडले. चौहानच्या नावावर टी-२० क्रिकेटमध्ये सर्वात वेगाने ( २७ चेंडू) शतक झळकावण्याचा विक्रम आहे. त्यानंतर तांबेने पुढच्या चेंडूवर उस्मानची विकेट घेतली. षटकाच्या शेवटच्या चेंडूवर स्टीफन गूचची विकेट घेतली. शेवटच्या षटकात तांबेने रुपम बरुहा व प्रणय धीवाला यांच्या विकेट्स घेतल्या. त्याने दोन षटकांत १९ धावा देताना पाच विकेट्स घेतल्या. त्याच्या या उल्लेखनीय कामगिरीच्या जोरावर फिनलँडने इस्टोनियाचा संपूर्ण संघ १९.४ षटकांत १४१ धावांत तंबूत पाठवला. लक्ष्याचा पाठलाग करताना जॉर्डन ओ ब्रायन ११ चेंडूंत १८ धावांवर माघारी परतला. मोहनने ६७ धावांची खेळी करताना सहा चौकार व १ षटकार खेचला. फिनलँडने हा सामना पाच विकेट्स व ११ चेंडू राखून जिंकला आणि तीन सामन्यांची मालिका २-१ अशी जिंकली.३९ वर्षीय तांबेने २०२१ मध्ये स्वीडनविरुद्धच्या सामन्यातून टी-२० क्रिकेटमध्ये पदार्पण केले. त्याने टी-२० वर्ल्ड कप पात्रता फेरीत इटलीविरुद्धची मॅच खेळली. आतापर्यंत त्याने २८ ट्वेंटी-२० सामन्यांत २२.२५ च्या सरासरीने २८ विकेट्स घेतल्या आहेत.

## विश्वविक्रमी दिव्या देशमुख

। मुंबई । प्रतिनिधी ।

फिडे महिला बुद्धिबळ विश्वचषकात दोन्ही फायनालिस्ट भारतीय असण्याची ती पहिलीच वेळ होती. एका बाजूला अनुभव तर दुसऱ्या बाजूला तरुण जोश एका बाजूला आधीची पिढी तर एका बाजूला आताची पिढी क्लासिकल बुद्धिबळातील या सर्वोच्च किताबासाठी चुरस रंगत गेली. पहिले दोन डाव बरोबरीत सुटले आणि क्षणाक्षणाला विजयाचे पारडे इकडून तिकडे झुलत असताना जागतिक बुद्धिबळाला लाभली नवी ‘क्वीन’ती म्हणजे नागपूरची अवघ्या १९ वर्षांची दिव्या देशमुख. या महामुकाबल्यात, १९ वर्षीय दिव्या देशमुखने केवळ बुद्धिबळाच्या पटावरच नव्हे, तर इतिहासाच्या पानांवर आपली छाप




उमटवली. दिग्गज कोनेरू हंपीचा टायब्रेकरमध्ये चित्तथरारक पराभव करत दिव्याने फिडे महिला विश्वचषक जिंकला आणि त्यासोबतच ग्रँडमास्टर बनण्याचा, स्पर्धेपूर्वी अशक्यप्राय वाटणारा, बहुमानही मिळवला. एकीकडे ३८ वर्षीय अनुभवी हंपी, जिने हा एक किताब वगळता जवळजवळ सर्व प्रमुख विजेतेपदे जिंकली, तर दुसरीकडे निर्भय आणि महत्त्वाकांक्षेने भारलेली दिव्या, यांच्यातील ही लढत विशेष लक्षवेधी ठरली. आठवड्याच्या शेवटी दोन तणावपूर्ण क्लासिकल सामने बरोबरीत सुटल्यानंतर, विजेतेपदाचा निर्णय टायब्रेकरमध्ये दडपण कसे हाताळले जाणार यावर अवलंबून होता आणि इथे दिव्याने बाजी मारली.






कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक सौ.सुप्रिया पाटील यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)